म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय ना/टक
दा क्र ९९९
IRBK-0100999
IRBK-0100999
IRBK-0100999

IRBK-0100999

॥ श्री ॥

# मत्स्यगंधा.

वाचनालय सं. २० १०-८-३९

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला.

स्थळ—राजसभा.

( शांतनु मुख्य सिंहासनावर, शेजारच्या लहान सिंहासनावर भीष्म, इतर जागीं राजगुरु, अमात्य सेनापति, बृहस्पती, वाचस्पति, सागर, वगैरे बसले आहेत; सज्जामध्यें राजस्त्रिया, गौरी, ललिता वगैरे बसल्या आहेत. )

( मंगलाचरण )

( पद १—राग हमीर ताल तेवरा. )

श्रीभगवान् ! दे वरदान । अविरत ध्यान स्फूर्ति-
निधान । करि यशवान् त्यागि महान् । स्वार्थी मानी
तृणसमान ॥ धृ० ॥ त्यजि तो राम राजविलास । तो
त्यागी यौवन आस । आर्य कुमारी मुकति जिवांस ।
जनकमनास । देति सुखास । तैसा रमवो भीष्म पित्यास ॥१॥

शांत०:—राजगुरु ! आमच्या या देवव्रत भीष्माची युवराजपदावर स्थापना करतांना सर्व मांडलिकांनीं, दरबारी लोकांनीं व प्रजाजनांनीं जो उत्साह दाखविला तो केवळ अवर्णनीय आहे ! या युवराजमहोत्सवाच्या वेळीं माझ्या भीष्माची स्वारी शृंगारलेल्या रस्त्यामधून जात असतां जागो-जागीं प्रजेकडून त्याच्या नांवाचा जो जयजयकार होत होता, त्या योगानें माझा हृदयसागर उचंबळून येऊं लागला !

**राज०:**— खरोखर, भीष्माची योग्यताच तशी आहे ! महाराज, ज्या वेळीं आपण भीष्माला इथं आणलंत त्या वेळीं आपल्याबरोबर त्याला येतांना पाहून स्वर्गलोकींचा हा कुणीतरी देवच आपण हस्तगत केला कीं काय असं मला वाटलं आणि मला आपल्या सामर्थ्याबद्दल अभिमान वाटला.

**शांत०:**—आणि त्या सामर्थ्याबद्दल मलाही अभिमान वाटतो. सर्व जीवांना पावन करणारी स्वर्गीय गंगा, शापामुळं मानवरूपांत माझी प्रियतमा झाली आणि तिच्या पोटीं जुळे आठ पुत्र होऊन मला सुख यायला तिनं एकही ठेवूं नये, त्यांना जलसमाधि द्यावी, हें मला चमत्कारिक वाटलं ! पूर्वीच्या करारांचं विस्मरण पडून शेवटच्या पुत्राच्या वेळीं मी तिला टाकून बोललों. शापांतून गंगा शापमुक्त झाल्यामुळं ती गुप्त झाली आणि तिच्या बरोबरच तो पुत्र जो आपलो आतांचा युवराज देवव्रत माझा भीष्म-माझ्या दृष्टीआड झाला !

[ उसासा टाकतो.

**अभ०:**—महाराज ! हा उसासा आतां कां बरं ? त्या वेळीं पत्नीविरहानं आणि पुत्रप्रेमानं विव्हळ झालेले शांतनुमहाराज गंगातटाकीं झाडाझुडपांना दगडांना आलिंगन देत असलेले पाहून महाराजांना वेड लागलं, असं वाटून प्रजा हवालदील झाली ! पण वियोगदुःखाच्या वादळाचा पहिला सोसाटा गेल्यावर, महाराज एखाद्या प्रचंड वृक्षाप्रमाणं धीरोदात्त दिसूं लागले !

**शांत०:** —अमात्य ! रांप्रतच्या आनंदामध्यें पूर्वदुःखाच्या स्मृतीची छाया पडली, पण आपण माझ्या मुख्य कर्तव्याची मला जागृति दिलीत. गुरु ! या अमात्यांनाच विचारा, चार वर्षांपूर्वी गंगातटाकीं मी शिकार करीत असतांना एक पाणीदार वीर आपल्या बाणांनीं गंगेचा प्रवाह अडवीत आहे हें पाहून मी कसा थक्क झालों तें ! त्याच्या शरचापल्यानं त्यानं प्रवाहांत असा बांध उठवून दिलान् कीं, पाणी तुंबून राहिल्यामुळं पुढचं पात्र ठणठणीत पडलं . .

**भीष्म:**—मग महाराज ! यांत माझ्या हातून अलौकिक तें काय झालं ? गंगा माझी माता, बालकानं मातेला अडविलं, तर पुत्रप्रेमानं लडिवाळपणानं, कौतुकानं माताही आपल्याला पुढं जायचं सामर्थ्य नाहीं, असं दाखवीत नाहीं का ?

**शांत०:**—पतीची भेट झाली म्हणजे पुत्रवती पत्नी त्या पुत्राचंच कौतुक करून पतीला तोप देते. त्याप्रमाणं माझ्या पत्नीनं याच्याशीं खेळून वागून

माझ्या मनाला तोषविलं, यांत संशय नाहीं, गंगा प्रगट होऊन त्या वेळीं या भीष्माच्या एकंदर गुणाचं तिनं जें वर्णन केलं, त्यावरून अशा थोर गुणांनीं मंडित असा पुत्र मिळालेला पाहून मलाही अभिमान वाटला ! भीष्माच्या प्रत्येक कृतीबद्दल मला अभिमानच वाटेल.

गौरी:—( स्वगत ) या राजपुत्राच्या प्रत्येक कृतीवर लक्ष्य ठेऊन तीबद्दल अभिमान बाळगणारी आणखी एक व्यक्ति इथं आहे म्हणावं.

वाच०:—अहो बृहस्पति ! ऐकलंत ना ? फाजील स्तुति करून या मुलाला महाराज उगाच डोक्यावर बसवून घेतील !

बृह०:—पण डोकीवर बसून, बसणाराला आणि बसवून घेणाराला दोघांनाही सुख होत नाहीं.

वाच०:—बृहस्पतीच आहांत ! तुम्हांला त्यांतलं हें ठाऊक नाहीं !

बृह०:—हें तें काय ?

वाच०:—तें आपलं हें ! ( हातांनीं खुणा करतो. )—पण हें पहा, ते आपलं हं कांहीं आहेत. तुम्ही जरा हें करा.

शांत०—भीष्मा ! तुझ्या शरिराची ही विलक्षण वाढच तुझ्या दैवी तेजाची साक्ष देत आहे. वीस वर्षांच्या वयाचा एवढा धिप्पाड वीर या पृथ्वीतलावर आज कुठंही दिसणार नाहीं ! आमच्यासारख्या मनुष्यप्राण्यापेक्षां तुझं बाळपण अगदीं निराळंच असलं पाहिजे !

भीष्म:—महाराज ! माझी बाळपणाची स्थिति कोणाही मानवी प्राण्यापेक्षां खरोखरच भिन्न आहे ! गंगामाता आपल्या अंगावर मला खेळवीत असतांना पाण्याच्या हेलकाव्यांच्या पाळण्यांत मला झोंके देत असे. लाटांच्या थोपटण्यानं मला झोंप लागत असे. सूर्यप्रकाशानं माझं शरीर तापूं नये, म्हणून कधीं कधीं मला जलवस्त्रांनीं झांकीत असे. मी माशांशीं खेळें, सर्पांशीं वागडें, कासवांशीं टक्कर घेईं व सुसरीच्या दाढेंत वसून तिचे दांत मोजीत असे. महाराज ! मला मनुष्य म्हणण्यापेक्षां जलचर नांव अधिक शोभेल.

( पद २—राग–गौडमल्हार ताल–एकताल )

या बाळका । माऊलि माता हृदयावरि झुलवीता
गीत गाती लहरी त्या ॥ धृ० ॥ ताडी मी डसतां बाग-
डतां । जळचरां त्या । मोजी मगरदंता । वदनीं त्या
बळें डोळे खेळे ॥ १ ॥

**राज०:**—खरोखर, भीष्माची योग्यताच तशी आहे ! महाराज, ज्या वेळीं आपण भीष्माला इथं आणलंत त्या वेळीं आपल्याबरोबर त्यांना येतांना पाहून स्वर्गलोकींचा हा कुणीतरी देवच आपण हस्तगत केला काय असं मला वाटलं आणि मला आपल्या सामर्थ्याबद्दल अभिमान वाटला.

**शांत०**—आणि त्या सामर्थ्याबद्दल मलाही अभिमान वाटतो. सर्व जीवांना पावन करणारी स्वर्गीय गंगा, शापामुळं मानवरूपांत माझी प्रियतमा झाली आणि तिच्या पोटीं जुळे आठ पुत्र होऊन मला सुख व्हायला तिनं एकही ठेवूं नये, त्यांना जलसमाधि द्यावी, हें मला चमत्कारिक वाटलं ! पूर्वीच्या आचारांचं विस्मरण पडून शेवटच्या पुत्राच्या वेळीं मी तिला टाकून बोललों. शापांतून शापमुक्त झाल्यामुळं ती गुप्त झाली आणि तिच्या बरोबरच तो पुत्र म्हणजे आपले आतांचा युवराज देवव्रत माझा भीष्म-माझ्या दृष्टीआड झाला !

[ उसासा टाकतो. ]

**अमा०:**—महाराज ! हा उसासा आतां कां बरं ? त्या वेळीं पतिविरहानं आणि पुत्रप्रेमानं विव्हळ झालेले शांतनुमहाराज गंगातटाकीं झाडाझुडपांना आणि दगडांना आलिंगन देत असलेले पाहून महाराजांना वेड लागलं, असं वाटून प्रजा हवालदील झाली ! पण वियोगदुःखाच्या वादळाचा पहिला सोसाटा निघून गेल्यावर, महाराज एखाद्या प्रचंड वृक्षाप्रमाणं धीरोदात्त दिसूं लागले !

**शांत०:**—अमात्य ! सांप्रतच्या आनंदामध्यें पूर्वदुःखाच्या स्मृतीची काळी छाया पडली, पण आपण माझ्या मुख्य कर्तव्याची मला जागृति दिलीत. गुरु ! या अमात्यांनाच विचारा, चार वर्षांपूर्वी गंगातटाकीं मी शिकारीला असतांना एक पाणीदार वीर आपल्या बाणांनीं गंगेचा प्रवाह अडवीत पाहून मी कसा थक्क झालों तें ! त्याच्या शरचापल्यानं त्यानं प्रवाहांत उठवून दिलान् कीं, पाणी तुंबून राहिल्यामुळं पुढचं पात्र ठणठणीत पडलं

**भीष्म:**—मग महाराज ! यांत माझ्या हातून अलौकिक तें काय झालं ? गंगा माझी माता, बालकानं मातेला अडविलं, तर पुत्रप्रेमानं लाडिवाळपणानं कौतुकानं माताही आपल्याला पुढं जायचं सामर्थ्य नाहीं, असं दाखवीत नाहीं का ?

**शांत०:**—पतीची भेट झाली म्हणजे पुत्रवती पत्नी त्या पुत्राचंच कौतुक करून पतीला तोष देते. त्याप्रमाणं माझ्या पत्नीनं याच्याशीं खेळून वागवून

माझ्या मनाला लोभविलं, यांत संशय नाहीं, गंगा प्रगट होऊन त्या वेळीं या भीष्माच्या एकंदर गुणाचं तिनं जें वर्णन केलं, त्यावरून अशा थोर गुणांनीं मंडित असा पुत्र मिळालेला पाहून मलाही अभिमान वाटला ! भीष्माच्या प्रत्येक कृतीबद्दल मला अभिमानच वाटेल.

**गौरी**:—( स्वगत ) या राजपुत्राच्या प्रत्येक कृतीवर लक्ष्य ठेऊन तीबद्दल अभिमान बाळगणारी आणखी एक व्यक्ति इथं आहे म्हणावं.

**वाच०**:—अहो बृहस्पति ! ऐकलंत ना ? फाजील स्तुति करून या मुलाला महाराज उगाच डोक्यावर बसवून घेतील !

**बृह०**:—पण डोकीवर बसून, बसणाराला आणि बसवून घेणाराला दोघांनाही सुख होत नाहीं.

**वाच०**:—बृहस्पतीच आहांत ! तुम्हांला त्यांतलं हें ठाऊक नाहीं !

**बृह०**:—हें तें काय ?

**वाच०**:—तें आपलं हें ! ( हातांनीं खुणा करतो. )—पण हें पहा, ते आपलं हे करीत आहेत. तुम्ही जरा हें करा.

**शांत०**:—भीष्मा ! तुझ्या शरिराची ही विलक्षण वाढच तुझ्या दैवी तेजाची साक्ष देत आहे. वीस वर्षांच्या वयाचा एवढा धिप्पाड वीर या पृथ्वीतलावर आज कुठंही दिसणार नाहीं ! आमच्यासारख्या मनुष्यप्राण्यापेक्षां तुझं बाळपण अगदीं निराळंच असलं पाहिजे !

**भीष्म**:—महाराज ! माझी बाळपणांची स्थिति कोणाही मानवी प्राण्यापेक्षां खरोखरच भिन्न आहे ! गंगामाता आपल्या अंगावर मला खेळवीत असतांना पाण्याच्या हेलकाव्याच्या पाळण्यांत मला झोके देत असे. लाटांच्या थोपटण्यानं मला झोंप लागत असे. सूर्यप्रकाशानं माझं शरीर तापूं नये, म्हणून कधीं कधीं मला जलवस्त्रांनीं झांकीत असे. मी माशांशीं खेळें, सर्पांशीं वागडें, कासवांशीं टक्कर घेईं व सुसरीच्या दाढेंत वसून तिचे दांत मोजीत असे. महाराज ! मला मनुष्य म्हणण्यापेक्षां जलचर नांव अधिक शोभेल.

( पद २—राग—गौडमल्हार ताल—एकताळ )

या बाळका । माऊलि माता हृदयावरि झुलवीता
गीत गाती लहरी त्या ॥ धृ० ॥ ताडी मी डसतां वाग-
डतां । जळचरां त्या । मोजी मगरदंता । वदनीं त्या
बळें लोळे खेळे ॥ १ ॥

**गौरी:**—( स्वगत ) प्रेमजलांत माझ्यावरोबर पोहायला या, म्हणून मी बाई यांना सांगूं तरी कशी ?

**ललि॰:**—कायग गौरी, मी मघांपासून पहातें, युवराजांवरून तुझी दृष्टि कांहीं हालत नाहीं, त्यांनीं तुझ्यावर कांहीं जादूटोणा तर केला नाहीं ना ? तें म्हणे भार्गवरामाजवळ अस्त्रविद्या शिकले. आणि अस्त्रविद्या म्हणजे जादूटोणाच ! ते तुझ्यावर अस्त्रविद्या चालवूं लागले म्हणून तूं त्यांच्यावर नेत्रबाण फेंकते आहेस वाटतं ?

**गौरी:**—ही काय मेली थट्टा ! मी नाहीं तुझ्याशीं बोलायची जा. कांउगीच मला त्रास देतेस ?

**ललि॰:**—हें. प्रेमाचं माणूस दृष्टीसमोर असलं म्हणजे माझ्यासारख्या मैत्रिणीच्या बोलण्याचा त्रासच व्हायचा ! अग जरा माझ्याकडे पहा ! आपल्या दृष्टीचें पांघरूण घालून युवराजांना दडवायला नको कांहीं !

**गौरी:**—नाहीं दडवीत हो ललिते ! तूं आपली दृष्टि त्यांच्यावर ठेव म्हणजे माझ्या नजरेस ते पडणार नाहींत.

**ललि॰:**—मी कशाला त्यांच्यावर नजर ठेऊं ? त्यांच्यावर नजर ठेवायचें काम तुझं ! आम्ही काय आपल्या गरीब ! राजकन्येची दृष्टि जशी एखाद्या युवराजावर, तशी—

**गौरी:**—तुझीही त्यांच्या जवळपासच्या सागरासारख्या एखाद्या सरदारावरच असायची !-बोल ! आतां सांपडलीस कीं नाहीं ?

**ललि॰:**—पण तूंही सांपडलीस हें आहे का लक्षांत ?

**गौरी:**—( स्वगत ) अग हो, अंगावर बाजू आली खरी ! आतां गप्प बसावं झालं ( उघड ) जरा गप्प रहा, ऐक !

[ हुजऱ्या येतो.

**हुज॰:**—एक दूत आला आहे. आणि तो आत्तांच्या आत्तां आपलं दर्शन पाहिजे म्हणून विनंति करीत आहे.

**शांत॰:**—जा, त्याला घेऊन ये. ( हुजऱ्या जातो ) अमात्य ! या दूताचं काय बरं एवढं घाईचं काम असावं ?

[ दूत येतो. ]

**दूत:**—महाराजांचा जयजयकार असो !

**शांत॰:**—बोल, तुझी काय विनंति आहे ?

**दूतः**—महाराज ! या युवराजमहोत्सवाच्या वेळीं आपल्याला एक भयंकर बातमी कळवायचा माझ्यासारख्या गरिबावर प्रसंग आला, याबद्दल महाराजांचा राग होऊं नये. यमुनातटाकच्या प्रदेशांमध्यें चांचे लोकांनीं लुटालूट आरंभिली आहे. नदीकांठचीं गांवं लुटून जाळून उध्वस्त करीत आहेत. वैश्य लोकांचीं जहाजं लुटल्यामुळं व्यापार बंद पडून प्रजेवर उपाशी मरण्याची पाळी आली आहे. आणि सर्वांत वाईट गोष्ट ही कीं, आमच्या डोळ्यांदेखत आमच्या आयाबहिणींच्या पातिव्रत्यावर घाला घालून आम्हांला जिवंतपणीं नरकयातना भोगायला लावताहेत. महाराज ! या कपटी विश्वासघातकी लोकांच्या त्रासांतून आम्हांला वांचवा !

**शांत०:**—काय ? हा शांतनुराजा जिवंत असतांना या नीच, दगलबाज, लुटारू चांचे लोकांनीं त्याच्या प्रजेला त्रास द्यावा ! पृथ्वीतलावरील सर्व राजे, महाराजे ज्याच्या सिंहासनापुढं नम्र होतात, देवदानवांनाही ज्याच्या यशोध्वजापुढं पळ काढावा लागतो, यक्षकिन्नरही दिगंतरीं ज्याच्या कीर्तीच्या गीतांचे आलाप काढतात, तो शांतनुराजा आज नामशेष झाला अशी या मूर्ख लोकांची समजूत आहे का ? ठीक आहे. दूता ! तूं विश्रांति घे ! हा दरबार संपतांच सैन्य घेऊन आम्ही स्वतः या स्वारीवर निघण्याची तयारी करतों.

**भीष्मः**—महाराज ! या भीष्माला—आपल्या आवडत्या पुत्राला या स्वारीवर जाण्याची आज्ञा व्हावी ! महाराजांच्या कृपेनं आजच मी युवराजपदावर आरूढ झालों, आणि अशा या मंगल प्रसंगीं आमच्या क्षत्रियवृत्तीला उत्तेजन देणारी युद्धवार्ता मंगलप्रदच समजली पाहिजे ! हा शुभ शकून आहे, आणि महाराजांच्या आशीर्वादाचं आणि प्रजेच्या शुभेच्छेचं कवच असल्यावर हा भीष्म काळालाही भीक घालणार नाहीं.

**शांत०:**—युवराज ! तुझा हा उत्साह पाहून मला खरोखर आनंद वाटतो ! पण आतांच ज्या मुखानं मी तुला युवराज असं म्हटलं, त्याच मुखानं मी तुला काळाच्या दाढेंत शीर म्हणून आज्ञा करणं माझ्या पितृप्रेमाला शोभत नाहीं. एखाद्या बलिष्ट राष्ट्रावर स्वारी करायला जा म्हणून मी तुला निरोप देईन, एखाद्या अतिरथ्याशीं झुंज धरून त्याचा गर्व हरण कर, म्हणून मी तुला सांगेन—किंवा प्रत्यक्ष तुझ्या गुरूशीं—त्या भार्गवरामाशीं दोन हात करून त्याला चीत

कर, म्हणून मी तुला आज्ञा करीन. पण तुझ्यासारख्या सुकुमार बालकाला तूं कपटाच्या आगींत उडी घे, म्हणून मी कसं म्हणूं ?

भीष्मः—महाराज ! काय मला आपण अद्याप सुकुमार बालक समजतां ? मी बालक असेन पण ह्या बालकाचा पराक्रम अतिदारुण आहे. सिंहाचा छावा मदोन्मत्त ऐरावताचा गर्व हरण करीत नाहीं का ? वायुपुत्र बजरंगानं जन्माला येतांच सुर्यबिंबाला हात घातला नाहीं का ? लवांकुशांनीं अश्वमेधयुद्धाच्या प्रसंगीं एकक्षणीं रामाला जर्जर करून सोडलं नाहीं का ? महाराज ! आपल्याला माहीत नाहीं, हा भीष्म, भीष्म कसा झाला तो ? गुरूही भार्गवरामाच्या आश्रमांत अस्त्रविद्येचें अध्ययन करीत असतांना एके दिवशीं सूर्यास्ताच्या वेळीं, पूर्वक्षितिजावर एक धनुष्य प्रकाशित झालं. बाळपणाच्या लीलेनं मी एका बाणानं सहज या धनुष्याचा भंग केला. आपल्या धनुष्याचा भंग झालेला पाहून इंद्र क्रोधा-यमान होऊन मला चुरडून टाकण्याकरितां त्यानं माझ्यावर ऐरावत घातला. पण माझ्या मस्तकावर इंद्रवज्राचा आघात होण्यापूर्वीं, महाराज ! या सुकुमार बाल-कानं एका बाणानं ऐरावताला खालीं लोळवला आणि इंद्राला धूळ खायला लावली ! त्या वेळीं सर्व देव भयभीत 'होऊन हा भीष्म ! हा भीष्म !' म्हणून आक्रोश करूं लागले. मग गुरुमहाराजांनीं देवांना अभय देऊन इंद्राकडून माझी क्षमा मागविली आणि तेव्हांपासून सर्व जग मला भीष्म ! भीष्म ! म्हणूं लागलं ! महाराज ! ऐरावताच्या पायाच्या भारानंही ज्या देहाला काडीमात्र इजा झाली नाहीं, त्या देहाला आपण सुकुमार समजतां ना ?

( पद ३—राग अडाणा ताल त्रिताल )

सुकुमार कां। वनराज मत्त गजांना। उधळी कैसा
क्षणांत। दशदिशांना ॥ धृ० ॥ द्या मज आज्ञा। हीच
प्रतिज्ञा। भीष्म बळें वधिन खलां सच। पल न जाता ॥१॥

शांत०:—भीष्मा ! शाबास ! तुझ्य पराक्रमाबद्दल संशय घेणारा वीर त्रिभुवनांतही मिळणार नाहीं. युद्धांत जसा तूं इंद्रालाही अजिंक्य आहेस, तसाच राज्यकारभाराचा भार शिरावर घ्यायला तूं शांतनुपेक्षांही लायक आहेस हें जगाच्या अनुभवाला आणावंस, हीच माझी इच्छा आहे.

**गौरी:**—( स्वगत ) त्याचप्रमाणं कोणच्याही कन्येला मग ती देवकन्या असो, अप्सरा असो, ऋषिकन्या असो, राजकन्या असो, किंवा माझ्यासारखी भूमिकन्या असो, तिला आपण लायकच आहां, हें नाहीं का आपल्या लोकांना दाखवितां यायचं ?

**शांत०:**—भीष्मा ! हे चांचे लोक अति नीच आणि मोठे कपटी असतात ! त्यांचीं कृष्णकारस्थानं तुझ्यासारख्या निष्कपटी व सरळ वीराच्या स्वप्नींही येणार नाहींत. मी राजा आहें, आणि राजाला प्रजेचं दुःख हरण करण्याकरितां वेळ पडेल त्याप्रमाणें युक्ति लढवून दुष्टांचा नायनाट करावा लागतो. पित्राज्ञा प्रमाण मानून, माझ्या पश्चात् तूं कारभार पहा-सेनापति ! निवडक दर्यावर्दी सैन्य आणि जहाजं सज्ज करण्याबद्दल आज्ञा करा आणि आमची अजिंक्यनौका यमुनेच्या प्रवाहांत लोटून द्या ! अमात्य ! आपल्या अनुभवाचा व ज्ञानाचा फायदा भीष्माला द्यायला जरी तुम्हीं तयार असलांत, तरी तो घेण्याचा प्रसंग भीष्मावर खास येणार नाहीं. तरी वेळीं आपल्या हातून योग्य तेंच आचरण होईल, अशी माझी खात्री आहे. राजगुरु ! आपला आशीर्वाद मला असावा ! या दरबारांतून राजवाड्यांत न जातां आमची स्वारी परस्पर यमुनातटाकीं जाणार ! पौरजनहो ! मिरवणूक काढून, दीपोत्सवाची शोभा दाखवून, युवराजांना राजवाड्यांत विश्रांति घ्यायला परवानगी द्या.

( पडदा पडतो. )

## प्रवेश दुसरा.

स्थळ—रस्ता.

[ सागर प्रवेश करितो. ]

**साग०:**—शांतनुमहाराज स्वारीवर गेले, तरी युवराजांनीं राज्यकारभार इतका सुव्यवस्थित चालविला आहे कीं, प्रत्येक दरबारी तोंडांत बोट घालीत आहे. बृहस्पतिवाचस्पतींसारख्या कांहीं अहंमन्य ऋषींनीं भीष्ममहाराजांना पोरं समजून कारभारांत घोटाळा उडविण्याचा प्रयत्न केला, पण युवराजांनीं शहाणपणानं आणि न्यायदृष्टीनं बिलकुल बखडा होऊं दिला नाहीं. शांतनुमहाराज

बंडखोरांचा पुरा बंदोबस्त करून येईतोंपर्यंत लोकमताचं गुप्तपणानं निरीक्षण करायचं आपलं नेहमींचं काम नीट वजावलं पाहिजे.—अरे, हे कोण! हे बृहस्पति-वाचस्पति! आज राजगुरूंनीं दोघांचीही दरबारांत योग्य संभावना केल्यामुळं चिडून गेले आहेत. इथं बाजूला उभं राहून काय बोलत आहेत हें ऐकूं तर खरं. [ वाचस्पति व बृहस्पति येतात. ]

**वाच०:**—आतां कांहीं आपण दरबारांत पाऊल म्हणून ठेवणारं नाहीं! राजगुरु झाला म्हणून काय झालं! माझा असा अपमान?

**बृह०:**—आणि तुमच्यामुळं माझ्यावरही शिंतोडा! तुमचा करायला कारण तरी झालं—

**वाच०:**—मी एका शब्दावर अडलों,—नाहीं वेळेवर माणसाला आठवत. पण सर्व ऋषींसमक्ष त्यांनीं माझी अशी ही करायची नव्हती! आपण आपला झा केला, कीं आतां म्हणून कांहीं हें करायचं नाहीं!

**साग०:**—( स्वगत ) हें हा आणि हे आणि ही, तुझ्या अंतापर्यंत बाबा तुला सुटणार नाहींत!

**वाच०:**—म्हणतो कसं. तुम्ही वाचस्पति! मग हे हे हा हा करीत काय बसतां? नीट शब्दांची योजना करून बोला. नाहीं तर काय बोलायचं असेल, तें पाठ करून येत जा—पाठ करूनच जर बोलायचं तर मग आम्ही नांवाचे-हे कसले?

**साग०:**—( स्वगत ) बिचाऱ्याला स्वतःचं नांवसुद्धां वेळेवर आठवत नाहीं.

**वाच०:**—मला एकदां बापाचं नांव आठवलं नाहीं. मी आपलं हे म्हटलं!—लागला गाढव हंसायला! तो हंसला, लागले सगळे ऋषि हंसायला.-पण गुलामांनो! म्हण सुद्धां पडली आहे कीं, ऋषींचं कुळ आणि नदीचं मूळ कुणी शोधूं नये!

**साग०:**—( स्वगत ) आपला बाप कोण, तें कांहीं या मुनिवर्यांना माहीत नाहीं तर मग!

**बृह०:**—राजगुरु आहेत ना? महाराजांना पूज्य आहेत! बाकी विद्वत्तेच्या नांवानं खरोखरच पूज्य!

**वाच०:**—आणि महाराजांनीं हा असला राजगुरु नेमावा !-महाराज तरी काय ! आम्हा ऋषींना बोलायला कांहीं भीति नाहीं. फार तर काय, आपलं हें करतील !

**बृह०:**—आणि हें केलं म्हणून काय होणार आहे ?

**साग०:**—( स्वगत ) या हेच अनुभव मिळाल्याशिवाय कांहीं यांचीं डोकीं ताळ्यावर येणार नाहींत !

**बृह०:**—यांची राणी म्हणे गंगा !-कुणी तरी गंगाभागिर्थी भेटली, केला तिच्याशीं गांधर्वविवाह, झाली ती पट्टराणी ! तिला झालीं जुळीं आठ पोरं ! तिनं केल्या बालहत्या ! झालं पोर, की टाक नदींत !-शेवटीं महाराज रागावले, म्हणून दिलान् जाऊन नदींत जीव !

**साग०:**—( स्वगत ) पहा ! खऱ्याचा कसा विपर्यास होतो तो !

**वाच०:**—आमच्या महाराजांचं होत नाहीं आतां लग्न ! चाळीसावं वर्ष आहे त्यांना आतां ! अहो, कोण आपली ही देतो ?

**बृह०:**—आपण तर खास आपली ही देणार नाहीं ?

**साग०:**—( स्वगत ) त्याची ही म्हणजे मुलगी आणि हा बृहस्पति वरून चालतो आहे बायको ! अर्थाचा अनर्थ !

**बृह०:**—बरं ऐका पुढं ! महाराज गेले शिकारीला. तिथं सांपडला एक मुलगा ! दिसला जरासा शूर, तेव्हां म्हणे तो माझाच मुलगा ! घरीं आणला आणि केला युवराज ! त्याचं वय म्हणे वीस वर्षांचं ! महाराजांपेक्षां थिप्पाड ! वीस वर्षांचं बाळ ! वारे वा !

**वाच०:**—आणि त्याला आमच्यावर हा नेमला आहे. राज्यकारभार म्हणजे पोरखेळ नाहीं !

**बृह०:**—नाहीं त्याचं कुळ माहीत, नाहीं त्याचं गोत्र माहीत ! असेल कम-अस्सल बेटा !

**वाच०:**—आपल्या त्या ह्यासारखा !

**बृह०:**—सागरासारखा !-बेटा सरदार झाला आहे आतां ! महाराज काय हे जातगोताकडं कांहीं पहात नाहींत.

**साग०:**—( स्वगत ) आमचा इतिहास काय निघतो बघूं या.

बृह०:—वाचस्पति ! हा सागर महाराजांच्या एखाद्या दासीचा पुत्र दिसतो आहे. कांरे त्याच्यावर महाराजांचं उगीच प्रेम ?

साग०:—( स्वगत ) पहा या बृहस्पतीचे कसे तारे तुटत आहेत ते !

वाच०—आतां त्याला हा केळाच आहे, घेतील त्याला एकदां आपल्या ह्यांत मिसळून !

बृह०:—राजगुरु आहेतच शास्त्राधार काढून द्यायला ! कमअस्सल बेटा ! ( सागर शिंकतो ) कोण सागरसाहेब ? वाः ! आपली भेट झाली फार नामी झालं ! आम्हीं म्हणत होतों कीं भीष्ममहाराजांच्या हातून राज्यकारभार विशेष कांहीं—पण नाहीं नाहीं—बरा होतो. आहेत—होतकरू आहेत. बाकी व्यवहारज्ञान जरा—आहे बरं आहे. पण राजगुरु—

साग०:—फार चांगले—योग्य आहेत !

बृह०:—आहेत. - आहेत. पण जरा थोडे वयातीत आहेत !

वाच०:—युवराज भीष्मांना राजगुरु म्हणजे जरा आमच्यासारखा हाच पाहिजे होता.

बृह०:—कशी बोलला ! पण तुमच्यापेक्षां राजगुरूच्या पदाला आमच्यासारखाच जास्त योग्य !

साग०:—नाहीं. आपण दोघेही राजगुरूच्या पदाला खरोखरच योग्य आहां.

बृह०:—कशी बोललांत ! का वाचस्पति ! मी म्हटलं नाहीं ? सरदार असावेत, तर यांच्यासारखे ! कुलीन ! घरंदाज !

वाच०:—मी जर भीष्ममहाराजांचा हा झालों, तर खास ह्यांना हें करीन.

साग०:—( स्वागत ) या असल्या ऋषींच्या वचनांचे आधार दाखवून आमचे वंशज बऱ्यावाईट गोष्टी ठरवितील तर खास फसतील. या स्वार्थसाधु, भोंदु ऋषींच्या बडबडीकडं लक्ष्य देण्यांत काय अर्थ ?—चला ! संध्याकाळ झाली, आपल्याला नाहीं आतां वेळ ! राजवाड्यांत जाऊन महाराजांकडील कांहीं बातमी आहे का पाहूं या ! [ जातो. ]

वाच०:—कायहो बृहस्पति ! माझ्या बोलण्यावर हें न देतां हा निघून गेला ! कायहो हा गृहस्थ !

बृह०:—अहो गृहस्थ कसला ? याला कोण गृहस्थ म्हणणार ? याला ना रीत ना भात ! महाराजांचा कारभार आहे म्हणून फावलं आहे यांचं.

वाच०:—राजगुरूसारखं !

बृह०:—आतां पहा कशी गम्मत होते ती ! महाराज स्वारीवर गेले ! भीष्म युवराज कारभार पहाणार ! ते पडले कमअस्सल !—आडवूं नका. आम्ही म्हणणार ! आम्हांला नाहीं त्यांच्या आईबापांचा पत्ता.—बरं ! ते पडले कमअस्सल ! ते पाठवतील महाराजांवर मारेकरी ! ते करतील त्यांना ठार ! मग भीष्म बसणार सिंहासनावर आणि ते होणार महाराज !

वाच०:—मग होणार त्यांचा हा !

बृह०:—तुम्ही व्हा कीं त्यांचे हा, पण मी होणार राजगुरु !

वाच०:—मीच होणार राजगुरु ! माझ्या मनांतून राजगुरुच म्हणायच होत, पण, मला त्याचा हाच आठवेना !

बृह०:—तुमच्यासारख्या शब्द न आठवल्यामुळं हा हा करणाऱ्या पंडितांना राजगुरुपद कसं मिळणार ? मी आहे बृहस्पति ! आणि भीष्मासारखा होतकरू राजाला माझ्यासारखाच राजगुरु पाहिजे.

वाच०:—आपल्याला आपल्या ह्याची फार हे झाली आहे, पण लक्ष्यांत ठेवा कीं, हा ही कांहीं अगदीं हा नाहीं.

बृह०:—अरे तुझी कुळकथा मला माहीत आहे. तुला जर आपले भावी महाराज राजगुरु करूं लागले तर तुझा एकंदर इतिहास कानावर घालीन.

वाच०:—मग घाल ना ! मी काय मग गप्प बसेन वाटतं ! मी वाचस्पति म्हणजे इंद्राच्या देवगुरूचा अवतार आहे. मी कसा हा बसेन ?

बृह०:—मीच गुरु ! प्रत्यक्ष बृहस्पति !

वाच०:—मीच गुरु ! प्रत्यक्ष वाचस्पति !

बृह०:—गुरुला दोन्ही नांवं असली, तरी तूं कांहीं तो नाहींस आपली विद्वत्ता अगाध हिरकणी आणि गळीं कांचेचा मणि !

वाच०:—आणि तुझं ? नांव बृहस्पति आणि ह्याचा हा पति !

बृह०:—अरे जा गाढवाच्या—

**वाच०**:—तुम्ही तर आतां अगदीं ह्याच्यावर आलां ! आपण जर भांडूं लागलों, तर आपलीं सारीं बिंगं लोकांना कळतील ! आणि मग तुम्हीही राजगुरु होणार नाहीं—आणि मीही होणार नाहीं.

**बृह०**:—तेव्हां आतां अशी युक्ति काढूं. भीष्म, महाराज झाले म्हणजे आपण दोघेही राजगुरु म्हणून भागीनं काम चालवूं ! महाराज म्हणजे इंद्र ! आणि आपण दोघे एकरूप भिन्नदेह बृहस्पति वाचस्पति त्यांचे राजगुरु ! मग जुळलं कीं नाहीं ?

**वाच०**:—तुम्ही खरोखर हे आहां ! अगदीं सोळा आणे ही काढलीत ! पण आपली सगळी ही पार पडायला भीष्म हे झाले पाहिजेत !-चला आतां ह्यांत जाऊं. [ जातात. ]

## प्रवेश तिसरा.

**स्थळ**—गौरीचा वाडा.

[ गौरी प्रवेश करते. ]

**गौरी**:०—हस्तिनापूर पहावं, म्हणून मी इथं आलें,—कीं या महोत्सवाच्या गमती पहाव्या म्हणून आलें,—कीं उगीच कांहीं तरी मनाला वाटलं म्हणून आलें ?—या कांहीं तरीचा मागमूस आतां मला लागला !—युवराजांची कीर्ति मी आजपर्यंत ऐकली असेल, युवराजांच्या पराक्रमांच्या गोष्टीही मला समजल्या असतील, त्यांच्या गुणांचीं वर्णनंही माझ्या कानावर आली असतील; पण परवां युवराजांची प्रत्यक्ष मूर्ति पाहिल्यापासून एक क्षण असा जात नाहीं कीं, युवराजांचा गोड विचार माझ्या मनाला गुदगुल्या करून गेला नाहीं ! ध्यानीं नाहीं, स्वप्नीं नाहीं, अशा एकमेकांपासून दूर दूर वास करणाऱ्या दोन जीवांमध्यें प्रीतीची विद्युल्लता असं दूतीचं काम करीत असते ! हा प्रेमवायु युवराजांच्या हृदयपुष्पाचे पराग माझ्या हृदयकलिकेवर ठेवून केव्हां बरं पळून गेला ? या भामट्यानं युवराजांचं मन चोरणारी मीच चोर आहें, असा आळ माझ्यावर घालण्याकरितां हा उपद्व्याप केला असेल, नाहीं तर काय ? पण मी नाहींहो हटायची

युवराजांनीं जर मला विचारलं, कीं माझं मन कुठं आहे? तर तें काय माझ्याजवळ आहे म्हणून सांगूं? मी म्हणेन, कीं आपणच चोरी करून माझ्यावर आळ घालण्याकरितां ही सगळी मसलत केली वाटतं!—मग ते काय बरं म्हणतील?—कांहीं का म्हणेनात, मी त्यांच्याशीं मुळींच बोलायची नाहीं. [ ललिता येते. ]

( पद ४—राग देस ताल त्रिताल )

**छळितां मज कां नाथा । कामपाशिं मन पळवुनि कोण नेत ॥ धृ० ॥ 'चोर चोर' उलटे मज वदतां । लूट हातीं नेता । उरीं दुधारा मारुनि जाता । नच साजे कृति कांता । मम मन कोण नेत ॥ १ ॥**

**ललि०:**—कायग गौरी! एवढी चपापलीस कांग?

**गौरी:**—कोण मी? मी का चपापेन? मीं काय कुणाची चोरीबिरी केली आहे कीं काय?

**ललि०:**—चोरी केली नाहींस, मग कांग चपापलीस? चोरटी कुठली!

**गौरी:**—कोण मी चोरटी?

**ललि०:**—हो चोरटी! आणि चोरी केल्याबद्दल कांहीं वाटतही नाहीं! गुप्त हेरांच्या सरदाराकडे तपासालासुद्धां गेलं आहे काम! मला आत्तांच समजलं.

**गौरी:**—कायग मीं चोरलं? मला काय कमी आहे! मी कशाला कुणाची चोरी करीन!

**ललि०:**—कमी असेल त्याचीच चोरी होते, असं नाहीं? मोठे मोठे श्रीमंत लोकही दुसऱ्याच्या धनाची चोरी करतात! तूं काय, त्यांतलीच! सांगूं कुणाची चोरी केलीस तें.

**गौरी:**—सांग बरं?—सांगच!

**ललि०:**—सांगूं?—सांगूं?—सांगूं?—बरं तर सांगतेंच!

**गौरी**—सांगच! कुणाची?

**ललि०:**—युवराजांची! कांग लाजलीस? आतां सांगूं का कसली तें? युवराजांच्या मनावर भरदरबारांत हल्ला केलास ना? सागर सांगत होते—पण मी पुढं सांगतच नाहीं!

**गौरी:**—न सांगेनास कां!—पण सागराच्या आणि आपल्या प्रेमाच्या कथा काय काय चालल्या होत्या, त्या तर सांग?

**ललि०**:—तरी म्हटलं गौरी आहे! युवराजांची हकीगत ऐकायला हवी म्हणून माझ्यावर शह ठेवायला पाहाते! बरं, ऐका वरं ताईसाहेब! युवराज साग-राजवळ आपल्या संबंधानं चौकशी करीत होते. तूं कोण-कुठली-काय-सारं त्यांनीं विचारून घेतलं. मला त्या दिवशींच वाटलं, प्रेमरणांगणावर चाललेल्या या अस्त्रविद्याधनुर्वेद्येच्या युद्धांत तूं कांहीं त्यांना हार जाणार नाहींस!

( पद ५—चाल उनके पेहलू )

**प्रणयगौरी विजयी तो युवराजा हरला । नयन बाणें**
**जिव तो घाबरला बावरला हृदिं त्या कोंडुनि कां प्रेमवलें**
**आळविला । श्वान लागे चरणीं परि दया न मानिनिला ॥ १ ॥**

**गौरी**:—पुरें कर हो. अशी जर तूं थट्टा करशील तर मी बाबांना सांगेन, चला एकदां आपल्या राजधानीला! मग सागरांची आणि तुझी कशी भेट होते, ती पाहीन!—पण हे पहा, बाबाच आले! [ वीरध्वज येतो. ]

**वीर०**:—गौरी! उद्यांच निघायचा बेत ठरला. समारंभ झाला, नगर पाहिलं, भेटी परत भेटीही झाल्या; आतां कांहीं काम उरलं नाहीं. युवराजांची परवानगी घ्यायला आतांच निघालों. तों म्हटलं अगोदर तुला भेटून जावं! उद्यांच निघायची तयारी कर हं ललिते!

**ललि०**:—माझी तयारी आहे! गौरीलाही असं झालं आहे कीं, केव्हां एकदां नगराला जातें बाई! तेव्हां म्हणतें, उद्यां निघायला कांहीं हरकत नाहीं.

**गौरी**:—( हळू ) चीप बैस हं!—बाबा! मी किनई आजच—

**ललि०**:—बघा राजेसाहेब!—हिची तर आजच निघायची तयारी आहे.

**वीर०**:—आज कसं निघतां येतं! पण गौरी इथं कंटाळली असली, तर बाहनों, निघायचा बेत करतां येतो का!

**ललि०**:—मग कराच.

**गौरी**:—ललिते! बाबांना जाऊं दे म्हणजे सांगते तुला!—बाबा!—मला कांहीं कंटाळा आला नाहीं न कांहीं नाहीं—पण—

**वीर०**:—तुला संकोच नको वाटूं देऊंस; मी आज बघतों जुळेल तर!

**गौरी०**:—तसं नव्हे बाबा! मला अजून इथं पुष्कळ पहायचं आहे! या सगळ्या गडबडींत आणि गर्दीत मीं कांहीं देखील पहायलं नाहीं.

ललि०:—युवराज कोणते हे सुद्धां तिला माहीत नाहीं ! मला विचारीत होती कोणते म्हणून !

वीर०:—असं ? मग हिनं काय पाहिलं ! हिनं कांहीं जर पाहिलं , युवराजासारखी ठळक व्यक्ति जर हिच्या नजरेस आली नाहीं, तर हीं आलीं कशाला ?

ललि०:—मी तरी तेंच म्हणतें !—आणि मग ही इथं आणखी राहून तरी काय पहाणार ! म्हणून म्हणतें निघावंच आज !

गौरी—दाखवतें तुला अं !—बाबा, ही अशीच थट्टा करायची ! ती कंटाळली असली, तर जाऊं द्या तिला. मी कांहीं महिनाभर यायची नाहीं ! मला कित्ती तरी पहायचं आहे अजून ! नकाना जाऊं एव्हां !

वीर०:—मला गेलंच पाहिजे ! राजधानी सोडून राजेलोकांनीं कारणावांचून दूर राहणं मला पसंत नाहीं.

गौरी०:—मग तुम्ही जा. मी नाहीं यायची ! एक महिन्यानं येईन. मला लवाजम्याचीही गरज नाहीं. एखादा सरदार आणि पांचपन्नास माणसं ठेवा, म्हणजे झालं

वीर०:—बरं तर ! या ललितेच्या बापालाच ठेवतों इथं, म्हणजे ललिताही तुझ्याबरोबर राहील. तुला एकटीला कंटाळा येईल.

गौरी:—कुणालाही ठेवा ! ललिता कंटाळली आहे, तिच्या वडिलांना कशाला ठेवतां ! दुसरा कोणी कम सरदार ठेवाना.

वीर०:—नको, त्यांनाच असूं दे. ललिता आणि तूं—दोघी एका ठिकाणीं असल्यात म्हणजे ललितागौरीच शोभतां ! बरं, मी युवराजांची भेट घेतों आणि उद्यां जायचं नक्की करतों. [ वीरध्वज जातो ]

ललि०:—बघ,, मला कांहीं तरी सायास पडले का राहायला ?

गौरी:—तुला कशाला पडतील सायास, मी राहिलें म्हणजे तूं राहणार आणि मग सागराच्या भेटीही होणार हें ठरलेलंच होतं हें ! मला बाई धास्ती पडली कीं, बाबा ऐकतात कीं नाहीं, पण बाई ऐकलं !

ललि०:—तुला कांहीं धास्ती नको होती वाटायला ! युवराजांनीं हरतऱ्हा करून तुझ्याकरितां त्यांना ठेऊन घेतलं असतं ! ज्याचं त्याचं आपल्या सुखाकडे लक्ष्य !

**गौरी**:—अगदीं खरं बोललीस—ज्याचं त्याचं आपल्या सुखावर लक्ष्य ! पाहिजे कां आणखी व्हायला ? लक्ष्यांत ठेव, आजचं उट्टं केव्हां तरी निघेल बरं ! ( चंद्रिका येते. ) कायग चंद्रिके, कां आलीस ?

**चंद्रि०**:—ललिताबाईंना बोलावणं आलं आहे.

**ललि०**:—कोण ग आलं आहे ?

**चंद्रि०**:—तें कांहीं मला माहीत नाहीं. पण तुम्हांला बोलावलं आहे म्हणून त्यांनीं सांगतलं ! [ चंद्रिका गौरीला खुणावते. ]

**ललि०**:—होय का ! मग मी आतां येतें बाई !

**गौरी**: अग, पण एवढी घाई कां ? नीट उतर हो जिन्यांतून ! नाहीं तर गडबडींत ठेंच लागेल !

**ललि०**:— तसंच बरं, थट्टा नको करायला कांहीं ! येतें बरं ! ( जाते )

**गौरी**:—कायग चंद्रिके ? सागरच आले होते वाटतं !

**चंद्रि**:—तेच होते ! पण ताईसाहेब ! ते आपल्या नेहमीच्या रूपानं नाहीं आले ! अगदीं एका साधारण माणसासारखे आले ! हे सागर आहेत असं कुणालाही वाटलं नसतं !

**गौरी**: – मग तुलाग कसं कळलं ?

**चंद्रि०**—मला होय ? पुरुषांचीं सोंगं बायकांपुढं लपत नसतात ! मी ललिताबाई थोड्या आजारी आहेत असं पहिल्यानं खोटंच सांगितलं ! तसे ते बाई थोडे घाबरलेले दिसले ! आणि आतां त्यांना बरं वाटत आहे, मी ललिताबाईंना खालीं पाठवितें म्हटलं, तेव्हां त्यांना जरा बरं वाटल्यासारखं दिसलं !

**गौरी**:—असं का ! बरं—मला जरा फिरून यायचं आहे. रथ तयार करायला सांग जा. [ चंद्रिका जाते ]

**गौरी**:—( स्वगत ) युवराजांनीं मी कोण, काय, याची चौकशी केली तर ! ललिता म्हणते, ज्याचं त्याचं आपल्या सुखावर लक्ष्य, तें खरंच ? बाबा उद्यांच निघायचं आहे असं म्हणाले, आणि माझ्या हृदयांत काहूर उठलं ! युवराजांचं आपल्यावर प्रेम असेल, त्यांची मूर्ति डोळेभरून केव्हां तरी पहायला मिळेल, त्यांच्याशीं प्रेमाचे दोन शब्द बोलायला सांपडतील, या सुखदायक कल्पनांच्या माझ्या हृदयाच्या आकाशांत चमकणाऱ्या तारका बाबांच्या निष्ठुर शब्दांच्या धाकानं दिसेनाशा झाल्या ! पण बाई देवाला माझी करुणा आली, आणि




ळलिता—तसच बरं थट्टा नको करायला कांहीं ! येते बरं !

(पान १६)

त्यानं बावांच्या मनांत मला इथं ठेवायची प्रेरणा केली ! माझ्या हृदयाचं आकाश स्वच्छ झालं आणि पुन्हा गोड कल्पनांच्या तारका चमकूं लागल्या !—युवराजांची स्वारी या वेळीं प्रतीप–उद्यानांत गेली असेल ! आपण रथही त्या उद्यानाकडेच नेला तर ?–युवराजांचं दर्शन झालं आणि हे नेत्र तृप्त झाले, म्हणजे माझं मन आनंदाच्या अमलांत गुंग होऊन जाईल ! [ चंद्रिका येते. ]

( पद ६—राग दुर्गा ताल झपताल )

**नाचे मनकामना प्रणयपाना । नेत्र गात्र मम आतुर**
**कांना । त्या ध्याना ॥ ध्रु० ॥ नाथ तो तळपतां । शांति**
**ये हृदया । प्रणया न त्या भान सीमा ना ॥ १ ॥**

**चंद्रि:**—ताईसाहेब, रथ तयार आहे.

**गौरी:**—होय का ? चल तर. [ जातात. ]

## प्रवेश चवथा.

**स्थळ**—यमुना तीर.

[ शांतनु जहाजावरील मुख्य नाखव्याच्या वेषांत प्रवेश करितो. ]

**शांत०:**—( स्वगत ) या यमुनातीरच्या गरीब रहिवाशांच्या जीविताचं, अब्रूचं, धनाचं, रक्षण करण्याकरितां मला किती दक्ष असावं लागतं ! या चांचे लोकांवरील स्वारीमुळं माझ्या राजनिष्ठ प्रजेचं माझ्यावर किती प्रेम आहे, त्यांचीं सुखदुःखं काय आहेत, त्यांच्या इच्छाआकांक्षा कोठवर जातात, या साऱ्या गोष्टी समजून घ्यायची मला चांगली संधि मिळाली, आणि म्हणूनच या स्वारींत मीं नाखव्याचा वेष पत्करला. सकाळीं, संध्याकाळीं ज्याप्रमाणें आकाशाचे रंग पालटत असतात, त्याप्रमाणं मनुष्याच्या आयुष्याचे रंगही पालटत असतात. दिवस रात्रीचं रहाटगाडगं आपल्या आयुष्यक्रमांतही चाललेलं असतं. शांतवृत्तीनं राजमंदिरामध्यें राज्य करणाऱ्या शांतनूला आतां युद्धाच्या धुमश्चक्रींत शिरावं लागतं व या धुमश्चक्रींचा अंत पुन्हा शांततेंतच व्हायचा ! अहाहा ! किती शांत हा उषःकाल आहे ! प्रलयकालानंतर एका वडाच्या पानावर भगवंताचं सुखकमल एकटं असतांना सुद्धां अशी शांतता नसेल ! या शांतिदेवीच्या सान्निध्यानं या शांतनूचं

चित्त तरी किती शांत झालं आहे !—हा परिमल कसला बरं ! यानं मला गुंगवून टाकलं ! ( आंत मत्स्यगंधा हंसते. ) किती गोड ही हास्याची लकेर ! या हास्यानं या उषःकालचं सृष्टिदेवतेचं हास्यही फिकं पाडलं ! या सुगंधानं या वनश्रीच्या पुष्पगंधालाही लाजावलं ! हा सुगंध आणि हें हास्य उधळणारी अदृश्य देवता कुठं आहे !—हं, ती पहा, त्या खबदाडांतून कुणी तरी पाण्याकडं नौका लोटीत आहे. ( मत्स्यगंधा नौका लोटीत येते. )

**मत्स्य०**:—( नौका लोटीत ) या मेल्या दगडांनीं आणि रेतीनं बेजार केलं बाई ! ही नांव ढकलायला आज फारच जड जाते ! आतां ही पाण्यांत कशी जाणार ?

**शांत०**:—( स्वगत ) अहाहा ! काय हें सौंदर्य ! ही प्रत्यक्ष जलदेवता माझ्या भक्तीवर लुब्ध होऊन मला दर्शन देण्याकरतां तर अवतरली नाहीं ना ?

**मत्स्य०**:—( स्वगत ) आतां काय बाई करावं ? हा फत्तर आडवा आला ! आतां तर ही अगदींच अडकून राहिली !

**शांत०**:—( स्वगत ) या सुंदरीच्या जादूनं तर मी फत्तर बनलों नाहीं ना ? त्या फत्तरानं या नौकेला आडवून धरलं, तसं मी या सुंदरीला अडवून धरूं का ?

**मत्स्य०**:—( स्वगत ) अगदींच नाइलाज झाला ! अगबाई ! माझे हात अगदीं गळून गेले, ही ढकलतां ढकलतां ?

**शांत०**:—( स्वगत ) हिला लोटवत नाहीं खास. इचा अंत पहाण्यांत अर्थ नाहीं. ( उघड ) तूं सर बाजूला ! मी लोटतों ती नांव पाण्यांत !

**मत्स्य०**:—( आश्चर्यानें, स्वगत ) हे कोण ? रूप तरी किती गोड, आणि बांधा तरी किती मोहक ! यांना पाहतांच माझं मन प्रेमाच्या जादूनं वेडं झालं आहे ! मी यांच्याशीं बोलूं तरी काय ?

**शांत०**:—( स्वगत ) ही बोलत कां नाहीं ? ही मुकीबिकी तर नाहीं ना ? कसं बरं करावं !—हिच्यांशीं खुणांनींच बोललें पाहिजे.

[ " मी ढकलतों, " अशा अर्थाच्या खुणा करितो. ]

**मत्स्य०**:—( हंसून ) वाः ! आपण हावभाव फार छान करितां ! मुक्या जनावरांना देखील अडचण पडणार नाहीं आपलं म्हणणं समजायला ! चांगले हातवारे करितां !

[ पुन्हां हंसते. ]

शांतः—( स्वगत ) अरेच्या ! ही मुकी नाहीं. हिला बोलतां येतं ! चांगली फजिती झाली आमची !—पण मीच नाहीं का मूर्ख ! इतकं सुबक चित्र परमेश्वर मुकं ठेवील अशी कल्पना तरी माझ्या मनाला कशी शिवली !

मत्स्य०:—( स्वगत ) अगबाई ! मी हंसते काय ? यांना काय वाटेल ? ( उघड ) आपल्याला तावडतोब उत्तर दिलं नाहीं, म्हणून आपल्याला राग आला असेल; चुकी झाली माझी !

शांतः—मी लागतो लोटायला !

मत्स्यः—आपली इच्छा असेल तर लागा बापडे ! लोटतां ? करा जोर पाहूं ? हं लोटा—लोटा—करा जोर—शाबास !

शांतः—संसारसागरांतल्या खडकाळ प्रदेशांतून पार पाडण्याकरितां अशीच पुरुषाच्या शक्तीची गरज लागते, हें आलं का तुझ्या लक्षांत ? वादळांतून जहाज सुरक्षित नेण्याला जशी एखाद्या कुशल कर्णधाराची आवश्यकता असते, त्याप्रमाणंच आतां ज्या प्रवासाला तूं प्रारंभ करणार आहेस, तो सुगम व्हायला या सुकर्णाची आवश्यकता आहे. मी या नौकेचं सुकाणूं धरूं का ?

मत्स्य०:—( स्वगत ) हं ! इथपर्यंत मजल आली कां ? पण मी नाहीं बरं आपलं प्रेम उघड करायची ! बाबा काय म्हणतील ! आपल्याला राग आला आहे, असंच आपण दाखवावं !

शांत०:—तूं बोलत कां नाहींस ?

मत्स्य०:—काय बोलायचं ? अशा सकाळच्या रामपाऱ्यांत आपण जर भलतंच बोलायला लागलां, तर म्हणायचं तरी काय ? मी आपली एकटी सांपडलें म्हणून वाटतं ? आमचं रक्षण करण्याकरितां आलेला महाराजांचा एखादा खलाशी आमच्याच अब्रूवर दरवडा घालूं लागला, तर म्हणायचं तरी काय ?

शांत०:—मी महाराजांचाच खलाशी आहें, असं कशावरून ?

मत्स्य०:—कशावरून म्हणजे ? आपल्या कमरेला ती तरवार नाहीं का ?

शांत०:—म्हणजे ? तरवार कमरेला लटकावणारा प्रत्येक खलाशी महाराजांकडचाच आहे अशी तुझी समजूत आहे का ? मी यांचे लोकांपैकींच आहे, समजलीस.

**मत्स्य०**:—हें शक्यच नाहीं ? जे चांचेलोक आमच्या गांवांत दिवसाढवळ्या दरोडे घालीत असत, तेच चांचेलोक महाराजांच्या दराऱ्यानं आतां दऱ्याकोपऱ्यांत घुबडाप्रमाणं दडून बसले आहेत. महाराजांचे लोक त्यांना शोधून काढून चांगली शिक्षा करीत आहेत. आतां आमचे पुरुष तर काय पण माझ्यासारख्या पोरीबाळी सुद्धां वेळीं अवेळीं या यमुना नदींत वाटेल तिकडे नांवा नाचवीत असतात. आमच्या रक्षणाकरितां फिरणाऱ्या खलाशांशिवाय कुणाच्याही कमरेला तरवार असलेली मीं पाहिली नाहीं. शिवाय तुमचा पोशाखही सरकारी तऱ्हेचाच आहे. कां आतां पटलं ?

**शांत०**:—लपवून कशाला ठेऊं ? हो—पटलं. मी महाराजांच्या खास जहाजावरचा नाखवा आहें.

**मत्स्य०**:—आपण मला फसवायला पहात होतां नाहीं !—आपल्याला फार काम पडत असेल ?

**शांत०**:—फार नाहीं, फक्त एक काम पडतं. आणि तें किती दिवस पडणार आहे, कुणाला ठाऊक ?

**मत्स्य०**:—तें कोणचं ?

**शांत०**:—हा एकुलता एक जीव वहायचं.

**मत्स्य०**:—बरंच कठिण काम आहे हे !

**शांत०**:—मोठं कठिण ! फार कठिण ! मला तर जीव नकोसा झाला आहे !

**मत्स्य०**:—( त्याच्याकडे नीट पाहून ) आपल्याला जीव जरी नकोसा झाला असला तरी या आयुष्याच्या सफरींत दिसणारे चमत्कार पाहून तरी मनाला आनंद वाटेल ना ? (आकाशाकडे पाहून) तें पहा ! याला आम्ही दिवसरात्रीचा संयोग म्हणतों. असा चमत्कार पहाणं नशिबीं लागतं ! जन्माला यावं आणि हा संयोग पहावा ! पहा, झटकन पाहून घ्या. एका क्षणांत रंग बदलेला !

( पद ७—राग पिलु ताल त्रिताल )

सिरविती कवण वधुवर अंबरीं । नटुनि दिव्य चिरिं नव्या जरतारी ॥ ध्रु० ॥ शुभ्र शुभ्र नाचत कृष्ण तुरगांहि ।
चंद्रद्योत हा चंद्र गुलाबीहि ॥१॥ रविबिंबातुनि किरण शरांचे । उसळत कलिका घोस नव्याचे ॥ २ ॥

शांत०:—अहाहा! गोड—गोड—फारच गोड! (स्वगत) अहाहा! ही सुंदरी या देखाव्यांत किती तन्मय झाली आहे! या इच्या मुखचंद्राचा गुलाबी प्रकाश या पाण्यावर, नौकेवर, वल्ह्यावर सर्वत्र ठिकाणीं पसरला आहे. मी तर या सुप्रकाशांत गटांगळ्याच खातो आहें! (उघड) सुंदरी! आतांच आपण पाहिलेल्या दिनरजनींच्या वरातीप्रमाणें या नौकेच्या अश्वावर आपली ही वरात या यमुनानदीच्या कृष्ण आकाशांत काढूं ये!

मत्स्य०:—आपण फारच फाजील जायला लागलां! काढा नावेवरचा हात!

शांत०:—(नाव धरून) तूं चाललीसच?

मत्स्य०:—हो चाललेंच! आपण कांहींच्याकांहींच बोलतां, तेव्हां मी जाते आपली घरीं.

शांत०:—थांब, जरा थांब! तूं कोण आहेस, तें तरी मला सांग!

मत्स्य०:—मी कोण कां असेना! आपल्याला काय करायचं आहे त्याच्याशीं? माझ्यासारख्या एकाद्या क्षुल्लक कोळ्याच्या मुलीच्या नांवाची कां चौकशी?

शांत०:—त्या मोहक नांवाचा जप करण्याकरितां! रागवूं नकोस. मी वाईट बुद्धीनं नाहीं विचारलं. अकस्मात् आपली गांठ पडून, आपण दोघं मिळून जो काळ आनंदांत—प्रेमांत घालविला—

मत्स्य०:—मग तो आतां विसरून जा! असल्या गोष्टी ध्यानांत ठेवणं चांगलं नाहीं.

शांत०:—मी तरी हा प्रसंग आजन्म विसरणार नाहीं. सुंदरी! दया कर, तूं जर आपलं नांव न सांगतां इथून गेलीस, तर हा सुकर्ण वेडा होईल!

मत्स्य०:—मग होईना झाला तर! मला काय त्याच्याशीं करायचं आहे! आपल्याला भेटावं अशी इच्छाही मला कधीं व्हायची नाहीं

शांत०:—नको जाऊं, नको जाऊं, या मुखाचं चुंबन—

मत्स्य०:—हूं! धटिंगण कुठला! काढ हात.

[ शांतनु हात काढतो. मत्स्यगंधा वल्हवीत जाते. ]

शांत:—अरेरे! चीत—अगदीं चीत झालों! मी या भरतखंडाचा एवढा महाबलाढ्य सार्वभौम राजा, पण या एका पोरीनं मला फजीत करावं ना! कधीं माझ्या स्वप्नींही आलं नाहीं! असा खट्टू मीं आजन्मांत झालों नव्हतों. कोण

विचित्र ही मुलगी ! किती मनोहर ! किती मोहक रूप ! बांधा काय ! छबीदार, ऐटदार ! अहाहा ! ते काळेभोर नेत्र ! चमक तर काय ! आणि केशकलाप तरी किती सुंदर !–ती सुंदरी गेल्यापासून हें स्थळ शून्य दिसतं आहे !–या जागेची शोभा गेली कुठं ? तो पुष्पगंध गेला कुठं ! त्या पाखराचे मंजुळ बोल गेले कुठं !–हा तिचाच स्वर का ?–ती पहा, तीच ती ! छेः ! मी वेडा बनलों खास !—अरेरे, तिला राग यावा असे शब्द माझ्या मुखांतून निघावेत ना ? धिक् माझं जिणं !—माझ्याविषयीं तिचं किती वाईट मत झालं असेल !–धटिंगण कुठला ! मी धटिंगणासारखं तिच्याशीं वर्तन केलं !–निदान तिचा तसा समज झाला असलाच पाहिजे. जातां जातां माझ्याकडे किती तुच्छ दृष्टीनं पाहिलंन ! मी तर जागच्याजागीं गारठून गेलों ! ती खास कोळ्याची मुलगी नाहीं. धीवराच्या मुलीच्या अंगाला घाण यायची ! तिच्या आंगचा सुगंध केवळ स्वर्गीय ! मी देवकन्या आहें, असं ती म्हणाली असती तर मी तें खोटं मानलं नसतं.–शरीर किती डौलदार, हात किती गौंडस ! ती धीवर कन्या आहे असं ब्रह्मदेव आला तरी मी कबूल करणार नाहीं !-ती कोणी कां असेना, तिचा पिच्छा सोडतां कामा नये ! प्रेम आणि अपमान या दोहोंच्या आगीनं पेटलेला शांतनु त्या सुंदरीच्या प्रेमदृष्टीच्या अमृतवर्षावाखेरीज शांत कसा होईल !

**अंक पहिला समाप्त.**

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

**स्थळ**—गौरीचा वाडा.

[ ललिता व चंद्रिका प्रवेश करितात. ]

**ललि०**—कायग चंद्रिके ! गौरी कुठं आहे ? मी आज दोन दिवस तिच्याकरितां हेलपाटे खातें, पण बाई तिची भेटच नाहीं ! काल सकाळीं आलें. तेव्हां घरीं नव्हती; म्हणून आतां आज सांजची आलें, तरी सुद्धां घरीं नाहीं ? कुठं जाते बाई रोज अशी ?

**चंद्रि**:—मी आतां आपल्याकडेच येणार होतें, ताईसाहेब तिकडे गेल्या आहेत कीं काय तें पहायला ! पण आपणच इकडे आलां ! आपण राजेसाहेबांबरोबर या युवराज-समारंभाकरितां आलों, त्याला आज एक महिना झाला. समारंभ झाल्यावर चारदोन दिवसांतच राजेसाहेबांचा राजधानीला परत जायचा बेत होता; पण ताईसाहेबांचा हट्टच पडला, कीं आणखी महिनाभर तरी मी कांहीं यायची नाहीं. तेव्हां मुलीचें कोड पुरवण्याकरितां कांहीं सरंजामासह त्यांना इथं ठेवलं आणि राजेसाहेब राजधानीला निघून गेले. आतां ताईसाहेब काल म्हणाल्या, आणखी एक महिनाभर या हस्तिनापुरांतच रहायचं ! राजेसाहेबांना कळविण्याकरितां त्यांनीं काल स्वाराबरोबर खलितासुद्धां पाठविला.

**ललि०**:—स्वाराकडून जें काम केलं तें एखाद्या वीराच्या बाणाकडूनही करितां आलं असतं ! तुझ्या ताईसाहेबांनीं एक पत्र लिहून तें युवराजांच्या बाणाला बांधून त्यांच्याकडून तें राजेसाहेबांकडे पाठवलं असतं, म्हणजे कामही जलद झालं असतं, मुलीला पति कसा मिळेल याची काळजी त्यांना राहिली नसती, मुलीनं रहायचा हट्ट कां केला, हें त्यांना कळून आलं असतं, आणि जांवयाच्या पराक्रमाबद्दलही खात्री झाली असती !

**चंद्रि०**:—म्हणजे ?

**ललि०**:—म्हणजे काय ? अग युवराजांचं आणि ताईसाहेबांचं–हं !

चंद्रि०:—हं ?—मग त्या आतां युवराजांकडे तर नाहींना गेल्या ?

ललि०:—युवराजांकडेच गेल्या असतील ! पण राजवाड्यांत मात्र खास नाहींत. प्रणयी जोडपं एखाद्या संकेतस्थळींच भेटायचं ! अग युवराज भीष्माला तिनं अगदीं वेड लावलं आहे. गौरी कांहीं कमी नाहीं, समजलीस !

( पद ८—चाल कहांजाके बोलूं गवनुवा० )

**असें वेड लावी जिवां ना भान । नभीं श्वास सोडी मनीं हैराण ॥धृ०॥ समर शौर्य सारें तेंचि प्रेमवारें ॥१॥ राजकाज गांठी गुप्त प्रेमभेटी ॥ २ ॥ युद्ध हेर वार्ता प्रणय दूत येतां ॥ ३ ॥ ज्ञान धर्म शास्त्रें गौरि प्रेमअस्त्रें ॥४॥**

चंद्रि०:—मी इतकी त्यांच्याजवळ असतें, पण मलासुद्धां हें कसं कळलं नाहीं ?

ललि०:—आणि मी इतकी लांब असतें पण मला कसं माहीत झालं ? तूं सदा जवळ, पण डोळे मिटून असतेस ! मी दूर पण वेळेवरच हजर असतें !

चंद्रि०:—पण ताईसाहेब कधीं चिठीपत्रसुद्धां युवराजांना पाठवीत नाहींत. या हस्तनापुरांत मी ताईसाहेबांबरोबर नाटकं पाहिलीं. त्यांतल्या नायिका नेहमीं पत्रं पाठवितात. मग ताईसाहेबांनीं कां नाहीं मला विश्वासू दासी केलं ? माझ्याजवळ कां नाहीं त्यांनीं विरहव्यथा व्यक्त केली ?—मीं युवराजांना त्यांची हैराण स्थिति सांगितली असती; त्यांची प्रणयपत्रिका पोंचती केली असती, त्यांच्याकडून एखादी आंगठी ताईसाहेबांकडे आणली असती; मग ताईसाहेबांनीं मलाही एखादा कंठा बक्षीस दिला असता—

ललि०:—ताईसाहेबांना अजून सांग नाटकांतल्या नायिकेचे सगळे चाळे करायला ! मग पहा, ती तुला कशी बक्षीस देते ती ! अग ती गौरी आहे ! नाटकांतल्या नायिकेप्रमाणं ती मुळुमुळु रडत नाहीं बसायची ! प्रियकराला पत्रिकाबित्रिका नाहीं धाडायची ! लोहचुंबकाप्रमाणं प्रियकराचं चित्त आकर्षण करून मनाचे संदेश इच्छेनंच त्याला कळवायची ! फुकट फुकट तूं तिच्याजवळ राहिलीस !

चंद्रि०:—तर मग आमच्या ताईसाहेबांच्या गोष्टीवर नाटक कांहीं नीट नाहीं जमायचं ! नाटकांतल्या नायिकेप्रमाणं एखादी तरी कृति पाहिजे ! फुकट फुकट एवढी राजकन्या होऊन !

( पद ९—चाल क्यौं न लुटे मजा० )

**कां न करी मजा प्रेमदेवता। ना ये संधी पुनः लग्न लावितां। शय्या न घे प्रणयीं रमता। ना ती रुसे हंसें प्रीति दावितां ॥ १ ॥**

**ललि:०**—मग तुझं मत काय, कीं आपल्यावर पुढं नाटक व्हावं म्हणून प्रत्येक राजकन्येनं कांहींतरी ठराविक गोष्टी केल्याच पाहिजेत? चा!—पण ते पहा! दोघे ऋषि येत आहेत.

[ बृहस्पति, वाचस्पति येतात. ]

मुनिवर्यांना वंदन करतें.

दोघीही नमस्कार करतात. ]

**बृ० वा०:**—अष्टपुत्रा सौभाग्यवती भव!

**ललि०:**—काय हो मुनिवर्य! माझी एक शंका आहे; विचारूं का? आपण सगळ्या बायकांना 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' असा आशीर्वाद देतां; आपल्या पूर्वींचे सारे ऋषि हाच आशीर्वाद देत आले; राजेलोकांच्या जिवांवर आपलीं सर्व कर्मं चालविणाऱ्या वशिष्ठ–विश्वामित्रांनींही राजपत्न्यांना व राजकन्यांना हेच आशीर्वाद दिले; मग बहुतेक राजपत्न्या पुत्रविरहित कांहो होतात? राजाकडून इच्छाभोजन मागून पूर्ण तृप्त होऊनसुद्धां जर आपल्यासारख्या मुनींचे आशीर्वाद फळाला येत नाहींत, तर आशीर्वाद देणाऱ्यांच्या अंगीं ते पूर्ण करण्याचं सामर्थ्यच नाहीं, असं नाहीं का होत!

**बृह०:**—प्रश्न योग्य आहे. पण वशिष्ठ–विश्वामित्र मोठे कसले! आम्ही नाहीं त्यांना मोठे म्हणणार! त्यांचे आशीर्वाद निष्फळ झाले, त्यावरूनच पहा त्यांचं सामर्थ्य! आमचं असं नाहीं.

**वाच०:**—आमचे हे अगदीं हेच व्हायचे! त्यांत हेच नाहीं!

**बृह०:**—बरोबर बोललांत! पण ताईसाहेब कोणत्या? या का या—

[ दोघींकडे दाखवून ]

**ललि०:**—( चंद्रिकेकडे दाखवून ) या. [ बृ० वा० तिकडे जातात. ]

**चंद्रि०:**—( ललितेकडे दाखवून ) नाहीं, त्या.

[ बृ० वा० तिकडे जातात. ]

[ बृहस्पति–वाचस्पतींना दोघीही पांचसहा वेळां इकडून तिकडे नाचावितात. ]

**ललि०:**—( चंद्रि० दाखवून ) नाहीं, याच हो !–ताईसाहेब ! कां उगीच मुनिवर्यांची थट्टा करायची ! ते कां आलेत, कशाला आलेत, विचारून घ्या आणि करा त्यांची इच्छा पूर्ण !

**चंद्रि०:**—( ललितेस ) ताईसाहेब ! असं काय करितां ? कां उगीच मुनिवर्यांची चेष्टा करतां ? ते का आले आहेत, तें विचारून करा त्यांची इच्छा पूर्ण !

**चंद्रि०:**—ताईसाहेब ! आपला हा थट्टेखोर स्वभाव जाणार तरी कधीं ? कां उगीच मुनिवर्यांची थट्टा ! हे मुनिवर्य शांत पडले, म्हणून ! नाहीं तर एखाद्या दुर्वासासारखे असते, म्हणजे आपला हेतु न समजून एव्हांना आपल्याला शापून भस्म करते !

**बृह०:**—नाहीं, आम्ही सर्वज्ञ आहों. आमच्यापासून कोणालाही धास्ती नाहीं.

**वाच०:**—आम्ही अगदीं हे आहों. आमच्या ह्यापासून कोणालाही ही नाहीं !

[ चंद्रिकेची हंसून हंसून मुरकुंडी वळते. ललिता थोडी हंसते, पण पुनः गंभीर होते. ]

**ललि०:**—ताईसाहेबांचं हें असंच चालायचं ! ताईसाहेब ! आपलं असंच चालूं द्या. राजेसाहेब रागें भरतील मला, त्यांना जर कळलं मुनिवर्यांचा अपमान झाला म्हणून !–मुनिवर्य ! ताईसाहेबांच्या चुकीबद्दल मी क्षमा मागतें. मुनिवर्यांनीं कां येणं केलं ?

**वाच०:**—यांना हें करण्याकरितां !

**बृह०:**—ताईसाहेबांना दर्शन देण्याकरितां !–वीरध्वजराजेसाहेब राजधानीला गेले–पूर्वी त्यांच्या दरबारीं होतों. ताईसाहेबांना अंगाखांद्यावर खेळवलेल्या आहेत.

**वाच०:**—एकदां ताईसाहेबांनीं यांची ही–दाढी, धरली ! कांहीं केल्या सोडीनात ! शेवटीं यांनींही आणून हें केलं, तेव्हां ह्यांची ही झाली !

[ चंद्रिका अधिकच हंसते. ]



ललिता—ताईसाहेबांचं हें असंच चालायचं ! ( पान ३६ )

ललि०:—ताईसाहेबांचा हा अगदीं ह्यापासूनच असेल.

बृह०:—अगदीं पूर्वीपासून ह्याच स्वभाव !-पहा-पहा कशा हंसताहेत त्या !-ताईसाहेब ! वीरध्वज राजेसाहेबांनीं सांगून ठेवलं होतं, कीं ताईसाहेबांचा समाचार घेत जा.

वाच०:—तेव्हां मीं यांना हे केलं, कीं ह्यांत जाऊं आणि ह्यांचा हा घेऊं,

ललि०:—पण ह्या काय नुसत्या ह्याच करीत बसल्या आहेत ! ह्यासाहेब ! हे ह्याकरितां आले आहेत; तेव्हां यांना हें करा. ( चंद्रिका हंसून हंसून रडायला लागते ) मुनिवर्य ! ह्या आतां हेंच करणार, आपण आतां हें करा.

बृह०:—ठीक आहे. आम्ही आतां येतों तर ! ताईसाहेबांचा स्वभाव फार आनंदी ! येतों आम्ही ! [ बृ० वा० जातात. ]

ललि०:—( दारापर्यंत त्यांना पोंचवून परत येते. ) अग चंद्रिके ! अग सोड आतां बाईसाहेबांचे हें ! हेवर्य हे हे हे हे !

चं०:—पण ललिताबाई—हें ( हंसून बोबडी वळते. ) माझं पोट दुखायला लागलं !

ललि०:—मुनिवर्यांचा आशीर्वाद इतक्या लौकरच फळाला आला तर !

चंद्रि:—ही काय मेली थट्टा !

ललि०:—अग थट्टा कसली ? खरोखरच तुला आठ पुत्र होणार ! बरी गौरी घरीं नव्हती ! तिला या मुनींनीं असला आशीर्वाद दिला असता, तर या मुनींची चांगलीच शोभा झाली असती.

चंद्रि०:—बायकांना मुलं व्हावीं म्हणून इच्छा असेल; पण आठआठ सोळा सोळा व्हावीं, ~~म्हणून इच्छा धरणारी बायको वेडीच समजली पाहिजे~~ !

ललि०:—अग ह्या ऋषींच्या पुष्कळ गोष्टी सागराकडून ऐकल्या होत्या. तेव्हांपासून मला असं झालं होतं, कीं केव्हां त्यांची एकदां गांठ पडते. आतां अनायासं गांठ पडली, तेव्हां म्हटलं करूं या एकदां चांगली !

चंद्रि०:—पण ताईसाहेबांचा पत्ता काय ? मला तर अगदीं सुचेनासं झालं आहे.

ललि०:—अग तिच्याबद्दल कशाला काळजी करतेस ? येईल ती आतां. चल, आपण ह्यावर हें करूं, आणि ही आली म्हणजे तिला ह्या ह्याची ही सांगूं.

[ जातात. ]

## प्रवेश दुसरा.

—:०:—

स्थळ—डोंगराचा कडा व गुहा.

[ गौरी कड्यांतल्या गुहेंत उभी आहे. ]

**गौरी**:—( स्वगत ) युवराजांना झुकांडी देऊन कड्या डोंगरावरून उड्या घेत किती तरी जलद मी इथं आलें बाई ! ( खालीं पाहून ) अजून कांहीं त्यांचा मागमूस नाहीं ! ह्या लपंडावांत मीं कांहीं युवराजांना हार जायची नाहीं ! चाहूल ऐकूं येते. ( खाली पाहून ) छेः कुणी नाहीं. युवराजांना वाटत असेल कीं, माझ्यासारखा धांवणारा ह्या पृथ्वीच्या पाठीवर कुणीही नाहीं; आणि म्हणूनच त्यांनीं मला लपंडाव खेळायला लावलं. पण आतां त्यांना असं झालं असेल, कीं कुठून आपल्याला ही पैज लावायची बुद्धि झाली ! त्यांना मी सांपडेन; अशी आशाच करायला नको ! ( चाहूल ऐकून ) कुणीतरी आलं खास ! दुसरं कोण येणार युवराजाशिवाय ! आपण या लेण्यांत दडून वसावं ! ( लेण्याच्या तोंडांत जाते. भीष्म रक्तानें माखलेला धनुष्यबाणासहित येतो. ) आपल्या अंगावर हें रक्त कुठून आलं ?

**भीष्म**:—ते मग सांगेन; पण बोल आतां तुला हुडकून काढली कीं नाहीं ?

**गौरी**: पण अजून मला आपण पकडलं नाहीं ! मला शिपटाल, तेव्हांच पैज जिंकली, असं होईल. पण अगोदर आपलं शरीर रक्तबंबाळ कां, तें तर सांगा ? मला हुडकून काढण्याकरितां कड्यांतून, खवदाडांतून आपण हिंडत असतांना, आपलं हें सौंदर्य पाहून तरुवरांना आणि कड्यादगडांना सोडून कांटेरी वेलींनीं आपणांला आलिंगन दिलं नाहींना ?

( पद १०—राग काफी—ताल तिताल )

**नाथा त्या लतिकापाशीं कां हा शृंगार ॥ ध्रु० ॥**

**स्मितमुखि कर धरि । मुरडुनि मनहारि । अधरिं पदर**

**धरि भुलवि प्रिया ॥ १ ॥**

आपल्याला रक्तानं माखलेलं पाहून मला काय वाटेल सांगा पाहूं ! जिंका वरं !

**भीष्म**:—मला रक्तानं माखलेला पाहून गौरीला आनंदच झाला पाहिजे ? कारण भीष्म फक्त आपल्या वीरवृत्तीला साजेल असा पराक्रम करूनच रक्त-

बंबाळ व्हायचा ! लाडके गौरी ! या डोंगरांतल्या दगडाळ वाटेनं तुला वायुवेगानं पळतांना पाहून, कृष्णमेघामधून चंचल गतीनं धांवणाऱ्या चपलेसारखी मला भासलीस! या धांवत्या पांखराचा पाठलाग करितां करितां मीं एका कांटेरी गुंफेजवळून जात असतांना, काळव्यालाप्रमाणं भयंकर असे दोन निद्रिस्त सिंह मीं पाहिले ! त्या मृगराजांना बंदगी देऊन पुढं जाणं हेंच आम्हां वीरसिंहांचं कर्तव्य समजून मीं त्यांना जागं केलं ! प्रलयकालच्या मेघगर्जनेलाही फिकी पाडणारी भयंकर गर्जना करून ते दोन्ही सिंह माझ्या अंगावर तुटून पडले. पण धनुष्याला बाण न लावतां नुसत्या या बाहूंनीं त्या दोन्ही सिंहांना जमीनदोस्त करून यमसदनाला पाठविलं !—गौरी ? तुला शोधून काढायला उशीर लागला, याबद्दल रागाऊं नकोस—गौरी ! हंस ! अशीच हंस ! प्रियकराच्या शरिरांतून निघालेल्या रक्ताच्या चिळकांड्यांमुळं गौरीच्या हृदयाला आनंदाच्या उकळ्या आल्या, तर त्यांत नवल नाहीं !

**गौरीः**—युवराज ! प्रियकराच्या प्राणावर आलेल्या संकटापासून त्यांची मुक्तता झालेली पाहून कोणच्या प्रणयिनीला आनंद वाटणार नाहीं ? युवराज ! आपल्यावर चालून आलेले ते सिंह मला पाहातांच माझ्याही अंगावर धावून आले होते; पण मीं त्यांच्याकडं रागाची दृष्टि फेंकताच ते जमिनीला जागच्या जागीं खिळून राहिले !

**भीष्मः**—स्त्रीजातीच्या स्वाभाविक हक्काचा त्यांनीं तुला उपभोग घेऊं दिला ! रानटी हिंस्र पशूंनींही स्त्रीजातीला इतका मान दिलेला पाहून आम्हा पुरुषसिंहांना लाजच वाटली पाहिजे.—गौरीच्या क्रोधदृष्टीनं जसे ते सिंह जागच्या जागीं खिळून राहिले, त्याप्रमाणं तिच्या प्रेमकटाक्षानं मलाही हिला पकडण्याची विस्मृति होऊन, मी स्तब्ध व्हावंना ?

( पद १९—राग बिहाग ताल तिताल )

कामिजनां प्रिय रमणापानें । ये मूढता । ना स्मृति
मना ॥ ध्रु० ॥ निरखितां नाम नव केतकि पुष्पा । डुलत
भृंगुलि-। त्या परिमला ॥ १ ॥

गौरी ! आतां तुला पकडणार !

**गौरीः**—हीं राहूं द्या !

**भीष्मः**—ही पहा पकडली ! ( धांवतो, गौरी मधल्या खांबाला वळसा देऊन धांवत धांवत कड्याच्या कांठाला येते. )

**गौरीः**—( हंसून ) युवराज ! आतां पाऊलभर पुढं याल, तर मी या कड्यावरून उडी घेईन !

**भीष्मः**—कड्यावरून खालीं पडल्यामुळं तुझ्या कोमल शरिराच्या चिंध्या होऊन या माझ्या रक्तवर्णशरीराप्रमाणं तें छिन्नविच्छिन्न झालेलं पाहण्यापेक्षां मरण या भीष्माला पत्करेल. ( हंसून ) तूं बेलाशक उडी घे !–तुझी झेप जातांच धनुष्याला बाण लावून बाणांच्या पाळण्यांत तुला झेलून धरीन !

**गौरीः**—ही पहा तर घेतली उडी ! ( उडीची हूल दाखविते; भीष्म धनुष्य वर उचलून कड्याकडे धांवतो, तोंच गौरी गुहेंत धांवत येते. )

**भीष्मः**—( हंसून ) मला फसवलंस, पण आतां मात्र तूं खास सांपडणार !

**गौरीः** शक्य नाहीं ! ( गुहेंत शेवटाला जाते ) या, आतां पाहूं कसं पकडता ते.

**भीष्मः**—बघ, गौरी ! सांपडलीस. ( पुढं जातो ) गौरी ! ही गुहा इतकी अरुंद आहे,–तुला तिकडं पळायला मार्ग नाहीं, मी तर इकडून तुला आडवलेली, आतां तूं कुठं जाणार ? पैज आली म्हण, म्हणजे सोडतों तुला.

**गौरीः**—नाहीं, मी कधींच ह्मणणार नाहीं !

**भीष्मः**—मग ही पहा तुला धरली ! ( धरावयास पुढं जातो तोंच एक मोठा दगड त्याच्या व गौरीच्यामध्यें वरून पडतो व गुहा बंद होते ) अरेरे ! घात झाला ! गौरी या दगडाच्या आंत दडपून गेली !

**गौरीः**—( आंतून ) युवराज ! मला धरतां ना ? या ना धरायला ?

[ हंसते. ]

**भीष्मः**—गौरी ! अशा या भयंकर प्रसंगीही तुझी वृत्ति इतकी आनंदी कां असावी, हें मला समजत नाहीं ! तूं दगडाच्या ढिगाऱ्यांत दडपून गेली असतांना, घाबरून जाऊन तुला वांचाविण्याचा प्रयत्न न करितां मी षंढाप्रमाणं उभं रहावं ! हें मला शोभत नाहीं ! गौरी ! तुझा आनंदी चेहरा पाहण्याकरितां हा पहा, मी एक बुक्की मारून या दगडाचं पीठ करून टाकतों. ( बुक्की मारतो, फत्तराचे तुकडे तुकडे होतात. गौरी हंसत असलेली दिसते. )

**गौरीः**—युवराज ! आपण इतके घाबरलां का ? मला लपंडाव खेळतांना पाहून आईला माझं कौतुक वाटलं, तेव्हां पळतांना तिनं माझ्या पायाला वायुची गति दिली ! माझ्या अंगावर सिंह आलेले पाहून त्यांना धरून ठेवलं ! शेवटीं आपण मला झिपटणार असं पाहून तिनं आपल्या हातांनीं मला कवटाळून धरलं ! युवराज ! माझ्याप्रमाणं आपणही हंसला असता तर माझ्या आईला आपले हात बाजूला घ्यायला सांगितलं असतं !

**भीष्मः**—ही वसुंधरा–ही भूमि तुझी माता आहे, या गोष्टीचं मला कसं विस्मरण झालं कुणाला ठाऊक ? गौरी ! वीरध्वजमहाराज शिकारीला गेले असतां, एक लहान बालक पांखरांशीं बागडत असलेलं पाहून, त्यांच्या-मनांत तुझ्याविषयीं पितृप्रेमाचा उद्भव कसा झाला. व राजधानीला नेऊन त्यांनीं तुझं कन्येप्रमाणं कसं पालन केलं, हें तूं मला पूर्वींच सांगितलं होतंस.—गौरी ! मी पैज हरलों खरा ! हें धनुष्य आणि हा भाता मीं तुझ्या चरणांवर ठेवला आहे. यांतून वाटेल ते पांच बाण काढ, आणि ते माझ्या हृदयावर सोड! गौरीच्या गोंडस हातांतून सुटलेले पांचही बाण माझ्या पंचप्राणांचा समाचार घेऊन माझं हृदयमंदीर गौरीला उघडं करून दाखवितील. गौरी ! उचल धनुष्य आणि कर आपली पैज पूरी !

**गौरी**—युवराज ! आपल्या हृदयाचा भेद करणारे बाण आपल्यावर सोडून मीं आपलें अंतरंग केव्हांच पाहिलं आहे. पण आपली पैज पुरी होण्याकरितां हे यांतून पांच बाण मी काढतें,–हे आपल्या हृदयाला लावतें–आणि दिगंतरीं फेंकून देतें !–बाणांनो ! जा. पंचमहाभूतांत तुम्ही मिसळून जा. दुष्टांच्या हातून होणारा सत्पुरुषांचा छळ टाळण्याकरितां पतिव्रतांची अब्रू संभाळण्याकरितां, जगाला न्याय देण्याकरितां, योग्य वेळीं मनुष्यजन्माला या, आणि दुष्टांचा संहार करून माझ्या मातेचा भार हलका करा !

( पद १२—राग मुलतानि ताल त्रिवट )

**अजित सुत व्हा । त्या जननिला । करुनि खल हनन**
**स्वजनमुख उजळ ॥ ध्रु० ॥ या या जगिं समर रंगा ।**
**स्वधर्म कार्या ॥ १ ॥**

[ बाण फेंकते, कडकड आवाज होतो. ]

**भीष्मः**—गौरी ! हे पांच बाण मी यम, वायु, इंद्र आणि अश्विनीकुमार या प्रमुख देवतांपासून मिळविले होते, तुझ्या वरानं त्यांचा उद्धार झाला असून पुढं मानवरूपांत ते खरोखरच आपल्या अलौलिक तेजानं जगताला दिपवून टाकतील !—गौरी ! तुझे पाय दमून गेले असतील. या सिंहासनावर बैस ! ( ती बसते ) आतां तूं या अफाट विश्वाच्या महाराणीप्रमाणं दिसतेस !

**गौरीः**—पण मी कांहीं महाराणी नाहीं ! ही पहा मी उठलें. आपण सार्वभौम राजाचे युवराज आहां, आपलाच या सिंहासनावर बसण्याचा मान !

**भीष्मः**—छे ! छे ! तुझाच तो मान आहे ! बैस ! बैस ! या सिंहासनावर ( हात धरून बसवतो ) ह'—अशी ! गौरी ! तुला या सिंहासनावर विराजमान झालेली पाहून सर्व दिवसभर जगताला प्रकाशित करणारा हा भास्कर आपल्या अवतारसमाप्तीचा काळ जवळ आला म्हणून पश्चिमक्षितिजाच्या कड्यावर उभा राहून अंधःकारसागरांत उडी घेण्याच्या बेतांत आहे ! त्याची उडी पडतांच सर्व जग काळोखाच्या पाण्यांत बुडून जाईल ! पण तुझ्या मुखचंद्राच्या प्रकाशानं वस्तुमात्रांना दुग्धवर्णाची शोभा येईल; आणि निशादेवीचं मंजुळ गीत सुरू झालं कीं, त्यांना झोंप लागून ते सुखस्वप्नाचा उपभोग घेतील !

**गौरीः**—सुखस्वप्नांमधून जागं व्हायला विद्युत्पातासारखा जबरदस्त धक्का बसावा लागतो. पहा ! पहा ! ही पहा, सूर्यबिंबाच्या चिंधड्या होऊन सारी पश्चिमदिशा रक्तबंबाळ झाली ! एवढा धनंतर वीर पडला; म्हणून त्याच्यावर ही पहा आकाशांतून नक्षत्रांची वृष्टि होत आहे !

**भीष्मः**—आणि तूं विजयी झालीस, म्हणून ही पहा, तुझ्यावर वनदेवता कोमल कुसुमांची वृष्टि करीत आहेत ! ( पुष्पवृष्टि होते ) गौरी ! तूं खरोखर आतां मंगलागौरीप्रमाणं शोभत आहेस ! पतिव्रतांना मांगल्य देणाऱ्या गौरीला ओंवाळण्याकरितां, ही पहा, निशादेवी चंद्रबिंबाचा लामणदिवा घेऊन उभी आहे. या पहा, तिनं तुझ्या मस्तकावर तारकांच्या अक्षता टाकल्या. गौरी ! तुझ्या विजयाचा दिवस म्हणून काजव्यांच्या दिवट्या लावून, हा पहा वनदेवींनीं दीपोत्सव मांडला आहे. चल ! या दीपोत्सवाची शोभा पहात पहात आपण नगराला परत जाऊं. ( पद १३—चाल—नतुझोवनी )

वनदेवता । जमल्या संवत्या । करिं घेति त्या पंचारत्या ॥ ध्रु० ॥ विजयोत्सवा । तव दिव्य शोभा : आयें वधुंया । काम काव्य गातां ॥ १ ॥ [जातात.]




भीष्म—ही पहा निशादेवि चंद्रबिंबाचा लामणदिवा घेऊन उभी आहे. ( पान ३२ )

## प्रवेश तिसरा.

**स्थळ**—धीवराचें घर

[ सागर येतो. ]

**साग०**:—हा धीवर मोठा चमत्कारिक मनुष्य दिसतो ! शांतनु महाराजांचं या धीवर-कन्येवर प्रेम बसून सुकर्णाच्या वेषांत त्यांनीं तिच्याकरितां या भैरव धीवराकडे मागणी घातली आणि सुकर्णाचे मामा म्हणून या धीवराकडे मागणीबद्दल बोलणं लावण्याकरितां आम्हांला पाठवलं !-पण मत्स्यगंधेचा बाप हा भैरव तर सुकर्णाचं नांवसुद्धां तोंडावाटं काढूं देत नाहीं ! बरं, मत्स्यगंधेला गांठून तिच्या मनांत तरी काय आहे याचा तपास करीन म्हटलं, तर ती माझ्यासमोर उभीही रहात नाहीं !—मी जर मामाच्याऐवजीं मावशी झालों असतों, तर मात्र तिच्याजवळ बोलायला सोपं गेलं असतं.-मी दरबारांतला एवढा गुप्तहेरांचा अधिकारी पण आपल्यालासुद्धां शांतनुमहाराजांच्या प्रेमाच्या चोरीचा पत्ता लागत नाहीं.—या घरांतल्या बायकांची ओळख करून कांहीं जमलं तर पाहूं या.-ही बाई मोठी गरीब दिसते-ही यांची कुणी नातलग असावी. कालच ही आली; पण तेव्हांपासून हिच्या तोंडांतून एक शब्दही बाहेर आला नाहीं ! ही इकडेच येत आहे, आपण तिला विचारूं या. ( लहरी स्त्री-वेषांत येतो ) अहो मावशी ! जरा थांबा, मला आपल्याला कांहीं विचारायचं आहे.

**लह०**:—आँ ( मुक्याप्रमाणं खूण करून ) आँ-आँ-आँ-आँ.—

**साग०**:—काय ? आपल्याला बोलायचं नाहीं ?

**लह०**:—( रागावून ) अं, हं ! आँ-आँ-आँ-आँ.

**साग०**:—काय ? तुम्ही मुक्या आहां ?

**लह०**:—( जास्त रागावून ) आँ-आँ-आँ-आँ-आँ.

**साग०**:—आँ-आँ-आँ-आँ. काय बुवा माणसानं समजावं !

**लह०**:—मी मुकी आहें, आतां समजलां ना ?

**साग०**:—समजलं ! आणि त्याबरोबरच तूं कोण हेंही समजलं ! पण कायरे लहरी ! तूं इथं आल्याबरोबर मला कांहीं सूचना द्यावीस कीं नाहीं ? मी तर

बुवा इथं हात टेंकले ! आतां म्हटलं इथून जावं, आणि मामाच्या ऐवजीं मावशी म्हणून यावं ! पण तूं आलास आणि माझ्या कपाळचा लग्न्याचोळीचा संस्कार टळला.

लह०:—महाराज पक्के नाटकी बनले आहेत ! आपण सुकर्णाच्या सोंगाला सुरवात केली, आम्हांलाही सोंगं घ्यायला लावलीं— तुम्हांला मामा केलं, मला मावशी केलं ! आपण पुढं कधींतरी महाराजांचे कान उपटून आपला मावशीचा अधिकार गाजविणार !

साग०:—तूं तो गाजविशील तेव्हां गाजव. पण तूं जर असाच इथं बोलत उभा राहिलास, तर मात्र मला कान कसे उपटतां येतात तें तुला सप्रयोग दाखवावं लागेल.

लह०:—महाराजांनी तुम्हांला तावडतोब बोलावलं आहे ! मी इथलं सगळं पाहून घेतो ! आज तुम्ही जा.

साग:—पण मी जाऊं कसा ?—असं कर, मी आज पुन्हा सुकर्णाची गोष्ट काढतों, म्हणजे म्हातारा चिडेल आणि देईल शिव्या.

लह०:—त्यांनीं नाहीं दिल्या तर मी देईन.

साग०:—तूं कसा देणार ? तूं तर मुकी ! पण हा पहा तो म्हातारा येत आहे. तूं मुकी बन. [ भैरवनाथ येतो. ]

लह०:—( भैरवास ) आँ–आँ–आँ–आँ—

भैर०:—काय शिर्वी एक एक सोंगं आहेत ! ही बाई कोण आहे, कांहींच समजत नाहीं ! अहो बाई तुम्ही कोण ?

लह:—आँ–आँ–आँ–आँ—

भैर०:—कशाकरितां आलां ?

लह०: — आँ–आँ–आँ–आँ—

भैर०:—कुठून आलां ?

लह०:—आँ–आँ–आँ–आँ—

भैर०—घ्या, सगळ्या प्रश्नांचं एक उत्तर ? ही भाषा मोठी चांगली ! बोलायलाही नको आणि ऐकायलाही नको. कांहीं त्रास नाहीं.

लह०:—आँ–आँ–आँ–आँ—

भैर०:—बरं बाई तुम्ही जरा गप्प बसा आतां.

[ हातांनीं तशी खूण करतो. ]

सांग०:—( स्वगत ) मी या भैरवापुढं हात जोडले ! पण यानंही मुक्या लहरीपुढं हात जोडले ! शेराला सव्वाशेर असा भेटतो ! ( उघड ) कायहो भैरवनाथ ! या कोण बाई आहेत ? तुमच्या कुणी—

भैर०:—आमच्या कोणीही नाहींत. आमची बायको अति भांडखोर असे बधा ! तेव्हां मला वाटलं, कीं हिच्यापेक्षां एखादी मुकी बायको केली असती तर पत्करली असती !

सांग०:—मग आतां अनायासं चालून आली आहे. अशी संधि पुनः यायचीं नाहीं !

भैर०:—नको बुवा ! कालपासून आतां असं वाटूं लागलं आहे की ती भांडखोर पत्करली ! मला मुकी कां हवीशी वाटली, याचं कारण नाहीं विचारलंत !

सांग०:—काय बुवा कारण !

भैर०:—कारण म्हणजे असं, एकदां आमची बायको इतकी भांडायला लागली कीं, भांडून भांडून तिची दांतखिळी बसली ! मी त्या मुळखुंड्या वैद्या-कडे गेलों आणि त्याला घेऊन आलों. वैद्य दृष्टीस पडतांच तिचं माथं भडकलं ! पण दांतखिळी बसलेली ! बोलता कांहीं येईना ! शेवटीं वैद्यबुवा औषध उगळूं लागतांच तिनं खुप जोर केला ! त्या सरशीं तोंडाचा पट्टा आणि हाताचा चपेटा एकदम आमच्यावर सुरू झाला. तेव्हां वाटलं होतं कीं, ती मुकीच रहाती तर बरं झालं असतं ! पण आतां त्याचाहीं थोडा अनुभव आला !

सांग०:—मीं म्हटलं, आपण मुलीच्या लग्नाबरोबर आपलंही त्या मुकी-बरोबर उरकून घेतलं असतं, म्हणजे खर्चही वांचला असतां आणि एकांत एक कार्यही आटपलं असतं !

भैर०:—अहो ! आमच्या वयाला आतां साठ वर्षं झाली. आतां का आमचं लग्नाचं वय आहे ? आमच्या महाराजांची उमर सगळी चाळीस वर्षांची ! पण ते सुद्धां पहिली पत्नी गेल्यापासून तसेच आहे ! महाराजांसारखी तरुण मंडळी जर अशी राहतात, तर आम्ही काय बोलून चालून म्हातारे !

सागः०—भैरवनाथ, आमच्या मागणी बद्दल काय विचार ठरला ? सुकर्ण चांगला—

भैर०:—सुकर्णाचं नांव काढूं नका ! विषवराला–माझी मुलगी द्यावयाची नाहीं. काय ह्मणून देईन ! आमच्या कोणाच्या तरी नातेवाईकाकडे तिला द्यावचा माझा विचार आहे.

साग०:—मी इतकही सांगून ऐकत नाहीं, तेव्हां माझं कांहीं बोलणं नाहीं; पण विचार करा, सुकर्णानं जर मनांत आणलं, तर तो आपला सूड घेईल !

भैर०:—अरे, जारे ! येऊं दे माझा सूड घ्यायला ! तो काय सूड घेणार ! परवा इथं आला आणि उर्मटाप्रमाणें मला म्हणतो कसा, ‘ तुमची मुलगी मला द्या, माझं तिच्यावर प्रेम आहे ! ’ काय पण राजश्री ! प्रेम आहे म्हटलं, म्हणजे झालं ! पोंचले यांचे हात आकाशाला ! मी विचारलं, तुम्ही स्वतःसे मागणी घालायला आलां ? तुम्हांला वडील आहेत का ?- नाहीं ! आई आहे का ?—नाहीं ! भाऊ आहेत का ?—नाहीं ! वहीण आहे का ?—नाहीं ! मुलगा आहे का ?- नाहीं ! मग तुम्हीच सांगा, कुणाकडे पाहून आम्ही मुलगी यांना द्यायची ! शेवटीं विचाऱ्याच्या साडेसातीनं तुम्हांला एकट्याला वगळलं होतं म्हणून पाठविलेन ! म्हणे ‘ सूड घेईल ! ’ चेष्टाविष्टा लागल्या आहेत सूड घ्यायला !

साग०:—ठीक आहे; हेंच आपलं उत्तर ! जातों आम्ही आतां !

भैर०:—जा. खुशाल जा. सुकर्णाला सांगा, वाटेल तेव्हां ये सूड घ्यायला ! तुझ्या पाठींत असूड ओढायला मी तयार आहें. ( सागर जातो. )

लह०:—आँ आँ आँ आँ— ( मत्स्यगंधा येते. )

मत्स्य०:—तुमचं किनई माझ्यावर फारच प्रेमहो !

भैर०:—खरं ना ? एकूण मीं केलं तें तुला बरं वाटलं ना ! सांग बरं, बरं वाटलं कीं नाहीं तें ?

मत्स्यः०— मला बरं वाटलं कीं नाहीं, हें मीं जर सांगितलं तर तुम्हांला मात्र बरं वाटणार नाहीं.

भैर०—म्हणजे ?

मत्स्य०:—म्हणजे काय सुकर्णाच्यावर माझं प्रेम आहे !




भैरव—पण समज पुढं त्यानं तुला टाकली—
मत्स्यगंधा—असं कधीं व्हायचं नाहीं. ( पान ३७ )

लह०:—( स्वगत ) शाबास !

भैर०:—वः—तुझं त्याच्यावर प्रेम आहे, त्याचं तुझ्यावर प्रेम आहे ! जुळलं ! पण वेडे ! प्रेमाचा आणि लग्नाचा संबंध काय ? आमच्या लग्नाच्या वेळीं आम्हीं नाहीं कुठं या गोष्टीचा विचार केला ! आमच्या वडील माणसाचं तें काम होतं, त्यांनीं केलं. आतां तुझं लग्न आहे. अर्थात् तें माझं काम आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणंच सर्व गोष्टी झाल्या पाहिजेत ! सुकर्णाशीं मी तुझं लग्न कधींच करणार नाहीं !

मत्स्य०:—बाबा ! असं नका करूं. माझ्यावर जर कांहीं तुमचं प्रेम असेल, मला सुख व्हावं अशी जर कांहीं तुमची इच्छा असेल, निराशा झाल्यामुळं माझा सारा जन्म दुःखांत जाऊं नये, असं जर तुमच्या अंतःकरणाला वाटत असेल, तर सुकर्णाची मागणी मान्य करा. बाबा. त्यांचा स्वभाव किती प्रेमळ आहे ! त्यांचं मन किती नाजूक आहे ! त्याचं वागणं किती सभ्य आहे ! एखाद्या राजाला शोभतील असेच त्यांचे गुण आहेत. त्यांच्या सहवासांत मला सुखच मिळेल.

भैर०:—पण तो बिजवर आहे.

मत्स्य०:—असत ना ! ते कसेही असले, तरी मला चालतील.

लह०:—( स्वगत ) याचं नांव प्रेम !

भैर०:—गुलामानं पुरी जादू केली पोरीवर ! पोरी, त्या गुलामानं तुला थापा देऊन फसवलं ! या दुष्ट आपमतलबी माणसांचा नियमच नाहीं ! समज, पुढं त्यांनीं तुला वाईट रीतीनं वागवलं तर !

मत्स्य०:—ते मला वाईट रीतीनं वागवायचेच नाहींत, त्यांचं माझ्यावर प्रेम आहे ! ते मला प्रेमानंच वागवतील !

लह०:—( स्वगत ) अशी खात्री पाहिजे !

भैर०:—पण समज, पुढं त्यांनीं तुला टाकली—

मत्स्य०:—[ एकदम ] असं कधींच व्हायचं नाहीं. तें शक्यच नाहीं ! खरेपणा जर कुणाच्या अंगीं असेल, तर तो त्यांच्यांत आहे ! ते कुणाला फसवतील, असं व्हायचंच नाहीं.

भैर०:—तूं अगदीं भोळी आहेस. पुरुषाच्या खरेपणांबद्दल कुणीही विश्वास धरूं नये ! पुरुषांवर विश्वास ठेवणाऱ्या बायका अखेरीला फसतात, समजलीस !

**मत्स्य०**:–असं बोलवतं तरी कसं तुमच्याच्यानं ? सुकर्णाबद्दल माझ्या मनांत अविश्वासाचं बीज पेरायला तुम्हांला कांहींच कसं वाटत नाहीं ? कुणीं कांहीं म्हटलं, तरी मला ते प्रियच आहेत ! करीन तर त्यांच्याशीच लग्न करीन.—

**भैर०**:—त्यांच्याशीच करीन म्हणजे ? मग आम्ही कशाला आहोंत ?-कांहीं झालं तरी मीं तुला सुकर्णाला देणार नाहीं. त्यालाच देण्याचा जर प्रसंग आला, तर मी तुझ्या गळयांत एक धोंड बांधीन आणि देईन यमुनेच्या डोहांत लोटून !

**मत्स्य०**—द्याच लोटून, मग मीही आनंदानं मरेन !

**लह०**:—( स्वागत ) शांतनु महाराजांच काम झालं ?

**भैर०**:—या कार्टीनं अगदीं ताळ सोडला ! वडीलपणा मान-अपमान कांहीं नाहीं शिंचीला ! धड धंदा सुद्धां सुचेना ! मासे मारायचा म्हणजे कोण हंगाम ! माझ्यासारखा हाच धंदा करणारा जांवई मिळाल्याशिवाय कांहीं मी तुझं लग्न करित नाहीं, हें नोकरलोक म्हणजे पैशाच्या नांवान नकारघंटा ! कपडे खूप करतील, ऐट खूप मिरवतील; पण पगार सगळा चैनींत घालवतील ! मग माझी पोरगी घरीं उपाशीं रडत बसेल, ह्यांचं काय ?—कार्टे ! तूं नाहीं ऐकत माझं ?—अशीच ऐस ! मी घेतो जाळं, जमवतों चार पोरं आणि जातों नदीवर ! [ जातो. ]

**लह०**:—आतां आपलं इथं काय काम राहिलं ! सागर अजून फार लांब गेले नसतील ? त्यांना ही आनंदाची बातमी द्यावी ! [ जातो. ]

**मत्स्य०**:—( स्वागत ) देव मला योग्य शिक्षा करितो आहे ! सुकर्णाच्या दर्शनानं माझ्या अंतःकरणांत जो प्रेमोद्भव झाला, तो सुखदायक वाटत असून ही केवळ पोरबुद्धीनं मी त्यांची हेटाळणी केली, त्यांच्या प्रेमाकडे डोळेझांक करून माझ्या हृदयाची भेट घेऊं पहाणाऱ्या त्यांच्या हृदयाला ‘ धटिंगण ’ म्हणून खिजवलं ! त्या वेळीं सुकर्णाचा प्रेमपूर्ण चेहेरा माझ्या वाक्प्रहारानं एकदम फिका पडला ! तो म्लान चेहेरा तेव्हांपासून माझ्या दृष्टीसमोरून हालत नाहीं ! आग लागो माझ्या पोरबुद्धीला !—सुकर्ण ! ही मत्स्यगंधा अगदीं तुमची—तुमची आहे. माझ्या चुकी-

मुळं तुमच्या अंतःकरणांत वादळ उठून, तुमच्या चेहेऱ्यावर जी म्लानतेची छटा पसरली आहे, ती माझ्या प्रेमाश्रुनीं धुवून टाकीन, तेव्हांच मलां चैन पडेल ? [ जाते. ]

( पद १४—चाल तेरि फुरकत मे० )

मनिं हिरमुसले मी नाथा । नेत्रें मम न्हाणिन कांता ।
जल घळ घळ धांवत येतें । या हृदयां पाझर देतें ॥ धृ ॥
अधिर मना कळली ना लज्जा । हृदयीं सुकर्ण राजा ।
आग लागली या देहाला । शांतिमंत्र जपि बाला । मन
कांपत कां गडे आतां ॥ १ ॥

## प्रवेश चवथा.

[ स्थळ—राजमंदीर. ]

**शांत०:**—( स्वगत ) काय ही दैवलीला ! मत्स्यगंधेचं प्रेम आपणावर आहे कीं नाहीं, या संशयाच्या फेऱ्यांत सांपडून तळमळणारं माझं मन 'वरीन तर सुकर्णालाच वरीन' या तिच्या अमृतवाणीनं शांत झालं !—पण जरी हृदयानं मत्स्यगंधा माझ्याजवळ आली, जरी आम्ही एकरूप झालो, तरी देहानं ती माझ्याजवळ कायमची येण्याच्या मार्गांत किती अडचणी आहेत, हें माझ्या लक्षांत नव्हतं ! ती धीवरकन्या आहे आणि मी उच्च क्षत्रियकुळांतला सार्वभौम नृपती आहें !—पण प्रेमाचं चक्रवर्तित्व मानवी सार्वभौमत्वापेक्षां शतपट श्रेष्ठ आहे ! आणि ' मत्स्यगंधेचं स्वरूप आणि योग्यता उच्च कुळांतल्या क्षत्रिय राजकन्यांपेक्षां अधिक आहे !—अशा स्थितींत केवळ जातीच्या उच्चनीचत्वाच्या कल्पनेला बळी पडून जर मी त्या धीवरकन्येचा अव्हेर केला, तर जगांतल्या अत्यंत नीच कोटींतल्या पशूंत देखील मी नीचतम ठरेन. [ हुजऱ्या येतो. ]

**हुज०:**—महाराज ! युवराज भीष्म आपल्या दर्शनाकरतां येत आहेत.

**शांत०:**—जा, त्याला आंत घेऊन ये.

[ हुजऱ्या जातो ]

भीष्मासारखा सर्वगुणसंपन्न पुत्र असतांना, त्याला सिंहासनावर बसवून आपण वानप्रस्थाश्रम घ्यायचा सोडून, द्वितीय संबंधाची इच्छा करणं मूर्खपणाचं नाहीं का ?–पण मत्स्यगंधेच्या प्रेमजालांत गुरफटणारा हा मासा वानप्रस्थाश्रमाचं नांव काढायलाही लायक नाहीं !–मत्स्यगंधा आणि भीष्म या दोघांचीही सुख-दुःखं आज माझ्या कृतीवर अवलंबून आहेत.—मत्स्यगंधेचं माझ्यावर प्रेम आहे,—मला वरण्याचा तिनं निश्चय केला आहे,–तिचा निश्चय तडीला न्यायला मी समर्थ झालो आहें !–भीष्म माझा पुत्र आहे,—तो राज्यकार-भाराला लायक आहे,—त्याला गादीवर बसवणं हेंही माझ्या हातांत आहे.—काय करावं ?—मत्स्यगंधेशीं मी विवाह केला तरी भीष्माला मला राज्यपद देतां येत नाहीं का ?–भीष्माच्या सार्वभौमत्वाच्या मार्गांत मत्स्यगंधा बिलकूल येत नाहीं.–पण–पण काय ? त्याच्या सरळ मनांत मत्स्यगंधेसंबंधानं सापत्नभाव तर येणार नाहीं ? मत्स्यगंधेच्या मनांतही त्याच्याविषयीं कदाचित् तो भाव येणार नाहीं कशा वरून ?—अरेरे ! हा विचार मनांत आला, कीं दर्यामध्यें सांपडलेल्या एखाद्या नावेसारखी माझी स्थिति होते ! पण—हा पहा भीष्म आलाच.

[ भीष्म येतो. ]

**भीष्मः**—महाराज ! आपली एकटयाची गांठ घ्यावी म्हणून मी आतां आलों. विचारतों याबद्दल रागावूं नका. चांचेलोकांच्या स्वारीवर आपण गेला, मोठमोठ्या लढाया मारल्या, बंडखोरांचे मुख्य कैद करून बहुतेक बंड मोडून टाकलं, अशा वेळीं राजधानीमध्यें प्रफुल्ल मुखानं आपलं आगमन व्हावं ; परंतु चार दिवसापूर्वी आपला नगरप्रवेश झाल्यापासून मी पहातों आहे, आपण अगदीं उदास दिसतां !—महाराज ! आपल्या पाठीमागें या भीष्माच्या हातून राज्यकारभार नीट झाला नाहीं का ? माझ्या चुकीमुळं राजप्रकरणांत कांहीं घोटाळे झाले आहेत का ! तसं असेल तर मला वाटेल ती शिक्षा करा; पण स्वतःला त्रास करून घेऊं नका.

**शांत०**:—वेडा कुठला ! भीष्मा ! असे भलतेच कुतर्क करून वाईट वाटून कां घेतोस ? तूं म्हणतोस त्यांतला कांहीं एक प्रकार नाहीं. तूं कारभार फार चांगल्या रीतीनं पाहिलास, याबद्दल तुला शाबासकी द्यायला मी विसरलों, म्हणून रागाऊं नकोस.

भीष्मः—महाराज ! आपण मला शाबासकी दिली नाहीं, म्हणून वाईट वाटून किंवा आपला राग येऊन ती वसूल करण्याकरितां मी आलो नाहीं. पण आपली प्रकृति तरी मग नीट नसावी, आपला चेहरा म्लान दिसतो, नेत्र खोल गेलेले दिसतात, शरीर गळलेलं दिसतं ! आपण कामकाजही दरबारांत येऊन पाहात नाहीं, कीं घोड्यावर स्वारी करून फेरफटका करायला जात नाहीं. महाराज ! आपल्या अशा स्थितीची चौकशी करून याला उपाय शोधून काढण्याचं काम मी जर केलं नाही, तर कोण करणार ?

शांत०:—भीष्मा ! मी खरोखरच आजारी नाहीं. मी अगदीं असावा तसा आहे समजलास !

भीष्मः—महाराज ! आपण कांहीं म्हणा, पण आपली चित्तवृत्ति कांहीं ठीक नाहीं. अत्तांच्या आत्तां बसल्या बसल्या मी पाहतों आहे, आपण शून्य दृष्टीनं किती वेळ तरी आकाशाकडे पहात होतां ! आपण केवढाले दीर्घ सुस्कारे सोडीत होतां ! हे सुस्कारे, ही शून्य दृष्टि आपल्या चांगल्या प्रकृतीचीं चिन्हं नाहीत. महाराज ! मी लहान आहे तेव्हां मला कांहीं समजणार नाहीं, अशा समजुतीनं टाळाटाळी करूं लागाल, तर मला चैन पडणार नाहीं.

शांत०:—भीष्मा ! कांहीं नाहीं ! तूं माझ्याजवळ इतक्या विनविण्या कां करतोस याचं मला कारण समजत नाहीं !

भीष्मः—महाराज ! मी आपला पुत्र आहें ना ! पुत्रानं पित्याच्या सुखदुःखाच्या प्रसंगीं पितृप्रेमानं त्याला धीर दिला नाही, त्याच्या विवंचनेचा पत्ता काढला नाहीं, त्याची काळजी दूर केली नाहीं, तर तो पुत्र कसला ! आपल्यावर एखादा जगजेता स्वारी करून येणार असेल, तर बोला, आत्तांच्या आत्तां त्याचा धुव्वा उडवून देतो ! एखाद्या महाप्रतापी अतिरथ्यानं आपला अपमान केला असेल, तर बोला ? त्याला रथांतून खालीं ओढून त्याच्या झिंज्या धरून आपल्या पायांशीं त्याला लोटांगण घालायला लावतों ? किंवा प्रत्यक्ष यमधर्म यमदंड घेऊन आपल्यावर चालून येत असला तर बोला त्याला या भुजदंडाचा धक्का देऊन या शांतनुपुत्राच्या सामर्थ्याची प्रचिती दाखवतों.

शांत०:—भीष्मा? या सर्व प्रसंगीं मी डगमगून जाईन असं कां तुला वाटतं ? आणि त्यांत तुझ्यासारख्या पराक्रमी व धाडसी पुत्राचं साह्य असल्यावर मला

कोणापासून भय असेल, हें शक्यच नाहीं ? मी तुला माझ्या खिन्नतेचं कारण सांगितलं असतं पण—

भीष्म—महाराज ! पण काय ? आपण जर मला आपल्या खिन्नतेचं कारण सांगितलं नाहीं, तर मी अन्नग्रहण करणार नाहीं. सत्यवचनी शांतनुमाहारा॰ जांनी आपल्या आवडत्या पुत्राशीं असं असत्य वर्तन करावं ना ?

( पद १५—राग सोहिनी ताल झपताल )

**वचन ना वृथा हें कदा। अन्न ना जल सेवि मी। रविचंद्र विलया जातां ॥ धृ० ॥ सत्याग्रही हा। त्यजिना स्वध्येय। जरि त्या अधम घात। परमेश यश देत। त्या देवकार्या नियंता ॥ १ ॥**

शांत॰:—भीष्मा ? माझ्या सत्यवचनाची तूं मला आठवण दिलीस आणि कारण सांगितल्यावांचून " मी अन्नग्रहण करणार नाही," अशी शपथ घेतलीस, या मुळं निरुपायानं मला तुला कारण सांगणं भाग आहे. भीष्मा ? ऐक–ऐक ! माझ्या खिन्नतेचं कारण–तूंच !—

भीष्म—अरेरे ! हें माझं शरीर जागच्या जागीं जळून कां गेलं नाहीं ! किंवा लहानपणींच इंद्रवज्राच्या आघातानं त्याचे तुकडे तुकडे कां झाले नाहींत ! पित्याच्या दुःखाला कारणभूत होणारा पुत्र जिवंत रहायलाच योग्य नाहीं ?— महाराज ! घ्या-–घ्या हें खडग आणि करा हें मस्तक धडापासून वेगळं !

शांत॰:—तुझ्यासारख्या प्रियपुत्राचं मस्तक धडापासून वेगळं करणाऱ्या हातानं कोणचं पवित्र कार्य करूं ?—पण भिष्मा ! माझं म्हणणं पुरं न ऐकल्या-मुळं किंवा मी संदिग्ध भाषेत तुझ्याजवळ बोलल्यामुळं तुझ्या मनाला विनाकारण संताप झाला. मी तुझ्या मनाला चमत्कारिक वाटण्यासारखं जर कांहीं बोललों तर मला क्षमा कर ! भीष्मा ! पित्यानं पुत्राजवळ कांहीं गोष्टी बोलण्यासारख्या नसतात. परंतु तुझ्यासारखा सुज्ञ, विचारी आणि प्रेमळ पुत्र मित्रच समजून त्याच्याशीं आपलं हृद्गत सांगायला मला कांहींही हरकत वाटत नाहीं. भीष्मा ! मित्रा ! मी एका सुंदरीच्या प्रेमपाशांत सांपडलों आहें. आश्चर्य वाटूं देऊं नकोस. तुझ्यासारखा गुणवान्, अलौकिक सामर्थ्यवान् पुत्र असतां, वयाच्या चाळिसाव्या वर्षी तुझ्या आईच्या वियोगानंतर आजपर्यंत कडकडीत ब्रह्मचर्य

पाळून, मी प्रेमानं वेडा होऊन द्वितीय संबंधाची इच्छा करावी, हें तुला चमत्कारिक वाटेल ! पण त्या सुंदरीची—त्या धीवरकन्येची—त्या मत्स्यगंधेची प्राप्ति झाल्यावांचून माझ्या जिवाची तळमळ नाहींशी होणार नाही, इतकंच नव्हे, तर हा जीवही जगणार नाहीं ! [ जातो. ]

भीष्म—प्रेमसागरांत उडी घेणाऱ्या प्रत्येक वीराबद्दल माझ्या मनांत प्रेमच उभ्दवतं ! महाराज ! मी, सागर, आणखी दुसरे कितीतरी वीर या प्रेमसागरांत पोंहायला निघालों आहों ! आणि आमच्या प्रीतिदेवता हातांत माळ घेऊन उत्कंठेनें आमच्या स्वागतांकरतां जागोजाग उभ्या आहेत ! प्रेमाचा तडाखा कसा असतो, याची महाराज ! मला कल्पना करतां येते ! आपला जो आनंद तो माझा आनंद ! आपल्या आनंदाचं निधान—आपल्या प्रेमाचा विषय—आपल्या हृदयाची देवता आपल्यापुढं उभी करीन त्यावेळींच हा भीष्म स्वस्थ बसल !

अंक दुसरा समाप्त.

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

**स्थळ**—गौरींचा वाडा

[ ललित आणि सागर येतात. ]

**ललि०**:—हं ! एकूण असं झालं अं ? तरीं म्हटलं आपण इतके दिवस दडी कुणीकडे मारली आहे ? महाराज आपली नेमणूक आतां असल्या गोष्टींवरसुद्धां करूं लागले तर महाराजांच्या छावणींत त्यांच्या हृदयाच्या तिजोरीवर दिवसाढवळ्या एका कोळ्याच्या पोरीनं दरवडा घातला, त्याचा तपास करण्यांत आपली सगळी अक्कल खर्च होत होती ?

**साग०**:—पण देवाच्या दयेनं सगळी कांहीं खर्च झालीं नाहीं. तुझ्यावर छाप ठेवण्याइतकी शिलकेंत आहे ! लहरीप्रमाणं मावशी झालों असतों, तर मात्र तुझ्यापुढं बोलण्याची ताकद न राहून मुका होण्याचा प्रसंग आला असता. पण तें जाऊं दे ! तूं एवढ्यांतच जात नाहींस ना ? मला वाटे, मी इकडे कामगिरीवर गुंतलेला आणि इतक्यांत जर तुमच्या कूच इथून झाला, तर मनांतले मांडे मनांत ठेवावे लागणार !

**ललि०**:—गौरीनं राजेसाहेबांना महिनाभर येत नाहीं, म्हणून कळवलं आहे. ती निघाली असती म्हणून बाबांना निघावंच लागलं असतं ! आणि मग मलाही त्यांच्याबरोबर जावं लागलं असतं !

**साग०**:—पहा ! सूर्यावर सर्व ग्रहमालेची स्थिति अवलंबून असते, त्याप्रमाणं गौरीसारख्या राजकन्यांच्या मर्जीवर तुमचं आमचं सुख अवलंबून ! पण त्या पहा, ताईसाहेबच येत आहेत; त्यांच्या दृष्टीस पडतां कामा नये ! जरा बाजूला जाऊं या. [ गौरी येते. ]

**गौरी**–:—( स्वगत ) मला येतांना पाहून हीं दोघं चोरासारखीं दडून बसलीं आहेत ! बसा म्हणावं ! कसं बरं करावं ?-हं असंच ! ( उघड ) चंद्रिके अग चंद्रिके !–कुठं बाई गेली ही ? या माणसांना काय बाई करावं ! बाबांची

प्रकृति एकाएकी बिघडली ! आतां स्वार आला. काय करावं–चैन पडत नाहीं ! अग चंद्रिके ! [ चंद्रिका येते. ]

**चंद्रि०:**—काय बाईसाहेब ?

**गौरी०:**—त्या ललितेला घेऊन ये ! बाबांची प्रकृति अस्वस्थ आहे ! आतां निघालं पाहिजे. तिच्या बापाकडं पाठवला निरोप—ते घोड्यावर जीन घालून तयार आहेत. आणि हें बघ, कानांत सांगतें—( कानांत हळु )—सगळं खोटं आहे. बाहेर गेलीसंस कर. ( चंद्रिका जाते ) युवराजांना निरोप पाठवला, भेटून जा म्हणून ! प्रेमाची गोष्ट अशी आहे. बाबा आजारी, तरी हें नगर सोडणं माझ्या जिवावर आलं आहे ! ललितेचं बरं कीं नाहीं ! ती आतां धांवत निघेल घरीं जायला. [ ललिता येते. ]

**गौरी:**—बरी आलीस ललिते ! चल, आतां असंच्या असं निघालं पाहिजे! बाबा अत्यवस्थ आहेत.

**ललि०:**—पण एक चार घटका तरी वेळ आहे ना ?

**गौरी०:**—नाहींग, आतां निघायचं ! चार घटकेत आपण चार योजनं जाऊं चल, ही मी तयार आहें. आतां घरींसुद्धां जायला नको. घोडे तयार आहेत.

**ललि०:** —पण एक पाव घटका तरी—

**गौरी०:**—ललिते ! माझा बाई जीव चालला आणि आतां तूं पाव घटकेची फुरसत मागतेस ?

**ललि०:**—पण ते इथंच आहेत. एकदां त्यांना—

**गौरी०:**—ते कोण ! बाबा कीं काय ? स्वतः इथं येऊन बाबांनीं मला फसविण्याकरितां का स्वार पाठवला ? काय तरी बाई ! भारीच बाई कोक फसवतात हो ! त्यांना वाटलं ही इकडे अडकली असेल, पण मी कसली ! बाबा अजारी असा निरोप आणि मी प्रेमाच्या गोष्टी सांगेन का ?

**ललि०:**—तसं नव्हे गौरी ! तुझे बाबा नव्हत. ते इथं आहेत, त्यांना एकदां भेटून घेतें.

**गौरी:**—अग ते ते कोण ?

**ललि०:**—अग ते–कां उगीच मला त्रास देतेस ?

**गौरी**:—मी किनई घाबरून गेलें आहे ! खरंच सांग मला ते ते कोण ?

**ललि०**:—अशा वेळींसुद्धां तूं वेड पांघरतेस ना ? ते म्हणजे—

[ सागर येतो. ]

**गौरी**:—हें ?–अस्सं ! पण मला आतां फुरसत नाहीं. सरदारसाहेब ! बरे आलांत. आत्तांच्या आत्तां युवराजांकडे जा आणि आम्ही गेलों म्हणून त्यांना सांगा ! कारण या आम्ही निघालोंच !

**साग०**:– एक शब्द तरी हिच्याशीं–

**गौरी०**—ही कोण ? माझा जीव जायला आला, नका थांबूं आतां !

**साग०**:—नाहींच थांवत, पण हिला—

**गौरी०**:—पुन्हा हिला ! त्या ललितेचं ते आणि यांचं आपलं ही ? त्या वाचस्पतिऋषिजवळ अध्ययन करतां कीं काय अलीकडे ! मला नीट सांगा काय तें !

**ललि०**:—गौरी ? मला जरा– ( कानांत सांगते. )

**गौरी०**:—असं असं ! मला काय बाई कळेच ना ! बरं मी जरा बाजूला जातें, थोडक्यांत आटपा आपलं भाषण. (गौरी बाजूला जाते )

**साग०**—दुर्दैवाची शिकस्त झाली ! ललिते ? तुझ्याजवळ एक घटकासुद्धां मोकळेपणानं बोलायला सांपडलं नाहीं ग ! आणि आतां तर काय, तुझी माझी गांठ पडेल, तो सुदिन ! या नोकरीचं असंच आहे ! आपले आपण कांहीं मालक नाहीं.

**ललि०**:—काय करायचं ! पण मनांत प्रेम ठेवायचं आणि या दासीला विसरायचं नाहीं.

( **पद १६**—शबे मेहताब हो० )

**प्रिया ही । ना सुवर्णा । ना सुगात्रा । साधिभोळी कळी ।**
**करमाला । घालि कंठीं । ना सुटे ती । मृत्यु घेत बळी ।**
**नरांना कांहि ना खंती । मुलींच्या भोंवती जमती ।**
**कळीचा गंध चाखोनी । पळे हा भृंग ती वरूनी ॥ १ ॥**

**साग०**:—युवराजांच्या लग्नाच्या वेळीं आपली गांठ पडेल, तोंपर्यंत धीर धर. मी तुझ्याशीं कधींही बेइमान होणार नाहीं. जिवांत जीव आहे, तोंपर्यंत तुला विसरणार नाहीं.

ललि०:—आणि मी तरी विसरेन का ? [ गौरी येते. ]

गौरी:—चल ललिते !—सरदारसाहेब, तुम्ही जातांना युवराजाकडे ?

ललि०—जरा थांब बाई ! ( सागरास ) थांबा जरा, मला एक शब्द तरी—

गौरी:—बाई बाई बाई ! एक शब्द, पण त्याचे सात शब्द करतेस !

साग०:—( ललितेस ) चल, काय करतेस ? आपला हा प्रेमवियोग म्हणजे गौरीच्या निष्ठुरपणाचा कळसच आहे !

गौरी:—द्या, वाटेल त्या शिव्या द्या ! पण आतां वेळ नाहीं. ललिते ! इकडे ये. सरदारसाहेब ! इकडे या. हें पहा, ही माझी बहीण आहे, हिला तुम्ही पदरांतही घेतलीच आहे. मी आतां कांहीं जास्त बोलत नाहीं. कारण; मला तर बाई एक शब्द बोलायलाही फुरसत नाहीं. (एकदम खडबडून ) पण हें काय ? कोण ललिता ?—हे कोण ? सागर ? मी बाई आतां जागी झालें.—मग मला स्वप्नच पडलं हें.

साग०:—थोरांची स्वप्नं होतात, पण गरिबांच्या प्रेमांत विघ्नं येतात !

गौरी०:—( जागी झालीसें दाखवून ) खरंच स्वप्नचहो ! काय तरी बाई ? मला स्वप्न पडलं, कीं बाबा—

ललि०:—आतां तरी नीट जागीं झालीस का ?

गौरी०:-झालें, खरंच जागी झालें ! मला असं स्वप्न पडलं कीं बाबा—

ललि०:—नको सांगूस तुला पडलेलं स्वप्न ? आमच्या चांगलं अनुभवाला आलं ! असली कसली मेली थट्टा !

गौरी:०—कां, आतां फारसा राग आला ? बाबा गेले, त्या दिवशींचं कांहीं आठवतं का ? तुला तेव्हांच बजावलं होतं कीं, याचं उट्टं केव्हां तरी काढीन !

ललि०:—मग आतां झालं ना समाधान ? मला तर बाई ही गोष्ट अजून खरीच वाटते !

गौरी:—तूं किनई ललिते अगदीच गरीब ! तूं माझ्याशीं किती टिकणार ? तुझ्या जागीं आतां मी असतें, तर काय केलं असतं सांगूं ?

ललि०:—नकोच सांगायाला ! मी तुझ्याबरोबर येत नाहींच तुझा बाप मरेना कां, मला काय त्याच्याशीं करायचं आहे, असं म्हणशील !



गौरी--मी बाई आतां जागी झालें. [ पान ४८ ]

ललि:०—मग आतां झालं ना समाधान ? मला तर बाई ही गोष्ट अजून खरीच वाटते !

गौरी:—तूं किनई ललिते अगदींच गरीब ! तूं माझ्याशीं किती टिकणार ? तुझ्या जागीं आतां मी असतें, तर काय केलं असतं सांगू ?

ललि०:—नको्स सांगायला ! मी तुझ्या बरोबर येत नाहीं, तुझा बाप मरेना का, मला काय त्याच्याशीं करायचं आहे, असं म्हणतीस !

गौरी०:—तसं नव्हे ! मी जर ललिता असतें आणि माझ्यासारख्या गौरीन मला तावडतोब निघायाची आज्ञा केली असती, तर मी काय म्हणाले असतें ? मी म्हणाले असतं "गौरी तूं राजकन्या असलीस तर आपल्या घरची ! आमच्या प्रेमाच्या राज्यावर सत्ता चालवण्याचा कांहीं तुला अधिकार नाहीं. तूं असं म्हणालीं असतीस, म्हणजे मी तुला अशी कडकडून भेटलें असतें ! ( भेटतें ) आणि आतां देखील अशीच भेटतेंच !

[ पुन्हा आलिंगन देते. ]

ललि०—गौरी !—

गौरी०:नको बोलूंस पुढं ! जरा थोडं कचं आहे ! जा तुम्ही दोघंहीजणं, आणि पुन्हा लक्षांत ठेवा, कीं प्रेमाचं साम्राज्य कुणाच्याही सत्तेला जुमानीत नाहीं !

[ सागर व ललिता जातात. ]

गौरी:—चंद्रिके ! अग चंद्रिके ! अ बाई, ही गेली तरी कुठं ! अग चंद्रिके ! ( चंद्रिका येते. ) कायग, कुठं गेली होतीस ?

चंद्रि०:—मी जरा खालच्या सज्जांत उभी होतें गम्मत पहात.

गौरी०:—कसली ग गम्मत ?

चंद्रि:०—शांतनुमहाराजांची स्वारी पुन्हा चांदे ले. .ावर होत आहे. स्वारशिवंदी रस्त्यानं चालली आहे. महाराजांना पोंचवायला बरेंच रथी महारथी निघाले आहेत.

गौरी:०—बरं, आणखी कुणी ?

चंद्रि:- आणखी कुणी, ते कोण ताईसाहेब ?

गौरी:—युवराज हो ! तुला काय व टतं, मी लाजेन नांव घ्यायला !

चंद्रि:—तसं वाटणं साहजिक आहे ! पण युवराजही बरोबर आहेत.

गौरी०:—होय का ! तर मग चल पांहू ग !

चंद्रि०:—पण ताईसाहेब, स्वारी बरीच पुढं गेली !

गौरी०:—बरं तर चंद्रिके ! सज्जांत जा आणि युवराजांची स्वारी परत येऊं लागली, कीं मला सांगायला ये, जा.

चंद्रि०:—पण ताईसाहेब ! मला आपण हांक कशाला मारली ?

गौरी०:—मला नाहीं बाई आठवत ! जा तूं ! ( चंद्रिका जाते ) युवराजांची स्वारी अंतःकरणांच्या रणांगणावर अवतरली म्हणजे शिपाई-प्यादे, विचार झटकन पळ काढतात ! संध्याकाळच्या वेळीं नानातऱ्हेचीं पुष्पं बगीच्यामध्यें दरवळत असतात; पण निशिगंध गायला लागला म्हणजे चटसारीं फुलं मुकीं होतात ! शूरांचा शूरपणा असा प्रखर असतो ! काजव्याप्रमाणं लिकलिकणारीं माणसं असल्या सूर्यापुढं तोंडसुद्धां काढीत नाहींत. ( ऐकल्यासें करून )—चंद्रिकेनं हांक मारली का ?—नाहीं भास झाला ? वेडया मना ! असं धडपडूं नकोस ? युवराजांचं दर्शन झालं म्हणजे त्या रागरंगामध्यें तूं दंग होऊन, ही गौरी देहभान विसरून जाईल.

( पद १७—राग बागेश्री ताल त्रिवट )

**रंगि, दंग होई । जीवा । रंगता प्रीति ॥ धृ० ॥ रवि**
**दर्शनानें कशि प्राचि रंगा ये । खुलतां फुलता छटा**
**गुलावी । तनु रंगली । मनही । प्रणयरंगांत ॥ १ ॥**

( चंद्रिका येते ) काय ग ? स्वारी फिरली ? चल पुढं !—पण हो, धांवत धांवत बागेंत जा आणि युवराजांवर उधळायला थोडीं फुलं घेऊन ये. जा जलदी !

[ जातात ]

———:※:———

## प्रवेश दुसरा.

स्थल—यमुनातीर.

[ मत्स्यगंधा येते. ]

मत्स्य०:—( स्वगत ) बाबांनीं मला सुकर्णाला द्यायचं नाकारलं, तरी माझ्या मनानं कुठं बाबांच्या नकाराकडं लक्ष दिलं ! सुकर्णाच्या माझ्या गांठी पडतात, आमचीं मुकीं प्रेमगीतं सुरू होतात, आणि घटकानुघटका या यमुनेच्या प्रवाहांत या नांवेंत आम्ही बाहूंच्या गाढ आलिंगनांत मग्न होतो ! त्या वेळीं बाबांच्या धाकाचा खडक आडवा येत नाहीं, दुष्ट चांचे लोकांच्या

जुलमाची भीति वाटत नाहीं.—प्रेमाच्या सागरांत ही हृदयनौका बेगुमानपणानं सारखी विहार करीत असते. सुकर्णासारख्या योग्य वराला जर बाबा मला देत नाहींत, तर एखाद्या राजाला देणार आहेत का ? आणि राजाशीं लग्न होऊन मी सुखांत पडेन, अशी तरी त्यांची खात्री आहे का ? सुकर्ण माझा राजा, मी त्याची राणी ! मी जगांतल्या कोणाच्याच राजाला ओळखीत नाहीं.

[ बृहस्पति व वाचस्पति येतात. ]

**बृह०**:—एकंदरींत या चांचे लोकांचं बंड पुरं मोडलं तर ! निदान या भागांत तरी त्यांची भीति नाहीं.

**वाच०**:—छत् ! त्यांच्या ह्याची आतां कांहीं मोठी ही नाहीं.

**बृह०**:—पण ही कोण पाहिलीस का ? [ मत्स्यगंधेस दाखवितो. ]

**वाच०**:—कायहो ! ही तर फारच ही आहे ! अगदीं स्वर्गांतली ही दिसते !

**बृह०**:—अप्सराच केवळ ! माझं सत्व पाहाण्याकरितां इंद्रानं हिला पाठविलेन खास !

**वाच०**:—माझंच सत्व पाहाण्याकरितां तिचं हें असेल !

**बृह०**:— अहो जाहो वाचस्पति ! आपली तपश्चर्या कांहीं माझ्याइतकी जाज्वल्य नाहीं.

**वाच०**:—अस्सं ! चला त्या हिलाच विच्यारूं तीच ह्याचा हा करील !

[ मत्स्यगंधेजवळ जातात ]

**बृह०**:—हे अप्सरे ! मी एक महाऋषि आहें.

**वाच०**:—( दुसऱ्या बाजूला जाऊन ) मीही एक हाच आहें.

**बृह०**:—माझी प्रखर तपश्चर्या पाहून मला तिजपासून पराङ्मुख करण्याकरितांच तूं आली आहेस ना ! बोल !

**वाच०**:—माझ्या ह्यापासून मला हें करण्याकरितांच तूं आली आहेस ना !

**मत्स्य०**:—( स्वगत ) हे दोघे ऋषि मला तर बाई निव्वळ भोंदू दिसतात. मी अप्सरा आहें, असं कां यांना वाटतं !

**वाच०**:—बोल ! तूं अशी ही कां ? सुंदरी ! मी तुझ्यावर अगदीं हा झालों आहें. पूर्वीचे सारे ऋषि असेच हे झाले होते.

**मत्स्य०**:—( स्वगत ) अग बाई ! मला तर भीति वाटते ! आतां काय करावं ?

**बृह०**:—तूं माझी हो, मी वाचस्पतीहून श्रेष्ठ आहें.

वाच०:—नाहीं–नाहीं. मीच याच्याहून हा आहें. तूं माझं सत्व हरण कर.

बृह०:—लाज नाहीं वाटत तुला दुसऱ्याच्या बायकोजवळ असं बोलायला ?

वाच०:—आणि तुला तरी ही नाहीं वाटत माझ्या हीजवळ असं बोलायला ?

मत्स्य०:—(स्वगत) कठिण प्रसंग ! इथून जावं झालं ! [ जाऊं लागते. ]

वाच०:—अशी जाऊं नकोस. माझ्या हीकडे लक्ष दे.

मत्स्य०:—हं खबरदार ! तुम्ही एवढे दाढीवाले ऋषि ! एवढाल्या थोरल्या जटा वाढविल्यात ! आणि अशा तऱ्हेचं वर्तन करितां ? जाऊं द्या मला !

बृह०:—मी मोठा विद्वान् आहें. मी सर्वशास्त्रपारंगत आहें. गणितशास्त्र, अर्थशास्त्र, ज्योतिषशास्त्र, नीतिशास्त्र—

मत्स्य०:—नीतिशास्त्राचं अध्ययन याच कारणीं लावणार वाटतं ?

वाच०:—सुंदरी ! मी नीतिशास्त्रांत हा असून पुन्हा याच्याहूनहीं हा आहे !

बृह०:—याचं नीतिशास्त्र फुकट आहे. मीच खरा खरा नीतिमान् पुरुष आहे. परस्त्री मला मातेसमान आहे.

मत्स्य०:—काय तरी बाई ! आपण काय बोलतां याचा आपल्याला कांहीं अर्थ समजतो का ? मी परस्त्री नाहीं का ?

बृह०:—असशील ! पण तूं माझ्याशीं विवाह केलास, कीं परस्त्री कुठून राहशील ?

वाच०:—वारे वाचस्पति ? चांगलं हें शास्त्र हें करतोस ! हे–हे–हे–आपलं–हो–सुंदरी ! हा नितिशास्त्रांत मुळींच प्रवीण नाहीं !

बृह०:—मुळींच प्रवीण नाहीं ? माझं कोणच्या शास्त्राचं अध्ययन झालं नाहीं ? जगाच्या प्रारंभापासून तों अंतापर्यंतचं सर्व ज्ञान मला आहे ! तत्वज्ञान, पदार्थविज्ञान, भूमिति, तर्कशास्त्र, वितर्कशास्त्र, न्यायशास्त्र, रसायनशास्त्र, संगीतशास्त्र, नृत्यशास्त्र, सूपशास्त्र—

वाच०:—पण मीही हें ज्ञान, तर्क हें, हें शास्त्र, आपलं हें शास्त्र, न्याय हें, सूप हें, हें शास्त्र यांत निष्णात आहें.

मत्स्य०:—तुम्ही कशांत कां निष्णात असा ना ! मला काय करायचं आहे ! तुम्ही जर एवढे विद्वान् अहां, तर माझ्यासारख्या पोरीचा असा छळ करायला तुम्हांला लाजच वाटली पाहिजे !

वाच:०—खरोखर ! या बृहस्पतीला असं हें करायला हीच पाहिली पाहिजे.

बृह०:—सुंदरी !

वाच०:—सुंदरी !

बृह०:—जास्त बोलूं नकोस.

वाच०:—तूंही जास्त हें करूं नकोस. !

बृह०:—थोबाडांतच खाशील !

वाच०:—तुझे हे पाडून टाकीन ! माझ्याशीं हीं आहे.

[ मत्स्यगंधेजवळ जातो. ]

बृह०:—जवळ जाऊं नकोस; सांगतोय !

वाच०:—तूं देखील हें करूं नकोस.

मत्स्य०:—अगबाई, हे दोघेही अगदीं लगट करूं लागले ! हं ! खबरदार ! तुम्हांला कांहीं लाजलज्जा आहे का ? पशुसुद्धां इतका हलकटपणा करीत नाहींत !

वाच०:—मी खरोखरच हा झालों आहें ! मला तूं आपलं हें–तपश्चर्याभ्रष्ट केलंस ! तुझा हात धरून—

[ हात धरायास जातो. ]

मत्स्य०:—धांवा–धांवा–या बैलांपासून मला सोडवा ! धांवा–धांवा !

वाच:—कितीही हें केलंस तरी कुणीही तुला आमच्या हातांतून हें करणार नाहीं.

मत्स्य०:—धांवा—धांवा—या पशूंच्या तावडीतून या गरीब गाईची मुक्तता करा ?

[ शांतनु येतो व दोघांनाही दोहींकडे फेंकतो. ]

शांत०:—हं खबरदार ! कुणी एक पाऊलभर पुढं सरकाल तर—

बृह०:—थांब ! तुला शापून भस्म करतों. माझी तपश्चर्या कांहीं अशी तशी नाहीं ! देऊं शाप ?

वाच०:—मीच याला हा देऊन हें करून टाकतों. काढूं मुखांतून हा ?

शांत०:—गप्प बसा आतां ! तुमच्या मुखांतून 'हा'च्या बाराखडी वांचून कांहीं एक निघत नाहीं.

वाच०:—असला हा आपण कधींही हें करणार नाहीं. आतां हा देऊन तुर्थं हें करून टाकतों.

शांत०:—अरे बेलाशक भस्म कर माझं ! खरोखर अग्नींत जाळल्या. खेरीज कांही माझं भस्म होणार नाहीं !

वाच०:—असं !–इथून पळून जा. नाहींतर देतों हां.

बृह०:—माझी दृष्टि तुझ्यावर येण्यापूर्वी इथून चालता हो. नाहींतर शापून दग्ध करीन.

शांत०:—मी इथून मुळींच जात नाहीं. करा दग्ध मला.

बृह०:—बरं तर ! हे मानवा ! तूं माझ्या लीलेंत विघ्न आणलंस,·जळूने भस्म हो !

[ डोळे मिटून बसतो, कमंडलूंतून पाणी टाकतो. ]

वाच०:—हे त्या ! तूं माझ्या ह्यांत हें केलंस, तेव्हां माझ्या ह्यानं तुर्थं हें होवो !

[ डोळे मिटून बसतो, कमंडलूंतून पाणी टाकतो. ]

शांत०:—अजून माझं शरीर शाबूत आहे मुनिवर्य ! आपल्या शापाचा कांही उपयोग झाला नाहीं.

[ दोघे उलट बाजूला फिरतात, व डोळे उघडून पहातात. ]

बृह०:—वाचस्पते ! त्या मानवाची जळून राख झाली ! कुठंही पृथ्वीवर आतां तो दिसत नाहीं ! कायरे माझ्या शापाचा प्रभाव !

वाच०:—माझ्या ह्याचा हा पाहिलास ? शापून हें करून टाकला !


बृह०:—भस्म–भस्म झालं ! विलक्षण सामर्थ्य माझं !

वाच०:—फारच विलक्षण माझं हें ! आतां आपण हें करूं.

[ बृह० व वाच० जातात. ]

मत्स्य०:—गेले बाई मेले बोकड ! सुकर्ण ! हे मुनि एवढे विद्वान् म्हणवतात; पण सारी अक्कल मातींत घालतात ! यांच्यापेक्षां आपण अशिक्षित कोळी–माळी पुष्कळ बरे. आतां आपण आलांत म्हणून बरं, नाहींतर या मेल्यांनी—

शांत०:—जाऊं दे या संकटाच्या गोष्टी ! तूं आपल्या बापाला न कळत इथं येतेस, माझी भेट घेतेस, माझ्याशीं प्रेमाच्या गोष्टी बोलतेस ! जरा कुठें



वाचस्पति - हे ह्या तूं माझ्या ह्यांत हें केलंस, तेव्हां माझ्या ह्यानं तुझं हें होवो ! [ पान ५४ ]

वाजलं, कुणी आलं कीं काय ?—कुठं कोणी बोललं कुणी पाहिलं कीं काय ? अशा विवंचनेंत आपली ही चोरटी भेट होत असते ! तेव्हां या वेळचा प्रत्येक क्षण आपल्याला महत्वाचा आहे.

**मत्स्य०**:—आजचा क्षण तर जास्तच महत्वाचा आहे. कारण सुकर्ण ! कल्पनाही नाहीं असं एक नवीनच संकट आज आपल्यावर आलं आहे ! शांतनु-महाराजांचं माझ्यावर मन गेलं आहे म्हणून मी ऐकलं ! बाबांच्यापासून बळ-जबरीनं तर त्यांचा न्यायचा विचार नसेल ना ?

**शांत०**:—मग त्यांत तुझं काय नुकसान आहे ? कारण तूं महाराजांची पट्टराणी झालीस, म्हणजे तुझ्या सत्तेला पारावारही रहाणार नाहीं ! हजारों दासदासी तुझ्यापुढं हात जोडून उभ्या रहातील ! रत्नखचित मुकुटावर हजारों राजे तुझ्या पायाची धूळ धारण करण्यांत भूषण मानतील ! वस्त्रभूषणं आणि ऐश्वर्य यांमध्यें तूं इंद्राणीलाही खालीं पहायला लावशील ! इंद्राच्या ऐरावतालाही लाजविणारे हत्ती आपल्या शुंडादंडांनीं लवून तुला मुजरा करतील ! सूर्याच्या घोड्यांनाही लाजविणारे घोडे तुझा रथ ओढतांना डौलानं छाती काढून धांवूं लागतील ! तुझ्या शब्दाबरोबर इकडची दुनिया तिकडे फिरेल ! मग हा सुकर्ण जिवंत आहे, कीं मेला आहे, हा विचारही तुझ्या मनाला स्पर्श करणार नाहीं.–

**मत्स्य०**:—तुमच्यानं असं बोलवतं तरी कसं ! आपण माझे पति—आपण माझे धनी,-आपण माझे राजे,-आपण माझे देव ! एखाद्या सार्वभौम राजाची राणी होण्याकरतां ही मत्स्यगंधा आपल्याशीं बेइमान होईल, असं आपल्याला वाटतं ना ?

**शांत०**:—क्षमा कर.-क्षमा कर ! माझ्या निष्ठुर भाषणानं तुझ्या अंतः-करणाच्या खरोखर चिंधड्या उडाल्या असतील ! लाडके ! क्षमा कर. प्रेमानं वेडावून गेलेल्या या जिवाला तुझ्या प्राप्तीची निराशा सहन न होऊन माझ्या तोंडांतून जे नीचपणाचे शब्द बाहेर पडले, याबद्दल रागावूं नकोस. लाडके, तुझ्यावर येणाऱ्या संकटांतून पार कसं पडतां येईल, याचा विचार केलाच पाहिजे. मी तर राजाचा ताबेदार ! जलयुद्धांत सदोदित त्याच्याजवळ असणारा, कांहीं झालं तरी स्वामिनिष्ठेपासून पराङ्मुख होणार नाहीं, असं

छातीला हात लावून सांगणारा ! या मोहिमेंत कित्येक वेळां महाराजांचा प्राण वांचवणारा !-माझी अक्कल तर गुंग होऊन गेली आहे !

मत्स्य०:—आपण मला या संकटांतून वांचवाल अशी माझी खात्री होती! मी एक गरीब पोर, अजाण, दुबळी; पण तशीच वेळ आली, तर प्राण देईन पण माझ्या प्रेमाच्या पतीशीं बेमान होणार नाही !

[ लहरी स्त्री-वेषांत येतो. ]

लह०:—महाराज ! एक जहाज दूरवर दिसूं लागलं आहे. कदाचित् ते चांचें लोकांचं असेल ! ते या कांठावर उतरले तर आम्ही त्यांचा समाचार घेतो, आपला जीव धोक्यांत घालूं नये, सेनापतीची अपल्या पायांपाशी विनंती आहे. [ लहरी जातो; मत्स्यगंधा चपापते. [

शांत०:—काय ! अजून या मर्कटांची —या चांचे लोकांची—ह्या सिंहाच्या जबड्यांत उडी घेण्याची इच्छा तृप्त झाली नाहीं कां ! निवांत गुहेंत स्वस्थपणानं मृगराज घोरत पडल्यामुळं मिळालेल्या शांततेंत सुख न वाटून, ह्या कोल्ह्यांनीं कोल्हेकुई करून मला डिवचण्याचा विचार केला आहे !—अरेरे ! घात झाला ! आतां हिला खरं सांगितल्यावांचून गत्यंतर नाहीं ! ( उघड ) लाडके ! एका-फक्त एका गोष्टीबद्दल मला क्षमा कर ! मीं तुला एका बाबतींत फसवलं आहे!

मत्स्य०:—मला वाटलंच ! आपण मला फसवलं ना ?

शांत०:—हो फसवलं ! पण कोणच्याही निंद्य तऱ्हेनं नाहीं. माझ्या मनांतून तुला एवढ्यांतच कळवायचं नव्हतं; पण कळवलंच पाहिजे.

मत्स्य०:—मग ! आपण दिसता तसे नाहीं तर ?—

शांत०:— लाडके ! दिसतों तसा नाहीं; पण मी तुझ्यावर प्रेम करणारा, तुझ्या सुखदुःखाची काळजी वाहणारा, तुझ्या प्राप्तीची इच्छा बाळगणारा तुझा प्रियकरच आहें.—आपला प्रेमबंध तुटणार नाहीं, आपल्या विवाहांत अडचण येणार नाहीं, आपली ताटातूटही होणार नाहीं ऐक—ऐक ! अशी घाबरूं नकोस ! मी सुवर्ण नाहीं,—मी कोळी नाहीं,—मी राजाच्या जहाजावरचा नाखवा नाहीं, मीं प्रत्यक्ष राजा आहें !

मत्स्य०:— काय राजा ! आपण राजे ! आपण राजे !—काय—काय काय केलंत हें !

शांत०:—गप्प ! रडूं नकोस ! रडूं नकोस ! माझं अंतःकरण फुटून जाईल ! माझ्या सर्व सुखदुःखांचा भार तुझ्यावरं आहे-हा जीव तुझ्या चरणांवर वाहिला आहे ! त्यांच वाटेल तें करण्याची तुला मुभा आहे. मला आपल्या राज्याची, जातीची कुळाची, कसलीही पर्वा नाहीं. तुला आपलीशी करण्याकरितां मी या जगाला अंतरलो तरी चालेल !

मत्स्य०:—अशा तऱ्हेनं फसवून मला आपली राख—

शांत०:—काय राख ! नको,-नको,-बोलूंस. तुला मी रखेली करीन हें शक्यच नाहीं ! तूं माझा प्राण आहेस, तूं माझी राणी आहेत, तुझं माझ्यावर प्रेम आहेना ?

मत्स्य०:—माझं तुमच्यावर प्रेम आहे, त्यामध्यें कशांनही अंतर पडणार नाहीं ! पण आपण महाराज अहां असं जर मला कळतं तर मी आपल्यापुढं उभी सुद्धां राहिलें नसतें ?

शांत०:—भाग्य माझं म्हणून तुझ्या माझ्या प्रथम भेटीच्या वेळीं मी नाखव्याचा वेष घेतला होता. तूं अजून अशी कां ?

मत्स्य०:-मी अशी कां! तेंच मला समजत नाहीं.आपण मला प्रियच आहां; पण आपण महाराज आहां असं ऐकल्यापासून.माझ्या मनाला कससंच वाटतं.

शांत०:—मी तुझा सुकर्णच आहें असं समज; म्हणजे तुला बरं वाटेल. मी खरा कोण हें एवढ्यांत बाहेर फुटतां कामा नये. सुकर्ण हाच राजा, असं तुझ्या बापाला कळलं तर त्याच्या मनाला त्रास होईल.

मत्स्य०:—महाराज ! आपण या सर्व जगाचे सार्वभौम राजे असलां, तरी मी आपली योग्यता त्या माझ्या गरीब सुकर्णाइतकीच समजतें ! राजाची राणी होऊन माझा वडेजाव झाला नाहीं ! सुकर्णाच्या गरीब राणीचीही तीच योग्यता आहे.

( पद १८—राग पहाडी झिंजोटी ताल केरवा )

राजा वा रंक सारे ते। सारखेच प्रेमा ॥ धृ० ॥ जाति
भेदा तिळ भर स्थान न। त्या प्रणयीं मनुजाला। राज
राज ते बंदी होती। लागतां बाण हृदया त्या कामाचा।
'हाय हाय प्रेमा' ॥ १ ॥

शांत०:—चल ! आपण इथं फार वेळ रहातां कामा नये तुला तुझ्या घरीं पोंचवतो आणि जातां जातां आपली एकंदर हकीगत तुला सांगतों. [ जातात. ]

## प्रवेश तिसरा.

स्थळ—धीवराचें घराजवळ

( कोळ्याच्या मुलींचा नाच )

[ भीष्म, राजगुरु, बृहस्पति, वाचस्पति, सागर वगैरे येतात. ]

भीष्मः—राजगुरु ! काय असेल तें असो, आज माझी चित्तवृत्ति अत्यंत उल्हासित आहे ! एखाद्या घनघोर लढाईवर जातांना भावी जयाची खात्री असल्यावर ज्याप्रमाणं बाहूंना स्फुरण चढतं, त्याप्रमाणंच आज माझ्या अंतःकरणाच्या आनंदी मनोवृत्तींनीं नाच मांडला आहे !

( पद १९—राग मालकंस–एक ताला )

या तनुला अवचित । कां स्फुरवित । हृदय तें मुदित ।
नरवर समर वरि पारिहि । ध्रु० ॥ सुधांशु नभिं उगवताचि
जलधीही स्फुरे तो प्रमुदित । वीरवृत्ति उधळुनि बल ।
देति नरां समरिं विजय ॥ १ ॥

बृह०:—युवराज ! महाराजांनीं जो या धीवर–कन्येशीं विवाह करण्याचा विचार केला आहे, तो आम्हांला मुळींच संमत नाहीं. जातीजातींत अशा तऱ्हेभ्रष्टाकार होणं आम्हांला मुळींच इष्ट वाटत नाहीं.

वाच०:—माझंही ह्याच्यावर हेंच हें आहे. युवराज ! मला जरा हें करायचं आहे. माझ्या हेच्या सिध्यर्थ मीं आतां आपल्यापुढं हें मांडतों. प्रथमतः ह्या ग्रांत फारसं हें नाहीं. दुसरं, हा संबंध ह्या विरुद्ध आहे. तिसरं, ह्यापासून आपल्या स्वतःलाही हें आहे ! चवथं, हें हेच मुळीं हें आहे.

राज०:—वाचस्पति ! तुमचं म्हणणं योग्य आहे. पण आपल्या या हा, ही, हेचा अर्थ आम्हांला समजून देण्याकरितां या बृहस्पतींना विनंति करा.

वाच०:—राजगुरु, आपलं नेहमींच हे फार ! असला हा कांहीं हा नव्हे ! आमचं हें जर हें झालं नाहीं, तर आम्ही इथून हें करूं.

बृह०:—आमची या संबंधाला हरकत आहे. आमच्या हरकतीकडे जर लक्ष न घाल, तर आम्ही इथून निघुन जाऊं.

राजा०:—ठीक आहे. पण स्वस्थ चित्तानं जरा बसा; मग आपण या प्रश्नाची वाटाघाट करूं.

[ हुजऱ्या येतो. ]

हुज०:—सरकार ! भैरवधीवरांना घेऊन अमात्य येत आहेत.

[ हुजऱ्या जातो. ]

भीष्म:—सागर ! सामोरे जाऊन त्यांना मोठ्या सन्मानानं घेऊन या.

सागर०—आज्ञा.

[ सागर पुढें जातो. अमात्य, भैरव, सरदार वगैरे येतात. ]

भैर०:—( स्वगत ) मी कोणी तरी फार मोठा माणूस आहें, यांत शंका नाहीं !

भीष्म:—भैरवनाथ ! आपल्याला कां निमंत्रण केलं हें अमात्याकडून कळलंच असेल. आमचे वडील शांतनुमहाराज यांना आपली मुलगी मत्स्यगंधा द्यावी, अशी आमची विनंति आहे; आणि ही मागणी घालण्याकरितांच आपल्याला तसदी दिली !

भैर०:—( स्वगत ) बरं कुळ भेटलंय. सुकर्णाची मागणी मान्य केली नाहीं, हे बरं नाहीं केलं ? पण यानं हुरळून जातां कामा नये. आपला मतलब साधेल तितका साधला पाहिजे.

बृह०:—वाचस्पति, आजपर्यंत बाप मुलाला मुली शोधीत असे. मुलानं बापाकरितां मुलगी शोधण्याची चाल आतांपासून प्रचारांत येणार !

वाच०:—अहो, पण युवराज स्वतःकरतांच कां नाहीं ही ही घालीत ?

भीष्म०:—भैरवनाथ ? आपण बोलत कां नाहीं ? आपली स्तब्धता माझ्या अंतःकरणांत काळजी उत्पन्न करते आहे. माझं म्हणणं आपल्या लक्षांत आलं ना ?

भैर०:—भीष्मा, तुझं म्हणणं माझ्या लक्षांत आलं. माझ्या जातीपैकींसुद्धां पुष्कळांनीं मागणी घातली आहे; पण मी अजून कुणालाही रुकार दिला नाही. अहो, कोण उगीच रुकार देतो ? काय एवढी घाई आहे तिच्या लग्नाची आत्ताच ? पण कांहीं तसाच विशेष फायदा होण्याचा संभव असला, तर पहातां

येईल विचार करून! माझी मुलगी तुझ्या बापाला देऊन त्यांत आमचा विशेष काय फायदा होणार आहे?

नाग०:—अरेरेरे! आपल्याला राजाच्या सासरा होण्याचा मान मिळणार. आपली मुलगी महाराणी होणार, यांत कांहींच नाहीं?

भैर०:—तशा दृष्टीनें ही सोयरीक अत्यंत इष्ट आहे; आणि असला सों गमावल्याबद्दल कुणालाही पश्चात्तापच होईल! शांतनुमहाराजांसारखा व माझ्या मुलीला योग्य आहे. पण—

भीष्म:—पण काय? आपली काय अडचण असेल, ती सांगा. ती दूर करणं आमचं काम आहे.

भैर०:—भीष्मा, मी म्हणतों ती अडचण इतकी सोपी नाहीं.

भीष्म:—आपली कोणचीही अडचण असेल, ती स्पष्ट बोला; ती दूर करायला हा भीष्म तयार आहे. महाराजांच्या मागणीचा धिक्कार झालेला या भीष्माला कसा सहन होईल!

भैर०:—भीष्मा, तुमचं हें स्थळ माझ्या मुलीला सर्वतोपरी योग्य आहे. पण त्यांत सापत्नभाव हा एक मोठा दोष आहे.

भीष्म०:—सापत्नभावाबद्दल आपल्याला काळजी करायचं मुळींच कारण नाहीं. कारण, त्याचा संबंध प्रत्यक्ष माझ्या स्वतःशींच यायचा आहे.

भैर०:—त्याचा संबंध तुझ्या स्वतःशींच येणार आहे. हीच गोष्ट काळजी उत्पन्न करणारी आहे. भीष्मा! तूं मोठा पराक्रमी आहेस, देवगंधर्वांनाही अजिंक्य आहेस, राजकारणांतही अत्यंत कुशल आहेस, अशा स्थितींत माझी मत्स्यगंधा तुमच्या इथं दिली, तर तिच्या संततीला कोणच्या वैभवाची आशा करायला जागा आहे?

भीष्म:—आपलं म्हणणं मला जरा चमत्कारिक वाटतं! आपली मुलगी महाराजांची राणी झाली, म्हणजे तिच्या पोटीं उत्पन्न होणारे पुत्र माझ्या प्रमाणंच राजपुत्र होणार आहेत ना?

भैर०:—भीष्मा, महाराजांनीं तुला युवराज केलं आहे, आणि तुला टाकून महाराज दुसऱ्या कोणाला राज्यावर बसवतील, हें शक्यच नाहीं?

भीष्म:—भैरवनाथ! आपल्या म्हणण्याचा आशय मला कळला. आपल्या कन्येला पट्टराणीपद मिळून तिच्या पोटीं उत्पन्न होणाऱ्या संततीला



भीष्म—आजन्म अविवाहित राहून मी कडकडीत ब्रह्मचर्य व्रताचं आचरण करीन. ( पान ६१ )

या सिंहासनाचा उपभोग मिळावा, मी त्याच्यावर कोणत्याही तऱ्हेचा हक्क सांगूं नये, असंच जर तुमचं म्हणणं असेल, तर या सर्व लोकांसमक्ष पंचमहाभूतांना साक्षी ठेऊन, मी अशी प्रतिज्ञा करितों, कीं तुमच्या कन्येच्या पोटीं जो पुत्र जन्म घेईल, तोच सिंहासनाचा अधिकारी होऊन सर्व पृथ्वीवर सत्ता चालवील, आणि हा भीष्म त्याला आणि त्यांच्या वंशजांना जिवांत जीव असेपर्यंत स्वामी समजून एखाद्या सामान्य सैनिकाप्रमाणं त्याची प्रत्येक आज्ञा शिरसा-वंद्य करील!

**राज०:**—कोण ही घोर प्रतिज्ञा! अशी प्रतिज्ञा या पृथ्वीतलावर जन्म घेणाऱ्या कोणाही पुरुषानं आजपर्यंत केली नाहीं व पुढंही करणार नाहीं!

**भैर०:**—( स्वगत ) अरेच्चा! थोडं धीरावरानं, युक्तियुक्तिनं घेतलं म्हणजे असा फायदा होतो. आतां यांत अजून थोडी खुबी राहिली आहे, ती साधते का पाहूं!

**भीष्म:**—भैरवनाथ, आतां आपलं समाधान झालं ना? आपल्या वंशजांना राज्यपद मिळण्याच्या कार्यांत आतां कसलंही विघ्न येण्याचा संभव नाहीं. आतां मागणी मान्य केली अशीं मधुर अक्षरं आपल्या मुखांतून निघालीं म्हणजे मी कृतकृत्य होईन.

**भैर०:**—भीष्मा! तुझ्या या न भूतो न भविष्यति, अशा प्रतिज्ञेनं तूं आपल्या वडिलांच्या मार्गातली मोठी अडचण दूर करून माझ्या मुलीलाही सुखी केलंस! तूं योद्धा आहस, सत्यप्रतिज्ञ आहेस; आणि जिवांत जीव आहे तोंपर्यंत त्या प्रतिज्ञेप्रमाणं वागण्याच्या कामांत तूं मुळींच कसूर करणार नाहींस! पण——

**भीष्म:**—पुन्हा पण! आतां आणखी कोणाची शंका राहिली आहे?

**भैर०:**—भीष्मा, मुलीच्या बापाचं मन मोठं वेडं असतं. कन्येच्या हिताच्या आड येणाऱ्या ज्या ज्या गोष्टी असतील त्या त्या त्याच्या दृष्टीसमोर दत्त म्हणून उभ्या राहतात. तूं प्रतिज्ञा केली आहेस, तेव्हां तुझ्याकडून माझ्या मुलीच्या संततीला बाधा होईल हें शक्यच नाहीं. पण तुझे पुत्रपौत्र कांहीं तुझ्या प्रतिज्ञेनं बांधले जात नाहींत!

**भीष्मः**—अशाच जर तुमच्या मनांत शंका असेल तर तिचंही निरसन करितां येईल. पित्याच्या कल्याणाकरितां देहत्याग करण्याचा प्रसंग आला तरी तो मला प्रियच आहे ! ऐका ! सर्व देव, ऋषि, गंधर्व, यक्ष, किन्नरहो ऐका ! राजगुरु अमात्य, सेनापति, सर्व रथीमहारथीहो ! ऐका ! या ब्रह्मांडाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत एकमेकांपासून दूर दूर वास करणारे, जगाच्या अनंत कालांत उत्पन्न झालेले व पुढें होणारे सर्व वीरहो ! ऐका ! हा भीष्म या भर दोनप्रहरच्या वेळीं, अखिल जगताला आपले सर्व नेत्र उघडून आपल्या प्रखर प्रतापानं प्रकाशित करणारा हा दैदीप्यमान सूर्यनारायण साक्षी ठेऊन अशी प्रतिज्ञा करतों आहें, कीं आजन्म अविवाहित राहून कडकडीत ब्रह्मचर्यव्रताचं मी आचरण करीन ! निपुत्रिक झाल्यामुळं मला स्वर्गांत जागा न मिळो; नरकाच्या कोणत्याही घाणेरड्या कूपांत यमदूत मला लोटून देवोत; ब्रह्मचर्यव्रताच्या खडतर आचरणानं माझ्यावर दुःखाचे पर्वत कोसळोत; प्रजेला असंतुष्ट केल्यामुळं माझ्यावर शिव्या-शापांचा केवढाही वर्षाव होवो; माझ्या पुत्रपौत्रांकडून हविर्भाग मिळण्याची आशा मुळींच न राहिल्यामुळं सर्व देव देवी शस्त्रास्त्रांचा माझ्यावर एकवटून मारा करोत; तरुणीच्या प्रेमाची निराशा झाल्यामुळं तिच्या पेटलेल्या अंतःकरणाच्या ज्वाळा लागून माझं हृदय होरपळून जावो; हा भीष्म यांपैकीं कोणत्याही संकटाला न जुमानतां आपली प्रतिज्ञा पुरी करीलच करील ! ( पुष्पवृष्टि होते, व "हा भीष्म" "हा भीष्म" "हा भीष्म" असें सर्व ओरडतात. )

**धीर०**:—भीष्मा ! तुझ्या या प्रतिज्ञा ऐकून माझा आनंद गगनांत मावेनासा झाला आहे. आतां माझी मत्स्यगंधा महाराजांना द्यायला मला कसलींही हरकत नाहीं !

**बृह०**:—आमच्या म्हणण्याकडं कुणीच लक्ष देत नाहीं ! आम्ही प्रथमपासून या असल्या विवाहाला विरुद्ध ! चला, वाचस्पति आपण इथून निघून जाऊं !—

[ बृह० व वाच० जातात. ]

**राज०**:—भीष्मा, तूं प्रतिज्ञा केल्यास खऱ्या; पण महाराजांच्या आणि धीवरकन्येच्या या लग्नाच्या कामांत अजून एक मोठी अडचण आहे. महा-

राजांवर सर्व प्रजेचं अत्यंत प्रेम आहे; अशा मिश्रविवाहानं प्रजा रुष्ट होण्याचा संभव आहे; आणि तें होणं केव्हांही श्रेयस्कर नाहीं. तेव्हां, सर्व ऋषींची सभा करून मी या मिश्रविवाहाच्या प्रश्नाचा निकाल लावीपर्यंत हा विवाह करायला मला संमति देतां येत नाहीं!

भीष्मः—राजगुरु! या भीष्माचा दृढ-निश्चय आणि भीषण-प्रताप यांची आपल्याला नीटशी कल्पना नाहीं, म्हणूनच असले शब्द आपल्या मुखांतून बाहेर पडले! ऋषिमंडळाच्या प्रतिकूलतेला मी भीक घालणार नाहीं, प्रजेच्या इतराजीला मी जुमानणार नाहीं! जगांतल्या सर्व वीरांच्या शस्त्रास्त्रांला मी दाद देणार नाहीं! हा भीष्म धनुष्य-बाण घेऊन सज्ज आहे तोंपर्यंत महाराज व मत्स्यगंधा यांच्या लग्नासंबंधानं माझा जो निश्चय झाला आहे, त्यापासून मला रतीभरही ढळविणं जगांतल्या कोणाच्याही शक्तीला अशक्य आहे!

( पद २०—राग सारवा ताल तिताला )

मिळविनें विजया। वचन साच मम। त्यागित चंदन ना।
झिजुनि गंधं॥ ध्रु०॥ त्यागि नराला तुच्छ जगत् हें।
निंदा स्तुतिचा त्या न बाध॥ १॥

[ पडदा पडतो. ]

अंक तिसरा समाप्त.

# अंक ४ था.

## प्रवेश पहिला.

स्थळ — बाग-झोला

[ चंद्रिका व गौरी प्रवेश करितात. ]

**चंद्रि०:**—ताईसाहेब ! आपल्याला थोडी करमणूक हवी का ? तो वाचस्पति ऋषि इकडेच येतो आहे. त्या दिवशीं ललिताबाईनीं केलेली थट्टा आपल्याला सांगितली होती. बोलवूं का त्याला इकडे ?

**गौरी:**—कशाला बोलावतेस ? या ऋषींच्या भाकडकथा ऐकण्याचा मला मोठा कंटाळा आहे बाई ! आकाशांत भरारी मारून ढगावर आनंदानं झोंपा घेणारा आत्मा त्यांच्या कर्णकटु वाणीनं जागा होतो आणि या पृथ्वीवरच्या रुक्षरूढीच्या खडकावर आदळून फुटून छिन्न विच्छिन्न होतो. प्रेमीजनाला प्रेमाची तपश्चर्या करून मोक्ष पावणाऱ्या मुनींच्या वचनाची किंमत ! ज्याच्या स्वप्नांत देखील प्रेम आलं नाहीं, त्या या लांब दाढीच्या जटाधारी ऋषीच्या भाषणापासून मला काय मौज वाटणार ?

**चंद्रि०**—ताईसाहेब ! आपण म्हणतां तसा जरी हा ऋषि असला, तरी त्याच्या भाषणापासून आपणाला गम्मतच वाटेल ! पण लांब कशाला ?—हा पहा तो ऋषि आलाच !

[ वाचस्पति येतो. ]

**गौरी:**—या मुनिवर्य ! मी आपल्याला वंदन करतें.

**वाच०:**—मी तुला हें करायला आलों नाहीं. माझं ताईसाहेबांकडे हें आहे.

**चंद्रि०:**—( हंसून ) पण ताईसाहेब या.

**वाच०:**—आज कांहीं मी असा हा व्हायचा नाहीं. त्या दिवशीं एक आम्हांला हें नव्हतं ! पण आज आम्हीं फसूं की काय ?—मी काय गाजरपारखी आहें, असा हा व्हायला ?

**गौरी:**—पण मुनिवर्य—

**वाच०**—चूप—बोलूं नकोस ! तुला कुणी मधें मधें हें करायला सांगितलं आहे ? ( चंद्रिकेस ) ताईसाहेब ! ही ही फारच ही आहे बुवा.

**चंद्रि०**:—मुनिवर्य ! तुमचा माझ्यावर विश्वास आहे ना ?

**वाच०**:—ताईसाहेबांवर कुणाचा हा —विश्वास असणार नाहीं ?

**चंद्रि०**:—मग मी सांगतें, त्याच ताईसाहेब !

**वाच०**:—छे: छे: छे: छे ! अगदीं बोलूं नका. अहो, हिचा हाच सांगतो आहे, कीं ही कांहीं ह्या नव्हत. काय हिचं हें ! काय हिचा हा ! नाक तर काय—अगदीं हें ! शिवाय, अगदींच पोरकट ! ताईसाहेब ! नाहींतर आपलंच हें पहा यांच्या बहुतेक उलट ! शिवाय आम्ही हे–सर्वज्ञ आहों ना ?

**गौरी**:—खरं आहे मुनिवर्य ! याच ताईसाहेब !–पण आपलं येणं कां झालं ?

**वाच०**:—कांहीं विशेष या करतां नाहीं. आज ह्याला गेलों होतों. महाराजांनीं ह्यापाशीं ही घातली होती. आमची ही विरुद्ध होती. तिकडे कुणी हेंच देईना. तेव्हां निघून आलों.

**गौरी**:—चंद्रिके ! मला जरा अर्थ सांग ग, या मुनिवर्यांच्या भाषणाचा !

**वाच०**:—( चंद्रिकेस ) ताईसाहेब ! ही तुमची ही फारच ही दिसते ! हिला जरा हें करा. आमच्यासारख्या ह्यांचा असला हा !

[ चंद्रिका हंसते. ]

**गौरी**:—मुनिवर्य ! क्षमा करा. पण पुढचं हें काय ?

**वाच०**:—पुढं असं. ह्यांनीं केली ही कीं, हें कांहीं म्हणून करायचं नाहीं. आम्हीं हें केलं; पण त्याचा कांहीं हा झाला नाहीं.

**गौरी**:—कुणी काय केलं ?

**वाच०**:—ह्यांत ना ? हात्तिच्या ! ह्यांनीं आपलं-हें केलं !

**गौरी**:—पुन्हा सांगा वरं ?

**वाच०**:—पुन्हा काय सांगा ! ह्यानं हें केलं, ह्यांत काय पुन्हा पुन्हा सांगा.

**गौरी**:—रागावूं नका मुनिवर्य ! पण आज आपल्याबरोबर ते हे नाहीं आले ?

**वाच०**:—कोण ? ते आपले हे ?

**गौरी**:—हो. हेच !

वाच०:—हो बरी ही झाली! ते जरा बाहेर हे आहेत! मला आतां हें आहे, तेव्हां मी हें करतों. [ वाचस्पति जातो. ]

गौरी:—चंद्रिके! तूं म्हणालीस तें खरंच! या ऋषीच्या भाषणाची गंमतच आहे. बरं, तूं आतां जा. मी जरा या झोल्यावर बसतें. युवराज संध्याकाळीं येतील, थोडी फुलं गोळा कर. ( चंद्रीका जाते, )

( पद २१—राग झिंजोटी ताल केरवा )

**जोडा शोभे गमनीचा। त्या काम रतीचा॥ धृ०॥ झोला झुलतां वनिं। सावरि सख्याला रति। जेंवि खेळवि बिजली घनश्याम नभीचा॥ १॥**

(गौरी झोल्यावर झोका घेतां घेतां मध्येच थांबवून) या वृक्षाला टांगलेल्या या झोल्यावर बसलेली जर यावेळी मला युवराजांनीं पाहिली तर ते खास या सुमोरच्या कुंडीतल्या गुलाबाच्या कळीशीं माझी तुलना करतील! ही कलिका माझ्याप्रमाणंच गुलाबी वस्त्र परिधान करून या लांब लवचिक देठाच्या झोल्यावर बसून वाऱ्याच्या झुळकेसरशी आनंदानं झोके घेत आहे! अहाहा! ही कालिका आपल्या परिमलानं ही सगळी बाग जशी दरवळून सोडते, तुझ्यासमोर मी या झोल्यावर बसावयाचं साहास केलं या बद्दल रागावूं नकोस! ही मी खाली उतरतें. ( खाली उतरते तोंच कलिकाही गळून पडते. ) काय! मला उतरलेली पाहातांच तूंही आपल्या सुंदर झोल्याचा त्याग केलास? माझ्यावर रागावलीस? मी झोल्यावर पुन्हा बसतें—तूंही आपल्यावर चढ!—तूं वर चढत नाहींस? मी मनांत येतांच या झोल्यावर चढतें; पण कलिके! तुला हा तुझा सुंदर झोला पुन्हा जागा देईल का?

[ ललिता येते ]

ललि०:—दैवाचा झोला तुटला, कीं त्याच्यावर कुणालाही जागा मिळत नाहीं!

गौरी:—ललिते! ही कलिका कां ग आपल्या झोल्यावर चढत नाहीं.

ललि०:—तुला आपल्या झोल्यावर चढतां येत नाहीं म्हणून?

गौरी:—कां बरं! माझ्या झोल्यावर ही मी चढतें!

ललि०:—पण गौरी! तुझा खरा झोला तुटून गेला!

**गौरीः**—ह्मणजे ! ललिते ? बोल-बोल माझा कोणता झोला तुटून गेला ?

**ललि०ः**—ज्याच्या सहवासांत तुला आनंद वाटत होता, त्या तुझ्या प्रियकराच्या प्रेमाच्या झोल्याचे बंद तुटून तो तुला कायमचा अंतरला !

**गौरी०ः**—काय ! काय ! माझा प्रेमाचा झोला तुटून गेला ! असं झालं तरी काय ! युवराजांनीं माझा प्रेमबंध तोडून टाकला ? काय-काय झालं ? सांग !

**ललि०ः**—युवराजांनीं प्रतिज्ञा केली !

**गौरी०ः**—प्रतिज्ञा केली ! कसली ?

**ललि०**—आजन्म अविवाहित राहिन अशी !

**गौरीः**—अग आई !—युवराजांनीं अशी प्रतिज्ञा केली ? मला आपल्यापासून दूर लोटली ? माझ्या प्रेमाचा डाव संपला ! माझ्या सूर्याचा प्रकाश आटला ! [ मूर्छित पडते ]

**ललि०**—अगबाई हिला मूर्छा आली ! गौरी ! गौरी ! सावध ! हो ! या तुझ्या लाडक्या ललितेकडं पहा ! गौरी ! गौरी ! दैवानं पुरा दावा साधला या मधमाशीचं पोळं चोरून नेलं ! या फुलपांखराचे पंख तोडून टाकले ! गौरी ! गौरी ! डोळे उघड !

( **पद २२**—चाल-जिसपे मिटता है० )

**प्रीतिसरिता आटली । ना वाहे ती । नशिबा ॥ प्रेमतारा**
**तुटला । ना लटके तो । गगना ॥ पंख तुटतां गगनीं ।**
**विहग पडे हा मरूनी । प्रेम पुतळी फुटली । ना जडतां**
**ये । नशिबा ॥ १ ॥**

[ गौरी सावध होते, ]

**गौरी**—ललिते ? तूं माझा घात केलास ? माझे प्राण हा देह सोडून जात होते, पण तुझ्या प्रेमळ वाणीनं ते मागें फिरले ! कशाला मला जिवंत केलंस ?

**ललि०ः**—तूं जर जागी झाली नसतीस, तर मलाही आपले प्राण द्यावे लागले असते !

**गौरीः**—युवराज ! आपण माझ्यावर इतके कां रागावलां ? माझ्या हातून असा कोणचा गुन्हा झाला ! म्हणून या दुःखाच्या कड्यावरून माझा कडेलोट केलात ! निर्मळ प्रेमाचा मोबदला दैवा हाच कारे ? युवराज ! आपल्याबरोबर

कड्याडोंगरांत–रानावनांत निःशंकपणानं खेळणारी वागडणारी ही गौरी आपली प्रेमाची राणी व्हायला पात्र नाहीं, असं जर आपल्याला वाटत होतं, तर यापूर्वीच माझ्या उरांत खंजीर भोसकून माझे प्राण कां घेतले नाहींत! पण आतां हा निराशेचा खंजीर माझ्या कोवळ्या हृदयांत घुसतांना शतशः विंचू चावल्याप्रमाणं मला यातना देतो आहे!

**ललि०**:—गौरी! गौरी! हा शोक आतां आवर! युवराजांनीं तुझ्या जन्माचं नुकसान केलं. आतां शोक करून काय फायदा?

**गौरी**:—त्यांनीं माझ्या जन्माचं नुकसान केलं, असं तूं म्हणतेस, मी नाहीं म्हणणार! युवराज थोर आहेत! आणि दुसऱ्याचं नुकसान होईल असं कोणचंच कृत्य थोरांच्या हातून होत नाहीं! –त्यांना प्रतिज्ञा करायला कारण काय झालं असेल? एखाद्या वलिष्ठ राजाची कन्या त्यांना सांगून आली असेल! माझ्यावरच्या प्रेमामुळं त्यांनीं तिचा अव्हेर केला असेल! महाराज युवराजांवर रागावले असतील! आणि उद्वेगाच्या भरांत युवराजांनीं ही भयंकर प्रतिज्ञा करून आपलं नांव सार्थ केलं असेल.

**ललि०**:—गौरी! तूं म्हणतेस त्यांतलं कांहीं एक कारण झालं नाहीं. महाराजांच्या आणि मत्स्यगंधेच्या लग्नसंबंधांत मत्स्यगंधेच्या वापानं अशी अट घातली, कीं आपल्या मुलीच्या वंशजाकडं गादी चालावी आणि भीष्माच्या संततीपासून तिला त्रास होऊं नये.—

**गौरी**:—म्हणून युवराजांनीं स्वतः राज्यपदावर लाथ मारली आणि आजन्म अविवाहित राहीन, अशी घोर प्रतिज्ञा करून त्यांनीं आपलं नांव अजरामर केलं ना?–युवराज! युवराज! केवढी तुमची थोरवी! केवढा तुमचा लौकिक! केवढा तुमचा स्वार्थत्याग! ही गरीब गौरी आपल्या पायाच्या धुळींत लोळायलाही योग्य नाहीं. युवराजांची सहचारिणी व्हावं, असं गौरी! तुझ्या मनांत तरी कसं आलं! त्या सूर्यापुढं ही तारका प्रकाश पाडील असं तुला कसं वाटलं! ललिते! अगदीं कालची गोष्ट! याच वागेंत याच झोल्यावर मी बसले होतें, इतक्यांत युवराज आले मी खिदळत झोके घेत होतें, 'तेहीं हास्यमुखानं माझ्याकडं पहात होते. पाहतां पाहतां काय बाई झालं कुणाला ठाऊक! त्यांनीं एकदम झोल्यावर उडी मारली! मी घेतलेल्या झोपानं



गौरी — अहाहा ! युवराज ! केवढी तुमची थोरवी ! [ अं. ४ प्र. १ ]

युवराजांचं समाधान कुठून होणार ? ते मोठमोठ्यानं झेपा घेऊं लागले, त्या वेळीं आमचा झोला विमानासारखा आकाशांत विहरत होता. ऐन भरांत झेपा घेतांच त्यांना घाबरून टाकण्याकरितां मीं एकदम उडी टाकली !–पण ते मुळींच घाबरले नाहींत. माझ्यापूर्वीच त्यांची उडी जमिनीवर पडून त्यांनीं मला वरचेवर झेलून धरलं ! ललिते ! मागच्या एक एक गोष्टी आठवूं लागलं, कीं दुःखाच्या भारानं हृदय दावलं जाऊन जीव गुदमरून जातो ! युवराज !—

( पद २३—राग गौरी ताल तिताला )

**बावऱ्या जीवा न साहे प्रीतिघात ॥ धृ० ॥ भालीं दिसे नकाशा । प्रेमा घोर निराशा । हा दैवा ! या जीवा काळ रात्र ॥ १ ॥**

**ललि०:**—गौरी ! कितीही आक्रोश केलास. तरी आतां काय होणार ? दुःखाचा डोंगर कोसळला, तरी खरीं धीराचीं माणसं डगमगून जात नाहींत.

**गौरी:**—ललिते ! तुझं म्हणणं खरं आहे ! निराशेच्या प्रसंगीं मीं हातपाय गाळले, जसा माझ्या नांवाला डाग लागला, तर तो मला कधींही सहन होणार नाहीं. युवराजांनीं पित्याच्या सुखाकरितां असला स्वार्थत्याग केला, हा त्यांचा मोठेपणाचं झाला ! पण पुत्राला असली प्रतिज्ञा करायला भाग पाडणाऱ्या त्या पित्याला—शांतनुराजाला—काय म्हणावें हेंच समजत नाहीं !–ललिते ! माझ्या मनांत एक विचार आला आहे, तो मी तुला सांगूं का ?

**ललि०:**—सांग—सांग गौरी !

**गौरी:**—युवराजांच्या व माझ्या प्रेमाची कथा महाराजांना माहीत नसेल ! महाराज इथं आहेत का ?

**ललि०:**—हो आतांच त्यांचा नगरप्रवेश झाला !

**गौरी:**—तर मग मी आतां त्यांची भेट घेणार ! लज्जा, विनय यांची अशा प्रसंगीं पर्वा करणारी ही गौरी नाहीं ! महाराजांच्या कानावर सारी हकीगत घालीन आणि त्यांनाच मार्ग विचारीन ! भरतखंडाच्या सार्वभौमराजाच्या मुखांतून निघणारा प्रत्येक शब्द गौरीच्या दुःखाचं शमन करण्यास समर्थ होईल !

[ जातात. ]

## प्रवेश दुसरा.

स्थळ—राजवाड्याची बाग.

[ शांतनु येतो. ]

**शांत०:**—मत्स्यगंधा मला देतांना भैरव धीवर असली विलक्षण अट घालील, असं जर मला पूर्वीच ठाऊक असतं, तर मत्स्यगंधेचं हरण मी निराळ्याच मार्गानं केलं असतं! भीष्मानं सारा जन्म अविवाहित राहून ब्रह्मचर्यव्रताचं आचरण करावं,—आणि या चाळिशीच्या घरांत पाऊल टाकलेल्या त्याच्या पित्यानं—या शांतनूनं—एका सुंदर तरुणीच्या प्रेमपाशांत गुरफटून तिची प्राप्ति करून घेण्यासाठीं धडपड करीत बसावं! भीष्मा! शाबास! शाबास! अघोर प्रतिज्ञेनं स्वार्थत्यागाचा कडेलोट केलास! कुणीकडे तुझी पितृभक्ति, आणि कुणीकडे माझं पुत्रप्रेम! जमीन-अस्मानाचं अंतर! तुझी भयंकर प्रतिज्ञा सप्त पाताळ भेदून गेली असेल! भैरवाचं पाषाणहृदय भीष्माच्या प्रतिज्ञेनं भंगून गेलं असेल! पित्याच्या भग्न हृदयांतून वाहणारा रस मत्स्यगंधेच्या नेत्रांवाटे आनंदाश्रूंच्या रूपानं चमकूं लागला असेल! पण मत्स्यगंधे! जरी माझ्या भीष्मानं तुझा मार्ग मोकळा केला, तरी हट्टी आणि दांभिक ऋषींच्या मतांचे खडक तुला ओलांडावे लागणार!—माझ्यासारखा सामर्थ्यवान राजा देखील समाजबंधनानं बांधला जावा ना?—माझ्या आणि मत्स्यगंधेच्या विवाहाला समाज मान्यता देवो न देवो; ऋषि-महर्षि त्याला आपली संमति देवोत न देवोत; राजगुरूची अनुमति याला मिळो न मिळो; हा शांतनु समाज ऋषि, महर्षि, राजगुरु कुणाचीही पर्वा न करितां! मत्स्यगंधे! तुझ्या गोंडस हस्ताचं ग्रहण केल्यावांचून स्वस्थ बसणार नाहीं!

[ राजगुरु, बृहस्पति, वाचस्पति येतात. ]

या राजगुरु! ऋषिवर्यांना वंदन असो!

**राज०:**—महाराज? आपल्याला एक आनंदाची वार्ता कळविण्याकरितां मी आलों आहे. आपला व मत्स्यगंधेचा विवाह होण्याला कोणच्याही प्रकारची हरकत उरली नाहीं. सर्व महर्षींना अशा तऱ्हेचा मिश्रविवाह मान्य असून महा-

राजच या कामीं समाजाला वळण घालून देणार हें पाहून तर ते आपल्याला आशीर्वाद देऊं लागले आहेत!

बृह०:—सर्व महर्षि जरी अनकूल असले तरी आम्ही दोघे अनकूल नाहीं. क्षत्रियांचा आणि धीवरांचा विवाहसंबंध आमच्या मतें अगदीं अनिष्ट आहे!

शांत०:—कां बरं! असा मिश्रविवाह नसावा काय म्हणून?

वाच०:—मी सांगतों बृहस्पति! असा हा मुळीं भ्रष्टतेच्या ह्यानं पाहिला तर अगदीं हाच आहे.

राज०:—वाचस्पति! आपण या बृहस्पतींकडेच बोलायचं काम सोंपवा. आपण हवं तर त्यांना सूचना देत जा.

वाच०:—राजगुरु! तुम्ही जेव्हां तेव्हां माझा असा हा करिता! आपल्याला मोठे हे समजता!

शांत०:—शांत व्हा वाचस्पति! बृहस्पति, मी तुम्हांला पुन्हा विचारतों कीं जातीजातींत जर विवाह झाले, तर त्यापासून समाजाचं काय नुकसान होणार आहे?

वाच०:—मी सांगतों—

शांत०:—नाहीं. बृहस्पतींनाच सांगू द्या.

बृह०:—एक तर अशा लग्नापासून उत्पन्न झालेल्या संततीला कोणच्या जातींत घालायचं?

राज०:—विश्वकर्त्या परमेश्वरानं जी मानवजात उत्पन्न केली आहे, तिच्यामध्यें पुच्छ नसलेल्या पशूंचा जर समावेश करितां येतो, तर पूर्णप्रेमानं उत्पन्न झालेल्या सच्छील माणसांचा कां होऊं नये?

बृह०:—हें कांहीं उत्तर नव्हे!

राज०:—असल्या मूर्खपणाच्या शंकेवर काय उत्तर द्यायचं आहे? मनुष्ययोनि तर राहोच, पण पशुयोनि व मनुष्ययोनि यांच्या संयोगानं उत्पन्न झालेली संततीही मानवी कोबीत जिरली जाते.

बृह०:—उदाहरण दाखवा?

राज०:—दाखवूं? ऋषींच्या सर्व कथांचं नीट पठण करा, आपल्या स्वतःच्या जन्माची चौकशी करा आणि मग माझ्यासमोर वादविवादाला येऊन बसा.

**शांत०:**—बृहस्पति ! या मुद्यांत कांहींच अर्थ नाहीं. दुसरा कांहीं मुद्दा आहे का ?

**वाच०**—आहे-आहे, तर ?

**शांत०:**—वाचस्पति ! आपण बोलूं नका. बृहस्पतींनाच बोलूं द्या.

**बृह०:**—मिश्र रक्ताची संतति अगदीं नेभळी आणि मूर्ख असते.

**राज०:**—मी तर याच्या उलट सिद्ध करून देतों. मिश्रविवाहानं उत्पन्न झालेली संतति, फारच पाणीदार आणि बुद्धिवान् असते. शेंकडों उदाहरणं दाखवून देतां येईल. वाचस्पति सारखे कांहीं अपवाद सांपडतील !

**वाच०:**—राजगुरु ! मी जरा बसलों, म्हणून तुम्ही—

**शांत**—गप्प रहा मुनिवर्य. बृहस्पति ! आणखी कांहीं मुद्दा आहे का ?

**बृह०:**—महाराज ! आणखीही एक महत्वाचा मुद्दा आहे. अशा लग्नापासून पुढं निर्वंश होतो. महाराज ! आपल्या थोर घराण्याचा निर्वंश होणं चांगलं नाहीं.

**राज०:**—या म्हणण्यांत कांहीं एक अर्थ नाहीं. आयुर्वेदाच्या दृष्टीनं कांहीं लोक हा मुद्दा पुढं आणतात खरे; परंतु याच्या उलटही प्रतिपादन तितक्याच जोरानं पुष्कळ महर्षींनीं केलं आहे यामुळं याच्यावद्दल निश्चयात्मक असं कांहींच ठरवितां येत नाहीं.

**बृह:**—पण सर्वांत मोठा प्रश्न वर्णसंकराचा आहे. वर्णसंकर झाला म्हणजे समाज भ्रष्ट होऊन आमचा हा भरतखंड अगदीं नीचदशेला येईल ?

**शांत०:**—अनीतिपासूनही भ्रष्टाकार होतो ना ?

**बृह०:**—हो, हो तर. नीति राखणं हा प्रत्येकाचा धर्म आहे.

**शांत०:**—मग समजा, कीं एखाद्या उच्च वर्णांतल्या पुरुषानं नीच वर्णांतल्या स्त्रीशीं वाईट वर्तन केलं. समजा, एखादा मुनि एखाद्या कोळ्याच्या मुलीच्या मागं लागला, तर त्याला अनीति म्हणतां येईल ना ?

**बृह०:**—हो, येईल !

**शांत०:**—त्याच्यावर वर्णसंकराचा दोष येईल काय ?

**बृह:०**—अलबत येईल ?

**शांत०:**—समजा, कीं, ते पशूंसारखे ऋषि तिच्यावर जबरी करूं लागले, तर ते शिक्षेला पात्र होतील का ?

बृह०:—( स्वगत ) अरे बापरे ! आमच्यावरच कटाक्ष दिसतो ! या वाचस्पतीनं ही गोष्ट बाहेर फोडली !

वाच०:—( स्वगत ) माझ्यावरच ह्याचा हा दिसतो आहे. हा बृहस्पति असाच हा आहे !

बृह०:—( हळू ) वाचस्पति ! तुम्ही पाजीपणा केलात !

वाच०:—( हळू ) तुम्हींही हाच केलात.

शांत०:—बृहस्पति ! आपण माझ्या प्रश्नाला उत्तर कां दिलं नाहीं !

बृह०:—यांत काय उत्तर द्यायचं ? हा कांहीं हल्लींच्या वादाचा मुद्दा नाहीं !

शांत०:—बृहस्पति ! आपल्या व्रताचा विचार देखील न करितां पशूंप्रमाणं एखाद्या अनाथ अबलेच्या मागं लागणं, धडधडीत वेश्यागमना-सारख्या निंद्य व मानवी शक्तीचा ऱ्हास करणाऱ्या मार्गाचं अवलंबन करणं, वाचेनं उच्चारलेल्या शब्दाच्या अगदीं उलट आचरण करणं, या गोष्टींनीं देखील भ्रष्टाकार होत नाहीं, समाजाची अवनति होत नाहीं, राष्ट्राचा ऱ्हास होत नाहीं, असे तुमचे म्हणणे ना ? या असल्या वर्तनानं तुमच्या अंगीं एखाद्याला जाळून भस्म करण्याचं सामर्थ्य असेल असं मानणं, म्हणजे निव्वळ मूर्खपणा आहे ! अशा नीच वर्तनाला कडकडीत तपश्चर्या समजून तुमचं सत्व हरण करण्याकरितां इंद्रादि देव अप्सरांची योजना करतील, आणि त्या अप्सरा तुमच्या या तेजः पुंज चेहेऱ्याला आणि अगाध विद्वत्तेला मोहून जाऊन तुमच्यावर आषक होतील, हें मनांत सुद्धां आणूं नका! मांजर डोळे मिटून दूध पितं, त्याला वाटतं आपल्याला कुणी पहात नाहीं.

बृह:— असल्या भ्रष्ट राज्यांत आम्ही राह्यला तयार नाहीं !

वाच:— असलं हें करणाऱ्या ह्यांत आम्ही हेंच करणार नाहीं !

बृह०:—एक क्षणभर सुद्धां इथं राहाणं म्हणजे पापपंकांत राहिल्याप्रमाणं आम्हांला वाटत आहे ! आम्ही येतों महाराज !

वाच०:—मीही हें करतों ! पण जाण्यापूर्वी थोडं हें करतो; तें आपण हें करावं ! हे राजगुरु म्हणजे हे आहेत ! त्यांना ज्ञान कसं तें हेंच नाहीं ! आम्हांला जर हें करितां तर आम्हीं इथं हें केलं असतं ! महाराज ! आपणही हेंच ! तेव्हां इथं हें करणं हेंच नाहीं. [ बृह० व वाच जातात. ]

**राज०**:—ठीक झालं ! असल्या ऋषींना दरबारांत आश्रय कसा मिळाला, यांचच सर्व ऋषाना आश्चर्य वाटत होतं ! ते आपण होऊन गेले बर झालं. महाराज ! आपल्या विवाहाला सर्व महर्षींची सम्मती आहे, तेव्हां आपण आतां लग्नतयारीला लागण्याबद्दल अमात्यांना आज्ञा करा, मी येतों आतां !

[राजगुरु जातात. ]

**शांत०**:—आज मी आनंदाच्या शिखरावर आरूढ झालों, यांत शंका नाहीं ! आतांपर्यंत मत्स्यगंधा मला दिसत. होती, तिचं मधुर भाषण मला ऐकू येत होतं, तिच्या प्रेमळ सहवासाचाही लाभ मला मिळात होता; पण हा सर्व प्रकार स्वप्नाप्रमाणं भासत होता ! तिच्या माझ्यामध्यें विशाल पर्वत, खोल खोल दऱ्या, भयंकर नद्या, घोर अरण्यआडवी पडलीं होती ! सप्तसमुद्रांनीं आम्हांला वेगळं ठेवलं होतं ! पण राजगुरुंच्या मुखांतून मंत्रोच्चार निघतांच एकेक पर्वत विरघळून गेला ! एक एक दरी भरून आली ! एक एक नदी आटून गेली ! एक एक अरण्य अदृश्य झालं ! सप्तसमुद्रांचं मृगजल ठरलं ! आणि मत्स्यगंधा व मी आमच्या विवाहप्रसंगीं आमच्यामध्यें धरलेल्या अंतःपटाच्या अंतरावर आलों ! आज मी कृतकृत्य झालों ! माझ्या समाधानाला—माझ्या आनंदाला आज पारावार नाहीं ! आज मी माझ्या सहवासानं माझ्या दृष्टीच्या फेऱ्यांत येणाऱ्या प्रत्येक वस्तूला हंसायला लावीन ! माझा आनंद पाहून —माझा हा प्रफुल्ल चेहरा पाहून या बागेंतील दरोबस्त फुलंही आनंदानं हंसू लागली आहेत ! अशा वेळीं दुःखाचा विचार कोणा मानवी पुष्पाच्या मनाला त्रास देत असेल ?

[ गौरी येते. ]

**गौरी**— महाराज ! महाराज ! या गरीब मुलीला मार्ग दाखवा !

**शांत०**:—कोण ! गौरी ! वीरध्वजाची—माझ्या जिवलग मित्राची कन्या गौरी ! तूंचही ? आणि तूं रडतेस ? माझ्या आनंदाच्या वेळीं तुझ्यासारख्या कोंवळ्या जीवाला यातना झालेल्या मला कशा सहन होतील !—गौरी ! सांग सांग तुझ्या दुःखाचं कारण ! तुझ्या तोंडून शब्द निघतांच, तें दूर झालं म्हणून समज.

**गौरीः**—महाराज ! माझ्या दुःखाचं कारण दूर करणं इतकं सोपं नाहीं! —रागाऊं नका. आपण सार्वभौम राजे असलां तरी तें दूर करणं आपल्या

सामर्थ्याबाहेर आहे.—प्रेमाची आशा दाखवून शेवटीं मला दुःखाच्या डोहांत लोटून दिलं !

**शांत०**:—हं असलं अमानुष कृत्य करणारा कोण सांग पाहूं ? बिलकूल भीति धरूं नकोस. प्रत्यक्ष माझा नातलग असला तरी या शांतनूच्या क्रोधदृष्टीपुढं तो हातपाय गाळल्यावांचून राहणार नाहीं.

**गौरी**:—आपल्या क्रोधदृष्टीपुढं हातपाय गाळील, इतका निर्बळ तो नाहीं ! उच्चारलेला शब्द मागं घेईल, इतका निराभिमानी तो नाहीं ! शब्दाला शब्द, क्रोधाला क्रोध, शस्त्राला शस्त्र, अस्त्राला अस्त्र, हाच त्याचा बाणा आहे !—हाच त्याचा धर्म आहे !—हाच त्याचा मान आहे !

**शांत०**:—असला अद्वितीय पुरुष ह्या भूमंडलावर फक्त एकच आहे ! आणि तो माझा लाडका भीष्म !

**गौरी**:—तेंच—तेंच त्या पुरुषाचं नांव !—महाराज ! मी लहान बालक, आपल्यासारख्या महान् पुरुषाशीं कसं बोलावं हें मला कळत नाहीं. प्रेमानं वेडावून गेल्यामुळं लज्जा, विनय मी बाजूला सारून माझी कहाणी सांगण्याकरितां मी धांवत आलें. महाराज ! युवराजांचं आणि माझं परस्परांवर प्रेम होतं ! त्या प्रेमाच्या जादूनं आतांपर्यंत आम्हांला भारून टाकलं होतं ! आपल्या अनुमतीनं आमचा विवाह होईल, अशीही आम्हांला आशा होती ! पण आज युवराजांच्या मुखांतून कडाडत बाहेर पडलेल्या विद्युल्लतेनं माझ्या अंतःकरणाचा भेद करून माझा प्रेमवृक्ष उन्मळून टाकला !

**शांत०**:—गौरी ! तुझी ही करुण वाणी माझ्या कर्णरंध्रांत घुसून माझ्या हृदयाचं विदारण करते आहे. धिःकार—धिःकार ! केवढा मूर्ख मी ! माझ्या शिरावर कडाडलेला हा वज्राघात मला जमिनींत गाडून का टाकीत नाहीं ! भयंकर विचाराचे घाव मस्तकांत बसून तें फुटून कां जात नाहीं ! भीष्म-गौरीचं प्रेम मला दिसलं नाहीं, इतका कसा मी अंधळा झालों ! भीष्म-गौरीचीं प्रेमसंभाषणं माझ्या कानीं आलीं नाहींत इतका कसा मी बहिरा झालों ! भीष्म-गौरीचं तारुण्य माझ्या लक्षांत आलं नाहीं, इतका कसा मी मूढ बनलों ! मूर्खा शांतनु ! फुकटरे फुकट तूं आपल्याला न्यायी म्हणवतोस ! थेरड्या बापाच्या लग्नाकरतां मुलगा अविवाहित राहतो, हा न्याय का ? स्वार्थाकरितां बाप मुलाला स्वार्थत्याग करायला लावतो, हा न्याय का ? कोण याला न्याय म्हणेल ?

**गौरी**:—महाराज ! गोष्ट होऊन गेल्यावर शिव्याशाप घेऊन स्वतःला कष्ट नका देऊं ! मी इथं न्याय मागण्याकरतां आलें नाहीं ! आपल्या व त्या भाग्यशाली धीवरकन्येच्या प्रेमांत खोड काढण्याकरतां मी आलें नाहीं ! किंवा युवराजांसंबंधानं गाऱ्हाणं करण्याकरतांही मी आलें नाहीं ! मी एक अजाण पोर—प्रसंगानं घाबरून गेलें ! या पेटलेल्या वणव्यांत मला वाट दिसत नाहीं ! युवराजांच्या हाताचा घट्ट आश्रय सुटून गेला ! त्यांच्या उदार हृदयाचा सहवास संपून गेला ! त्यांच्या प्रेमाच्या दृष्टीच सुख मला दुर्मिळ झालं ! मी काय करूं ? महाराज ! मी काय करूं ? कुठं जाऊं ? कुठं राहूं ? कुठं पाहूं ?

**शांत०**:—गौरी ! तुझं समाधान मी आतां कोणत्या तोंडानं करूं ? शांतनु—शांतनु ! या चांचे लोकांच्या स्वारीवर जायची बुद्धि तरी तुला कां झाली ! भीष्माचा हिरमोड केला, मत्स्यगंधेच्या जाळ्यांत अडकलों, आणि शेवटीं प्रियपुत्राच्या आणि गौरी ! तुझ्या ताटातुटीला कारण झालों !—जारे कुणी भीष्माला घेऊन या. ( भीष्म येतो ) भीष्मा ! मला इच्छा होतांच तुझं आगमन झालं, यावरून तूं दीर्घायुषी आहेस, यांत शंकाच नाहीं ! परंतु मनुष्यप्राण्याचं आयुष्य मर्यादितच आहे. जा, तूं इच्छामरणी होशील हा माझा तुला वर आहे ! भीष्मा ! इच्छा असेल, तोंपर्यंत या आयुष्याचा उपभोग घे ! तोंपर्यंत काळालाही तुझ्यावर चालून येतां येणार नाहीं ! माझ्या इच्छेप्रमाणं तुझं येणं झालं, तेव्हां पुढेंही माझ्या इच्छेप्रमाणंच सगळ्या गोष्टी घडून येतील, असं मला वाटूं लागलं आहे.

**भीष्म**:—महाराजांची काय इच्छा आहे !

**शांत०**:—भीष्मा ! माझ्या सुखाकरतां तूं जो स्वार्थत्याग केलास, तो केवळ अपूर्व आहे ! त्याच्या तोडीचा स्वार्थत्याग पूर्वीं कुणीही केला नाहीं आणि कोणाच्याही हातून पुढेंही होणं शक्य नाहीं ! तुझ्या या अलौकिक उदारपणाबद्दल तुला योग्य मोबदला देणं माझ्या सामर्थ्याबाहेर आहे. तूं आपली पितृभक्ति जशी दाखवली आहेस, तसंच मलाही माझं पुत्रप्रेम दाखवलं पाहिजे. भीष्मा, या गौरीची आणि तुझी प्रेम-कथा मला आतांच समजली. माझ्या सुखाकरतां तूं राज्याचा त्याग केलास यांत मला विशेष वाटलं नाहीं ! माझ्याकरतां तूं मत्स्यगंधेच्या संततीची गुलामगिरी पत्करलीस, याचं मला वाईट वाटलं नाहीं !



शांतनु — भीष्मा ! गौरीच्या प्रेमाचा स्वीकार कर अशी माझी तुला आज्ञा आहे. [ अं. ४ प्र. २ ]

पण माझ्याकरतां तूं प्रेमाची आहुति दिलीस, गौरीकरच्या प्रीतीची राख केलीस, याचं मात्र मला विशेष वाईट वाटलं-अद्‌भुत वाटलं-अमानुष वाटलं!

**गौरी:**—महाराज !

**शांत०:**—गौरी ! तूं स्वस्थ हो ! भीष्मा ! तूं आजन्म अविवाहित राहीन अशी जी प्रतिज्ञा केलीस, ती जरी माझ्या सुखाकरितां केलीस, तरी तीपासून मला सुख होणं शक्य नाहीं. तूं आणि गौरी दोघंही तरुण आहां. यौवनाच्या कल्पनातरंगांत तुम्ही दोघंही खेळत होतां, निर्मळ प्रेमापलीकडे तुमचे विचार धांवले नव्हते, अशा वेळीं तुमच्या परस्परांच्या लीलेकडे पाहून सुख मानण्यांत, तुमच्या परस्परांच्या प्रेमांत आनंद मानण्यांत, तुमच्या ब्रह्मानंदांत धन्यता मानण्यांत, मला भूषण होतं ! तुमच्या वियोगाच्या पापाचं खापर माझ्या माथ्यावर फुटणार ! गौरीच्या अंतःकरणांतून निघणारे करुणस्वर माझ्या हृदयाला टोंचण्या देणार ! प्रजेचे शिव्याशाप मला बाधणार ! आणि ज्या प्रेमाची प्राप्ति म्हणून तूं स्वतःच्या प्रेमावर पाणी सोडलंस, त्या प्रेमाचा उपयोग मत्स्यगंधेच्या सहवासांत घेत असतां प्रेमाचं भेसूर पिशाच्च माझ्या दृष्टीसमोर उभं राहून मला भेवडावून सोडील. भीष्मा ! आपली प्रतिज्ञा मागं घे आणि गौरीच्या कोमल कराचा स्वीकार कर !

**भीष्म:**—महाराज ! आपली आज्ञा या भीष्माच्या हातून अमान्य होण्याचा प्रसंग कधीं येईल असं मला वाटलं नव्हतं ! पण तो प्रसंग शेवटीं आलाच ! "मत्स्यगंधेची प्राप्ति झाल्यावांचून माझे प्राण रहाणार नाहींत," ही आपली करुणवाणी प्रेमाच्या सागरांत विहार करणाऱ्या या भीष्माच्या कानांमध्यें घुमत असतांना केवळ स्वार्थबुद्धिनं जर मी भिष्म स्वस्थ बसलों, आपलं इच्छित कार्य तडीला नेण्याकरतां जर सर्वस्वावर पाणी सोडलं नाहीं, आपल्या प्राणाकरितां प्राण द्यायला जर मी धांवून गेलों नाहीं, तर शांतनुमहाराजांसारख्या पुण्यश्लोक राजाच्या पोटीं जन्म घेऊन यानं केलं तरी काय, म्हणून सर्व जगभर माझी छिः थुः झाली असती !

**शांत०:**—पण तीच छिः थुः सहन करण्याचा प्रसंग आज माझ्यावर आला आहे ! स्वतःच्या क्षणिक विषयसुखाकरितां पुत्राला आपल्या स्वर्गीय प्रेमावर लाथ मारायला लावणारा हा शांतनु यापूर्वींच मेला कां नाहीं, म्हणून सारं

जग माझ्याकडे पाहून नाक मुरडीत असेल !—नको तो अपमान ! पश्चात्तापदेवता माझ्या अंतःकरणांत जागृत झाली आहे ! नको—नको त्या यातना ! भीष्मा ! गौरीचा स्वीकार केला, असे अमृताचे शब्द बोल आणि माझ्या अंतःकरणाची शांति कर.

भीष्म—महाराज ! हीच माझ्या कसोटीची वेळ आहे. अशा वेळीं आपली आज्ञा, गौरीची दीन वाणी, प्रजेचीं आर्जवं, एकवटून माझ्या मनाचा तांबा घेण्याकरितां जिवावर उदार होऊन लढत आहेत ! पण माझ्या या स्वयंभू खडकाच्या अभंग किल्ल्यावर त्यांचा मारा बिलकूल चालत नाहीं. महाराज ! आपला अपमान मी करतों आहें, असं आपण मुळींच समजं नका. गौरीच्या मनाला शांत करून तिच्या अंगाच्या स्वर्गीय गुणाला जागृत केलं, म्हणजे आपलं समाधान होईल ना ! गौरी !—

गौरीः—युवराज ! मला महाराजांच्या समोर पाहून आपल्याबद्दल तक्रार करण्याकरितां किंवा पुन्हा आपली प्राप्ति करून घेऊन स्वतःचा स्वार्थ साधण्याकरितां मी इथं आलें, असा तर आपला समज होणार नाहीं ना ? वडिलांच्या सुखाकरितां आम्हीं मुलांनीं जर झीज सोसली नाहीं, तर जन्माला येऊन आम्हीं केलं तरी काय ? आपणाला आपली अलौकिक पितृभक्ति दाखविण्याचा प्रसंग आला, दैवाच्या दुष्टपणानं मला तशी संधि मिळाली नाहीं !—युवराज, आपला हा अपूर्व स्वार्थत्याग मला दिसला नसता तरी बरं झालं असतं ! तो दिसल्यापासून आपल्या विषयींच्या माझ्या प्रेमानं विराटरूप धारण केलं आहे ! माझ्या हृदयसिंहासनावर युवराज बसले आहेत ! माझ्या अवयवांत युवराज बोलत आहेत ! माझ्या नसांनसांतून युवराज नाचत आहेत ! या झाडावर—वेलीवर—कारंज्यावर-पृथ्वीवर-हवेंत-प्रकाशांत-आकाशांत-जिकडे तिकडे युवराज मिरवीत आहेत ! अशा स्थितींत ही गौरी त्यांच्यापासून जमीन-अस्मानाप्रमाणं वेगळी झालेली पाहून माझ्या हृदयाचा बंध तुटून गेला आहे. युवराज ! या प्रसंगीं गौरीला आपण बरोबर घ्यायला विसरलां ना ? कड्याडोंगरांत मी आपल्या बरोबर धांवलें,—रानावनांत मी आपल्याबरोबर हिंडलें,-नद्यातलावांत मी आपल्याबरोबर पोहलें-हवेंत-आकाशांत देखील, आपण कल्पनेच्या भराऱ्या मारीत असतां मीं आपली मिठी सोडली नाहीं; पण

स्वर्गाच्या द्वारांत पाऊल पडतांच आपण मला धक्का देऊन खोल खोल लोटून दिलंत हें आपल्याला शोभतं ना ? हें आपल्याला रुचतं ना ?.....

**भीष्मः**—गौरी ! या सर्व वेळीं तूं माझ्याबरोबर होतीस ! आणि आतांही आणि पुढंही तूं माझ्याबरोबरच आहेस ! हृदयाच्या सरोवरांत विहार करणारी गौरी जरी स्मृतीच्या जल–पृष्ठावर अदृश्य झाली, तरी गौरी ! तुझ्या प्रेमळ स्पर्शानं माझ्या शरीरांत खेळणारी विद्युल्लता गुप्त रूपानं हृदयाच्या सरोवरांत अगदीं तळाशीं, मला देखील न कळत दडून बसली आहे ! आणि तेथून तुला हद्दपार करीन अशी प्रतिज्ञा करून जरी मी लपंडाव खेळूं लागलों, तरी नेहमीं-प्रमाणं गौरी ! याही वेळेस मलाच हार खावी लागणार हें पक्क समज.

**गौरीः**—लपंडाव ! लपंडाव ! आतां कुठला लपंडाव ! लपंडावांत आपण मला या वेळीं चकवलं ! आपण मला फसवलं !

**शांत०ः**—भीष्मा ! गौरीचा हृदयभेदक स्वर सहन करण्याची शक्ति माझ्या अंगीं नाहीं. तूं पाषाणहृदयी आहेस ! आपली प्रतिज्ञा मागं घे ! प्रतिज्ञेहून प्रीति श्रेष्ठ आहे. गौरीचा स्वीकार कर, ही माझी आज्ञा आहे. पित्राज्ञा उल्लंघन केलीस तर त्याचा परिणाम भयंकर होईल.

**भीष्मः**—काय भयंकर परिणाम व्हावयाचा असेल तो होवो, माझी प्रतिज्ञा अभेद्य आहे ! आपल्या आज्ञेची अवहेलना केल्याबद्दल सारी प्रजा माझ्यावर असंतुष्ट झाली, सर्व वीर, रथी–महारथी–अतिरथी जरी माझ्या विरुद्ध झाले, प्रत्यक्ष आपण-माझे वडील–शांतनुमहाराज–आपण जरी आपली आखिल सेना सज्ज करून रणांगणावर ठाकलां, एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी करणारा माझा गुरु भार्गवराम जरी आपली सर्व अस्त्रविद्या घेऊन माझ्यावर एकदम कोसळला। किंवा प्रत्यक्ष परमेश्वर या विश्वाचा याच वेळेला प्रलय करण्याकरितां जरी उठला तरी हा भीष्म आपली प्रतिज्ञा कालत्रयीं मागं घेणार नाहीं !

**शांत०ः**—कुलांगारा ! कुलकलंका ! पाषाणहृदया ! भीष्मा !—

**गौरीः**—( शांतनूच्या पाया पडून ) महाराज ! महाराज ! या गरीब गौरीकडे पहा ! आणि मुखावाटं शापाचा उच्चार करूं नका ! ज्या मुखानं आत्तांच आपण युवराजांना इच्छामरणी केलं, त्याच मुखानं त्यांच्यावर अग्नीचा वर्षाव करूं नका ! महाराज ! या गरीब गौरीला एवढी भीक घाला !

भीष्मः—गौरी ! नको—नको तूं महाराजांना आडवूं. पित्याच्या मुखांतून निघालेल्या ज्वालेनं हा देह पंचमहाभूतांत मिसळून जाईल, आणि त्यांच्याच आशीर्वादानं या भूमीवर अनंतकालापर्यंत भोगाव्या लागणाऱ्या दुःखापासून माझी मुक्तता तरी होईल.

शांत०:—भीष्मा! तूं माझा पुत्र आहेस ना ?

भीष्मः—पुत्राचा कोणचा धर्म माझ्या हातून पाळला जात नाहीं ? पित्याची प्रत्येक आज्ञा पुत्रानं मान्य करावी. हा नेहमींचा नियम आहे; पण मनुष्याच्या आत्मत्यागाच्या कसोटीच्या वेळीं त्याच्या स्वाभिमानापासून त्याला भ्रष्ट करूं पाहणारी पित्राज्ञा पाळणं म्हणजे मूर्खपणा आहे ! महाराज ! या वेळीं मीं आपला अपमान केला आहे असं जर आपल्याला वाटत असेल, तर मला क्षमा करा ! गौरी मी प्रतिज्ञाभ्रष्ट होऊन तुझा स्वीकार करूं का ?

गौरीः—छेः छेः ! आपण जर प्रतिज्ञाभ्रष्ट झालां, तर मी आपल्याशीं कधींही लग्न करणार नाहीं ! आपल्या प्रतिज्ञेपासून—आपल्या शीलापासून—आपल्या उच्चस्थानापासून ढळणारा वीर, गौरीचं पाणिग्रहण करण्याला लायखच नाहीं !—युवराज ! पित्याचा कोप झाला, तरी तुम्ही दग्ध होणार नाहीं ! दुःखाचा डोंगर कोसळला, तरी तुम्हांला चुरडून टाकणार नाहीं ! विषाचा पाऊस पडला, तरी तुम्हांला यातना होणार नाहींत ! जोंपर्यंत आपली प्रतिज्ञा अभेद्य आहे, तोंपर्यंत देव, गंधर्व, राक्षस, सारं विश्व जरी आपल्यावर तुटून पडलं, तरी या गौरीच्या प्रेमाचं कवच त्यांच्यापासून आपलं रक्षण करायला समर्थ आहे !

भीष्मः—गौरी ! गौरी या भीष्माला योग्य आहे, असंच सर्व जग म्हणत राहील.

गौरीः—पण जगानं असं म्हणावं, अशी माझी इच्छा नाहीं ! भीष्माच्या पायांच्या धुळींत लोळणारी गौरी भीष्माच्या नावाशेजारी बसून भीष्म—गौरी म्हणवून घ्यायला मुळींच तयार नाहीं ! युवराज ! आपल्या प्रतिज्ञेचा बाण माझ्या हृदयाला प्रथम असह्य झाला, म्हणून रागावूं नका ! त्याच बाणानं गौरीच्या डोळ्यांसमोरील अभ्रपटल नाहींसं करून आपलं खरं रूप मला दाखवलं. त्या रूपाचं ध्यान करीत ही गौरी आपली अवतारसमाप्ति करीत आहे. पतिव्रतास्त्रिया आपलं सारं पुण्य पतीच्या चरणीं अर्पण करतात. मी माझं सारं पुण्य,—माझं सारं सत्त्व—माझं सारं सामर्थ्य आपल्याला देत आहें !

आपण अनंतकाल या माझ्या मातेच्या पाठीवर खेळ खेळा ! आपली धनुर्विद्या, आपली अस्त्रविद्या अनंतकाल चमकूं द्या ! आपलं चरित्र अनंतकालपर्यंत लोकांसमोर राहूं द्या ! ही आपली प्रेमकहाणी,–ही करुणकथा सारी मनुष्ययोनी विसरून जाईल. प्रत्यक्ष आपणांला, महाराजांना किंवा जीवजंतूना देखील तिची स्मृति राहणार नाहीं ! आणि भीष्मासारखा आद्वितीय पुरुष. आजपर्यंत निर्माण झाला नाहीं, आणि पुढंही होणार नाहीं, म्हणून हें भूमंडळ दुमदुमूं लागेल ! हाच माझा आपल्याला वर आहे–हाच माझा आपल्याला प्रेमाचा नजराणा आहे–हीच माझी आपल्या चरणांवर वाहिलेली शेवटची प्रेमाची पाकळी आहे ! माते ! माते ! माते ! दुभंग हो ! आणि आपल्या हृदयांत मला जागा दे ! या गौरीला–आपल्या कन्येला–आपल्या पोटांत घे ! [ भूमि दुभंग होते व तींत गौरी अदृश्य होते. ]

**अंक चवथा समाप्त.**

# अंक पांचवा.

## प्रवेश पहिला.

स्थळ—राजमंदिर.

[ सागर व लहरी प्रवेश करितात. ]

**साग०:**—एकूण आज महाराजांनींच बंडखोरपणा करून चांचेगिरीवर ताण केली ! बरं, पण ते इकडे येणार कधीं ? लग्नमुहूर्त तर चार दिवसांवर आला, आतां कां तिकडे उगीच अडकून राहिले आहेत.

**लह०:**—तुम्हांला ठाऊक नाहीं का ? चांचे लोकांचं बंड केव्हांच मोडलं, पण मत्स्यगंधेच्या बंडाचं एक नवीनच प्रकरण सुरू झालं ! तुमची आमची योजना त्या कामावर झाली. तुमचा मारा कांहींच कामाचा होईना ! पण मी कसला ! म्हटलं बोलेल तो करील काय ? मुक्याचं सोंग घेतलं आणि लागलों कामाला ! यश कुणाला मिळालं ? तपास कुणी लावला ? मींच ना ?

**साग०:**—मग त्यावद्दल तुला त्याच वेळीं बक्षीसही दिलं ! आतां लग्न-समारंभाच्या वेळीं आणखी कांहींतरी बक्षीस देतील !

**लह०:**—काय देतीलसं तुम्हांला वाटतं !

**साग०:**—बराचसा पगार चढवितील !

**लह०:**—किंवा ?

**साग०:**—एखादी सरदारकी देतील !

**लह०:**—किंवा ?

**साग०:**—एखादा हुद्दा देतील !

**लह०:**—बोला एकदम कांहीं तरी मोठं बोला !

**साग०:**—आपलं सबंध राज्य देतील असं जर—

**लह०**—नको, राज्य आपल्याला नको आहे. आपल्याच्यानं ती दलामल व्हायची नाहीं.

**साग०**—मग तुला काय पाहिजे ? लग्न करून पाहिजे का ?

**लह०**—लग्नाची गोष्ट काढूं नका ! आजन्म अविवाहित राहण्याची मीं प्रतिज्ञा केली आहे !

**साग०**:—अरे केव्हां ?

**लह०**:—भीष्म युवराजांबरोबरच ! हजारों तरुणांनीं अशाच प्रतिज्ञा केल्या आहेत !

**साग०**:—पण ही प्रतिज्ञा पाळणार कुठपर्यंत ? एकादशीचा उपास द्वादशीला सुटलाच पाहिजे. नाहींतर एकादशीला फराळाचं इतकं खाल्लं पाहिजे, कीं खास अजीर्ण व्हायचं !

**लह०**:—अशी थट्टा करूं नका ! युवराजांनींही प्रतिज्ञा केली आहे.

**साग०**:—अरे तूं कांहीं युवराज नाहींस ! तारुण्यांत सामर्थ्य न ओळखून केलेल्या प्रतिज्ञा, प्रतिज्ञा करणाराचं हसं केल्यावांचून रहात नाहींत ! बरं, पण महाराज केव्हां येणार तें नाहीं सांगितलंस ?

**लह०**:— अलीकडे माझी प्रतिज्ञा नेहमीं माझ्या दृष्टीसमोर असल्यामुळं मला बऱ्याच गोष्टींचं विस्मरण पडूं लागलं आहे ! महाराज आजच येणार आहेत.

**साग०**:--बरं, पण युवराजांना ही बातमी दिलीस ना ?

**लह०**:--प्रथमतः युवराजांच्या दर्शनाला जाऊन नंतरच इकडे आलों.–पण ही पहा युवराजांची स्वारी आली !

[ भीष्म येतो. ]

**भीष्म**:—सागर ! आज मोठी चमत्कारिक वेळ होती ! लग्नसमारंभाकरितां नगर आयतं शृंगारलं जात होतं, म्हणून बरं; नाहींतर महाराजांचा आजचा नगरप्रवेश मुका मुका वाटला असता ! महाराज आज येणार हें पाहून मला आनंद वाटत आहे ! लग्नसमारंभाकरितां तयार केलेली सर्व ठिकाणं पाहून आलों लग्नमंडपाचं काम इतकं नामी झालं आहे, कीं पहातां पहातां घटकाभर देहभान विसरून जातं !

**साग०**:--युवराज ! देहभान विसरण्यासारखं त्यांत विशेष काय आहेसं आपल्याला वाटतं ?

**भीष्मः**—तें कांहीं मला सांगतां येत नाहीं. दोन वेळां मी सर्व मंडप फिरलों, पण बहुल्याच्याजवळ येतांच माझ्या डोळ्यांतून घळघळां अश्रु वाहूं लागले आणि एक क्षणभर मी देहभान विसरून गेलों !

( पद २४—राग भैरवी ताल दादरा )

**मना न स्मृति या। नुरे कां भान देहा॥ हृदय कंठ दाटले। नेत्रिं झरे या ॥ धृ० ॥ शाश्वत ना जग। देह न शाश्वत। प्रेमवांछना ना। मना माझिया। नुरे का भान देहा ॥ १ ॥**

**साग०**:—आपल्या घोर प्रतिज्ञेची स्मृति तर आपल्याला त्रास देत नाहीं ना ?

**भीष्म**—सागर ! काय बोलतां तुम्ही ! प्रेम म्हणजे काय याची कल्पनाही आजपर्यंत माझ्या मनाला शिवली नाहीं ! एखाद्या तरुणीवर माझं मन गेलं असतं, तिच्या प्रेमपाशांत मी गुरफटून गेलों असतों, तिच्या प्रेमाच्या लीलेंत मी मग्न झालों असतों, आणि नंतर जर माझ्या हातून अशा तऱ्हेची प्रतिज्ञा झाली असती, तर मात्र मला पूर्व प्रेमाची स्मृति होऊन अंतःकरणाला त्रास झाला असता ! पण कुठली तरुणी, कुठलं प्रेम ! आमच्यासारख्या ब्रह्मचाऱ्याच्या स्वप्नांतही या गोष्टी यायच्या नाहींत ! सागर ! तुमचं एखाद्या तरुणीवर प्रेम बसलं आहे कांहो ? अहो, लाजतां कां ? सांगा कीं ?

**साग०**:—युवराजापाशीं खोटं कसं बोलूं ? होय, माझं एका सरदारकन्येवर प्रेम आहे !

**भीष्मः**—तिचंही तुमच्यावर तसंच प्रेम आहे ? सांगा, लाजूं नका !

**साग०**:—होय, आहे !

**भीष्मः**—मग आपलं लग्न उरकून घ्या ! महाराजांच्या विवाहाबरोबरच याच लग्नमंडपांत तुमचाही विवाह झाला पाहिजे !—पण तुमच्या भावी पत्नीचं नांव काय हो ? नांव घ्यायला हरकत नाहीं !

**साग०**:—काय हरकत आहे ? तिचं नांव ललिता !

**भीष्मः**—ललिता ! आहे—हें नांव माझ्या माहितीचं आहे ! तिचा बाप विरुद्ध असला तरी—

**साग०:**—नाहीं तिचा बाप विरुद्ध नाहीं. क्षत्रियकुळांत जरी माझा जन्म झाला नाहीं तरी माझ्या संबंधानं त्याचं फार चांगलं मत आहे आणि त्यांनीं मला तिच्याशीं विवाह करण्याची संमतिही दिली आहे.

**भीष्मः**—मग ठीक आहे ! नाहीं तर म्हणतो, तो विरुद्ध असला तर पळवून आणा तिला ! त्यांत कांहीं वाईट नाहीं. मी देतों तुमचं लग्न लावून ! हो आपण एक लग्न करणार नाहीं, पण दुसऱ्याचीं लग्नं करून दिलींच पाहिजेत; आणि ही ललिता,–नांव पहा माझ्या चांगलं ओळखीचं आहे. तुमचं लग्न झालंच पाहिजे !

[ भैरव धांवर येतो. ]

**भैर०:**—भीष्मा ! बाबा भीष्मा ! अरे पोरगी गेलीरे गेली ! त्या हरामखोराबरोबर शेवटीं पळून गेली !

**भीष्मः**—पळून गेली ! म्हणजे ? म्हणतां काय तुम्ही ?

**भैर०:**—तेंच म्हणतोय. मत्स्यगंधा सुकर्णाबरोबर पळून गेली !

**भीष्मः**—सुकर्णाबरोबर ?

**भैर०:**—हो हो सुकर्णाबरोबर ? त्यानं तिच्यावर जाळं टाकलं ? माझा मासा पकडून नेला ? आतां मी राजाचा सासरा कसला होतों ! आतां माझी पोरगी राणी कुठून होणार ! तिचे मुलगे राजे कसे होणार ! भीष्मा ! तुझ्याकडून प्रतिज्ञा करविली, म्हणून तुला राग येऊन माझा घात करण्याकरितां तर हें करवलं नाहींस ना ?

**भीष्मः**—काय–काय–म्हणतां तुम्ही ! अशी गोष्ट माझ्या हातून कालत्रयीं होणार नाहीं ! भैरवनाथ ! आपण घाबरून गेलां आहां. या वेळीं आपण वेड लागल्याप्रमाणं वाटेल तें बोलाल हें मला कळतं ! पण जरा शांत होऊन मी काय विचारतों त्याचं उत्तर द्या.

**भैर०:**—अरे कसलं उत्तर देऊं ! माझी पोरगी गेली तर हरकत नव्हती ! पण माझं राज्य गेलं ! माझा मानपान गेला !—राजाचा सासरा होणार होतों नारे मी ?

**भीष्मः**—भैरवनाथ, असं दुःख करूं नका ? मी तुम्हांला राजाचा सासरा करतों.

भैर०:—मला राजाचा सासरा करतोस ? कर.

भीष्म:—महाराजांवर मत्स्यगंधचं प्रेम होतं, असं मी महाराजांच्या तोंडून ऐकलं आहे, आणि सुकर्णानं जर तिला नेली असली, तर ती कपटानं –विश्वासघातानं–बळजबरीनंच नेली असेल !

भैर०:—अरे नाहीं नाहीं ती त्याच्याबरोबर आनंदानं गेली असेल ! सुकर्णावरच तिचं प्रेम होतं ! अरे फार होतं–अति होतं ! तिचं महाराजांवर मुळींच प्रेम नव्हतं, त्यांची आणि तिची कधीं भेट सुद्धां नाहीं रे !

भीष्म:—मत्स्यगंधेचं मन इतकं चंचल असेल, अस मला वाटत नाहीं ! महाराजांचा प्रेमाच्या कामांत गैरसमज होईल, हेंही शक्य नाहीं–बरं, सुकर्ण तो कोण ?

भैर०:—तुला माहीत नाहीं ? अरे तो तर महाराजांचा जहाजावरचा नाखवा ?

भीष्म:—महाराजांच्या नावेंतून मी कित्येक वेळां फिरलों असेन , पण या नांवाचा नाखवा तिथं खास नाहीं ! कांहीं तरी दगा असेल ! सागर ! एक तुकडी या सुकर्णाच्या शोधाकरितां तावडतोब पाठवून त्याला धरून अणवा.

भैर:—भीष्मा ? हा पहा सुकर्ण आला ? मत्स्यगंधाही त्याच्या बरोबर आहे. ( शांतनु व मत्स्यगंधा, राजगुरु, अमात्य, ललिता, येतात. ) हरामखोरा ! माझ्या पोरीला पळवलास ! कार्टे ? याचा हात धरून गेलीस ? थांब तुमची टाळकी फोडून टाकतों

[ सोटा घेऊन धांवतो; भीष्म मध्येंच सोटा धरतो. ]

भीष्म०:०—भैरवनाथ ? तुम्हांला वेड लागलं ? महाराजांवर हल्ला ? महाराज ! मातोश्री ! हा भीष्म आपल्याला वंदन करतो ?

भैर०:—अरे भीष्मा ? तुला वेड लागलं ? हा सुकर्ण आहे.

भीष्म—मी तुम्हाला राजाचा सासरा करीन म्हणून वचन दिलं आहे ना ?

भैर०:—मग याला राज्यावर बसवून तूं मला सासरा करणार कीं काय ?

शांत०:—भैरवनाथ ! आपल्याजवळ कपट केलं याबद्दल या शांतनूला क्षमा करा ?

भैर०:—कोण तूं शांतनु ?



[ अं. ५ प्र. १ ]

मत्स्यगंधा—बाबा, सुकर्ण म्हणजेच शांतनु !

मत्स्य०:—होय बाबा! शांतनु म्हणजे सुकर्ण?

भैर०:—छट्! खोटं बोलतेस कार्टे?

शांत०:—भैरवनाथ! आपण शांत व्हा. सुकर्ण आणि शांतनु एकच!

भैर०:—मग तूं मला असं फसवलंस कां? त्याचं कारण?

शांत०:—त्याचं कारण मी सांगतों. मीं सुकर्णाच्या वेषांत हिला प्रथमं पाहिली. माझं हिच्यावर प्रेम बसलं, पण तिचं माझ्यावर प्रेम आहे कीं नाहीं तें कळेना? मी मागणी घातली, तरिही तुम्हीं धुडकावून दिलीत; तेव्हां या सागरांना सुकर्णाचे मामा केलं आणि पाठवले तुमच्याकडे.

भैर०:—छत्? हे कसे मामा होतील? यांच्या त्या मिशा दाढ्या कुठं गेल्या?

मत्स्य०:—अहो बाबा! तें त्यांनीं सोंग घेतलं होतं आणि या लहरींनीं तर काय कमालच केली! बायकोचं सोंग घेतलं आणि सगळं कांहीं ऐकायला सांपडावं म्हणून मुकी बनले.

भैर०:—हंः! कांहीं तरीं बोलते झाले! पुरुषाची बायको कशी होईल आणि बोलणाराची मुकी कशी होणार?

शांत०:—तसं व्हायला कांहीं विशेष लागत नाहीं. भैरवनाथ! आपण नाटकं पाहिलीं नाहींत वाटतं! म्हणून आपल्याला आश्चर्य वाटतं! आम्हीं जर अशा वेशधारी नटांचा उपयोग करून घेतला नसता तर आज आपण राजाचे सासरेही झालां नसतां!

भैर०:—मोठीं गम्मत आहे बुवा! ही पोरगी शेवटीं आपल्या जातीवर गेली!

शांत०:—म्हणजे?

भैर०:—म्हणजे काय! ही माझी मुलगी नव्हे, ही क्षत्रियकन्याच आहे.

शांत०:—ती धीवरकन्या असो, किंवा क्षत्रिय कन्या असो, यांत मला भेद नाहीं? तरी पण ज्या थोडया व्यक्ति या विवाहाला विरुद्ध आहेत, त्यांना तरी आनंद वाटेल.—पण या आनंदाला कारण माझा भीष्म?

मत्स्य०:—एक गोष्ट माझ्या मनाला फारच लागून राहिली आहे! भीष्मा! तुं माझ्या लग्नाच्या वेळीं तुझ्याकडून भलतीच प्रतिज्ञा करविली, याबद्दल

मी तुझी क्षमा मागतें. स्वतःच्या स्वार्थाकरितां दुसऱ्यांच्या उदार स्वभावाचा फायदा घेऊन त्याला स्वार्थत्याग करायला लावणं, मला मुळींच पसंत नाहीं. भीष्मा ? तुझं जें एकंदर नुकसान झालं आहे, तें भरून निघणं शक्य नाहीं. तुझी योग्यता मी पूर्ण जाणून आहे ? मी तुझी माता आहें ? तुला सुख होईल तें करणं हाच माझा धर्म आहे !

**भीष्मः**—मातोश्री ? मातृ-पितृभक्तीपेक्षां मी कोणच्या सुखाची इच्छा धरूं ? आपली सेवा हेंच माझं सुख ? हाच माझा धर्म ?

**शांत०**:—भीष्माला जें जें प्रिय असेल, तें तें करण्यामध्यें मला धन्यताच वाटेल ? भीष्मा ? ह्या आनंदाच्या प्रसंगीं तुझ्या इच्छेप्रमाणं सर्व व्यवस्था केल्या जातील. सागर ? तुमचं व ललितेचं लग्न आमच्या विवाहाबरोबर होईल ? एकसहस्र वीरांचे विवाह आमच्या लग्न मंडपांत झाले पाहिजेत ? आमच्या हयातीपर्यंत माझा प्रतिनिधि म्हणून भीष्मच माझ्या वतीनं राज्यकारभार चालवील ?

## भरतवाक्य.

( पद २५—राग वसंत ताल तेवरा )

**श्री भगवान् । दे वरदान । अविरत ध्यान । स्फूर्तिं निधान । करि यशवान् त्यागि महान् । स्वार्थी मानी पाप समान ॥ १ ॥**

[ पडदा पडतो

समाप्त.